पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक ९ । मूल्य : रु. ३० । दिनांक : १६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२१

# आरक्षण:



## न्याय्य पुनर्रचनेची नितांत गरज



**INSIDE**

**खरंच, साहित्य संमेलनाला काही प्रयोजन उरलंय?**
संपादकीय

**भरून न येणारी राष्ट्रीय हानी**
प्रकाश खंडेलोटे

**एस.टी. कामगारांच्या संपाचे त्रांगडे**
कॉ. भीमराव बनसोड

**बहुजनांनाच का केले डिलीट?**
डॉ. श्रीमंत कोकाटे

# वाचकांची पत्रे

## ‘जयभीम’चा अंक अत्युत्कृष्ट

‘जयभीम’ या मूळ तमिळ चित्रपटाला केंद्रस्थानी ठेऊन काढलेला १६ नोव्हेंबर ते १५ डिसेंबरचा अंक उत्कृष्ट होता. ‘जयभीम’ चित्रपटाच्या लेखकांनी केलेलं परीक्षण प्रत्येकाच्या दृष्टिकोनातून वेगवेगळं असलं तरी त्याची थिम एकच आहे, ती म्हणजे जातीयवाद. देशाला स्वातंत्र्य मिळून ७४ वर्षे संपाली तरी विशिष्ट जातीच्या लोकांना जातीच्या नावाखाली छळलं जातं. राज्यघटनेनं त्याला दिलेल्या मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवलं जातं. समता, स्वातंत्र्य, बंधुता ही राज्यघटनेतील मानवी मूल्ये समाजात कधी रुजणार आहेत, असे प्रश्न ‘जयभीम’ चित्रपटाने विचारले आहेत. या अनुषंगाने अंकातील लेख वाचनीय होते – धन्यवाद...

**– विनायक वाघमारे,** मुंबई

## प्राचार्य नागोराव कुंभार ग्रेटच!

समाजभान असलेला विचारवंत : प्राचार्य नागोराव कुंभार हे व्यक्तिविशेष खास होतं. प्राचार्य नागोराव कुंभार यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारा हा लेख त्यांच्या वाटचालीचा आढावा घेणारा तर आहेच, त्याचबरोबर शिक्षण क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या तरूणांना मार्गदर्शकही आहे. बहुजन समाजातील मुलांना पुढं आणण्याचं काम कुंभार सरांनी केल्याचं या लेखातून समजलं. गरिबीतून आयुष्य उज्ज्वल बनवणाऱ्या या विचारवंतास लाख लाख शुभेच्छा.

**– नंदकुमार पाटील, संतोष वाटवे,** नागपूर

## राजनिती नव्हे, शरणागतीच!

तीन कृषी कायदे मागे घेण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयावर भाष्य करणारा ‘शरणागती की राजनिती’ हा अग्रलेख छान होता. सरकारचा हा निर्णय म्हणजे शरणागती मुळीच नाही. आगामी वर्षभरात होणाऱ्या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांवर डोळा ठेऊन कृषी कायदे मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. ही मोदी सरकारची राजनिती आहे, हे वास्तव सारा देश जाणतो आहे.

**– प्रकाश पाटील,** पुणे



## ‘जयभीम’चे राज्य यावे

‘जय श्रीराम’ची जागा घेण्यासाठी ‘जयभीम’ हा जयदेव डोळे यांचा लेख वाचनीय होता. गांधीजींचे रामराज्य येण्याऐवजी ‘जय श्रीराम’चे राज्य आपल्यावर आले आहे. ‘जयभीम’चे राज्य येण्यासाठी जयभीम चित्रपट पाहण्याचं आवाहन लेखकानं केलं आहे. देशातल्या जातीव्यवस्थेचं वास्तव अनुभवण्यासाठी हा चित्रपट तर बघितला पाहिजे, पण ‘जयभीम’चं राज्य येण्यासाठी समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता ही मानवी मूल्ये समाजात रुजली पाहिजेत. असे झाले तर प्रत्येकाला न्याय मिळेल. राज्यघटना समाजातील तळागाळात समजण्यासाठी संविधान साक्षरता वाढवणे गरजेचे आहे. याद्वारे समाजात प्रस्थापित होणारी समानता ‘जयभीम’च्या राज्याचीच अनुभूती देईल.

**– अविनाश वाघ, संजय वाघ,** नांदेड

## संग्रही ठेवावा असा अंक

‘जयभीम’ची कव्हर स्टोरी असलेला १६ नोव्हेंबर ते १५ डिसेंबरचा अंक संग्रही ठेवावा असा आहे. केंद्र सरकारने कृषी कायदे मागे घेतल्याच्या पार्श्वभूमीवर लिहिलेले संपादकीय, जी.के. ऐनापुरे, उत्तम कांबळे, जयदेव डोळे, मुक्ता मनोहर, प्रा.डॉ. शंकर विभुते यांनी केलेले ‘जयभीम’ चित्रपटाचे परीक्षण, विजय नाईक यांचा ‘नरेंद्र मोदी यांची कोलांटउडी’ हा लेख, हे सर्व वाचनीय आहे. ‘बौद्ध तत्त्वज्ञानाने घडला नवा भारत’ हा भीमराव सरवदे यांचा लेखही उत्कृष्टच आहे. संग्राह्य अंक दिल्याबद्दल संपादकांचे अभिनंदन!

**– महेश पारवे, सुनंदा पारवे,** अहमदनगर

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्, नाशिक

**मुखपृष्ठ**
सचिन ओव्हाळ

**संपादकीय पत्रव्यवहार**
११, तळमजला, बी ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.)
मुंबई ४०००१६

**संपर्क**
८८८८५४१८२२
९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.

द पीपल्स पोस्ट
8888541822

**• जाहिरात विभाग संपर्क**
९८२११४४५४०९ / ८८०५१५१४५२

**• वर्गणीदारांसाठी संपर्क**

**महाराष्ट्र / मुंबई :**
गजानन आठवले : 9076065215
विदर्भ : आंकुश वाकडे : 9421424242
मराठवाडा : सचिन : 7350091569
कोकण : संकेत तांबे : 7738784132

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष
द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

पाक्षिक
# द पीपल्स पोस्ट
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक ९
मूल्य : रु. ३० । दिनांक : १६ ते ३१ डिसेंबर २०२१

संपादकीय – खरंच, साहित्य संमेलनाला काही प्रयोजन उरलंय? ४
भरून न येणारी राष्ट्रीय हानी प्रकाश खंडेलोटे ५
आरक्षण : न्याय्य पुनर्रचनेची नितांत गरज – प्रा. अविनाश कोल्हे ८
एस.टी. कामगारांच्या संपाचे त्रांगडे – कॉ. भीमराव बनसोड १३
प्रबोधनकारी महाराष्ट्रातून बहुजनांनाच का केले डिलीट? – डॉ. श्रीमंत कोकाटे १७
धर्म एक चक्रव्यूह : क्रांती–प्रतिक्रांती – बी.जी. वाघ १९
उत्तर प्रदेशचे ‘मैदान’ तापतेय – भास्कर नाशिककर २३
लोकसाहित्यातील सांस्कृतिक प्रभुत्व बदलण्याची गरज – डॉ. मिलिंद कसबे २५
व्यक्तिविशेष : कोकणीतील ‘ज्ञान’तपस्वी : दामोदर मावजो २९
गोमंतक सारस्वताच्या सहवासातील काही क्षण – प्रा. रोहिदास जाधव ३०
ग्रंथपरिचय : बाबासाहेबांचे दाहक अनुभव – प्रा. बी.सी. सोमवंशी ३३
कविता : तोंड बांधलेल्या अभिव्यक्तीचे संमेलन : – डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी
फुलण्याचे वेड : – बाळासाहेब लबडे ३५
आज–कालचे प्रश्न – पंक्चरवाला ३६
कोण काय बोलतं ३९

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# खरंच, साहित्य संमेलनाला काही प्रयोजन उरलंय?

आपल्या वयाची ९४ वर्षे पार करणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला काही प्रयोजन उरलंय का, असा प्रश्न सर्वसामान्याला पडावा अशी परिस्थिती निर्माण होत आहे. पहिली गोष्ट म्हणजे, हे संमेलन सर्वसामान्यांच्या हातातून सरकलं आणि ते मराठी साहित्य व्यवहाराचे आणि संवर्धनाचे आम्हीच स्वयंघोषित ठेकेदार आहोत, असा दावा करणाऱ्या महामंडळाच्या हातात गेलं. दुसरं, आर्थिकदृष्ट्या मोठी उलाढाल करणाऱ्या धनदांडग्यांच्या हातात गेलं. समाज, भाषा, संस्कृती, समकालीन प्रश्न यांवर गंभीर चर्चा करण्याचं एक ठिकाण अशी अपेक्षा असणारं संमेलन आता हळूहळू आर्थिक उलाढाल आणि साहित्य व साहित्यबाह्य राजकारणात घुसमटत असल्याचं दिसतं. भव्यता हा साहित्य संमेलनाचा एक अविभाज्य भाग असतो. दोन दोन कोटींचा मंडप, एवढ्या लांब भोजनावळ्या, एवढं मोठं निधी संकलन हे संमेलनाला जोडूनच येत आहे. ज्यांची आर्थिक ऐपत तो संमेलन भरवणार, हेही आता रुढ होऊ पाहतय. साधी पण गंभीर संमेलनं ही कल्पना मागं पडली. संपत्ती गोळा करणारे बहुतेक राजकारणी असतात. संमेलनाची धुरा त्यांनी सांभाळली की मग साहित्यावर राजकारण्यांचं अतिक्रमण झालं, असे साहित्यिक ओरडणार. म्हणजे त्यांची मदत पाहिजे, त्यांचा पैसा पाहिजे, त्यांच्याकडून प्रतिष्ठा पाहिजे पण त्यांची सावली नको, असे साहित्यिक ओरडणार. राजकारण्यांच्या मदतीशिवाय संमेलन भरवायचं तर त्यात साधेपणा आणला पाहिजे. महामंडळाच्या कारभाऱ्यांनी संमेलन काळात मोठी हॉटेल्स, बडेजाव, खोट्या प्रतिष्ठा आणि संमेलनाच्या गेटवर आपलं नाव टाकण्याच्या मोहात अडकता कामा नये. पूर्वी महामंडळाचं नाव यायचं अर्थात मोठ्या अक्षरात. आताही ते येतं, पण छोट्या अक्षरात आणि कारभाऱ्याचं मोठ्या अक्षरात. संमेलनभर तोच पुरून उरलेला असतो. एकाधिकारशहासारखं गुरगुरत असतो. संमेलनात भाग घेणाऱ्या साहित्यिकांनीही टीए, डीए, सुंदर मुक्कामाचं ठिकाण या गोष्टींपासून मुक्त झालं पाहिजे. झगमगणाऱ्या मंचावरच विचार चांगल्या तऱ्हेनं मांडता येतात, या बाजारू कल्पनेतून मुक्त झालं पाहिजे. भोजनावळ्यांमध्ये घमघमाट नाही आला तरी चालेल असंही वागलं पाहिजे. एकीकडे संमेलनाला पंढरीची वारी म्हणायचे आणि वारीला जाण्यासाठी टीए, डीएसह भरमसाठ अटी घालायच्या. वर्षातून एकदा फक्त संमेलनच त्याला अपवाद ठरवू अशी भूमिका घेऊ, असं ठरवायला हवं. पण हे सारं कोण सांगणार आणि कोण ऐकणार? एखाद्या गोष्टीचा इव्हेन्ट होतो तेव्हा झगमगाटाच्या पायाखाली साधेपणा मरून जातो. कोटीच्या कोटी उड्डाणे होतात. पण शिल्लक निधी कोण घेऊन जातं आणि काय करतं असा प्रश्न कुणाला पडू देत नाही. शिल्लक निधीतून कशाकशाचा तरी उद्धार करण्याची प्रथा सुरू झालीय. कोण आपल्या संस्थेचा, तर कोण कशाचा तरी उद्धार करत राहतं. साधी संमेलने प्रभावी आणि विचारी ठरतात हे महाराष्ट्रात अन्य अनेक संमेलनांनी सिद्ध करून दाखवलंय. अ.भा. संमेलन म्हणजे एका अर्थानं लाडावलेलं बाळ. त्याचा आणि साधेपणाचा संबंध येण्याची शक्यता तशी धूसरच म्हणावी लागेल.



संमेलनाचे अध्यक्ष आणि उद्घाटक ठरवण्यात जेवढं राजकारण होतं, तेवढं महापालिकांच्या निवडणुकीतही होत नसावं. नाशिकच्या संमेलनातही तसंच घडलं असावं. प्रथम दोन नावं चर्चेला आली. उद्घाटक म्हणून त्यांचा विचारही सुरू झाला. पण ते एक विशिष्ट धर्माचे होते. सावरकरांच्या नगरीत हिंदू विचारसरणीच्या जवळ जाणारा उद्घाटक असावा, असा विचार पुढे आला. तो यशस्वीही झाला. समतेचा अर्थ चुकीचा लावणाऱ्या समरसता मंचाच्या मांडवाखालून आलेल्यांची

निवड झाली. त्यानं उद्घाटनाच्या भाषणात नाशिककरांना माहिती असलेलाच नाशिकचा इतिहास सांगितला, स्वतःचा इतिहास सांगितला. स्वतःवर टीका करणाऱ्यांना झोडपून काढलं. झालं उद्घाटन. बरं झालं, संमेलनाचे पाहुणे असलेल्या जावेद अख्तर यांनी 'ऐसी अंधेरी रात कभी न आयी थी ऐसा भी लिख', असं सांगितलं नसतं तर संमेलनाला अक्षरशः टरफलाचं स्वरूप आलं होतं. स्वातंत्र्याचा जयजयकार करणाऱ्या कुसुमाग्रज यांच्या कवितेनं संमेलनाची सुरुवात झाली. पण पंचाहत्तरीत शिरलेलं स्वातंत्र्य भीक मागून मिळालंय असं कोणी लांब नाकाच्या नटीनं म्हटलं होतं आणि मराठीतील स्वयंघोषित नटसम्राटानं त्याला पाठिंबा दिला होता, याबद्दल कोणी शब्द काढला नाही. महामंडळानं आपल्या ठरावातही ही गोष्ट आणली नाही. अलीकडं ठराव हाही एक उपचार झाला आहे, ही गोष्ट वेगळी. अशा ठरावाला कोणी हिंग घालून विचारत नाही, हीही गोष्ट वेगळी. मराठी भाषेच्या नावानं रडगाणं गाणारा ठराव होतोय, पण पुढं काही न होता तोच ठराव नव्या पॅकिंगमध्ये येतोय. तर हे असं आपलं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन. त्याला आशय देता येत नसेल, त्याला गांभीर्य देता येत नसेल, ते प्रभावी करता येत नसेल, ते इव्हेन्टकडून विचार मंचाकडे येत नसेल, त्याला उजवीकडून पुरोगामीपणाकडे वळवता येत नसेल, कोणा एकाधिकारशहाच्या मुठीतून ते काढता येत नसेल तर बंद करायला काय हरकत आहे. त्याऐवजी मनोरंजनाचे कार्यक्रम ठेवायला काय हरकत असेल? पण हेही घडणार नाही. फुकटात हातात येणारी सत्ता सोडायला कोणी तयार नाही. त्याऐवजी आता हिंडत्या-फिरत्या अध्यक्षाच्या शोधात हे संमेलन जाऊ पाहते आहे. हिंडता-फिरता असणे ही अध्यक्षाची पात्रता, की तो विचारवंत, प्रतिभावंत असणे ही पात्रता, सारा गोंधळच आहे. आपल्या काखेत मावणारा कुणीतरी हिंडता-फिरता डोळ्यासमोर ठेऊन हा प्रस्ताव आला असावा. ज्येष्ठ माणूस ज्ञान, अनुभव आणि विचार यांनी पक्व असतो, म्हणून त्याला अध्यक्षपदी आणतात. तो संमेलनात काय विचार मांडणार हे ठरवून आणतात. विशेष म्हणजे, प्रत्येकजण हिंडण्या-फिरण्यासाठी वापरावयाच्या हातापायानं न बोलता डोक्या-तोंडानं बोलत असतो. पण आता हे सांगायचं कोणाला? महामंडळाला स्वतःची पेढी बनवू पाहणाऱ्या महाभागांना तर कोण सांगणार? मुळात ज्यांचा साहित्याशी कमी व्यवहार आणि साहित्यव्यवहाराशी संबंध अधिक त्याला कोण सांगणार, हाही प्रश्न आहेच. नाही तर चार महिन्यांच्या आत नव्या संमेलनाची घोषणा झालीच नसती. आता बोला, मराठी साहित्य आणि संस्कृतीचा विचार कुणी आणि कसा करायचा? •••



# भरून न येणारी राष्ट्रीय हानी



प्रकाश खंडेलोटे

तामिळनाडूच्या कुन्नूर जंगलातील हेलिकॉप्टर अपघातात संरक्षण दलाचे प्रमुख बिपीन रावत यांच्यासह १२ उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या आकस्मिक मृत्यूने देशाचं मोठं नुकसान झालं आहे. त्यामुळे ८ डिसेंबर २०२१ ची ही घटना भारतीय संरक्षण दलाच्या इतिहासातील सर्वात दुःखद घटना म्हणून नोंदली जाईल. भारतीय हवाई दलाचे ट्रेनिंग कमांड एअर ऑफिसर एअर मार्शल मानवेंद्र सिंग यांच्या अध्यक्षतेखालील समिती या दुर्घटनेची चौकशी करीत आहे. त्यातून सत्य लवकर बाहेर यावे, अशी देशवासियांची भावना आहे.

चौकशीतून अपघाताचे तांत्रिक कारण समोर आले तर त्याची पुनरावृत्ती टाळता येऊ शकते. पण घातपाताचा प्रकार असेल तर सुरक्षा यंत्रणा मजबूत करण्याबरोबरच यंत्रणेतील त्रुटी दूर करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. पण आपण अशा घटनांपासून धडा घेत नाही, असे धाडसाने म्हणावे वाटते. आजपासून बरोबर ५८ वर्षांपूर्वी, म्हणजे २३ नोव्हेंबर १९६३ रोजी जम्मू-काश्मिरातील पूँछ भागात हेलिकॉप्टर कोसळून तीन जनरल, एक ब्रिगेडिअर आणि एक भारतीय हवाई दलाचा अधिकारी असे सहा उच्चपदस्थ अधिकारी ठार झाले होते. पाकिस्तानने पूँछ भागातील पाणीपुरवठा करणारी यंत्रणा उडवून दिल्यानंतर



भारतीय लष्कराच्या जवानांनी नवीन जलकुंभ उभारला होता. त्याची पाहणी करून हे अधिकारी सूद एव्हिएशन या फ्रेंच कंपनीने विकसित केलेल्या 'एरोस्पेशिएल अलौती-३' या भारतीय हवाई दलाच्या सिंगल इंजिनच्या हेलिकॉप्टरने परतत होते. त्यावेळी हा अपघात घडला होता. या अपघाताच्या चौकशीसाठी हवाई दलाचे उपप्रमुख एअर व्हाईस मार्शल रामस्वामी राजाराम यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती. समितीच्या अहवालाच्या आधारे, दोन दलांच्या उच्च अधिकाऱ्यांनी एकत्र प्रवास करायचा नाही, असा निर्णय घेतला गेला. तो काही काळ पाळला गेला, पण पुढे त्याचे विस्मरण झाल्याने ८ डिसेंबरची भयानक घटना घडली.

**सुरक्षिततेच्या शिष्टाचाराचे काय?**

या अपघातात ठार झालेल्या १३ जणांपैकी १२ लष्करी अधिकारी होते. एवढे उच्चपदस्थ अधिकारी एकाच हेलिकॉप्टरने प्रवास करणे काहीसे अनाकलनीय वाटते. एवढ्या मोठ्या संख्येने अधिकाऱ्यांचा एकाच वेळी अपघाती मृत्यू ही आपल्या देशाच्या सुरक्षा व्यवस्थेतील गलथानपणा मानला जात आहे. आपल्या देशात कोणतीही व्हीआयपी किंवा व्हीव्हीआयपी व्यक्ती प्रवास करते तेव्हा त्यांच्यासोबत एक लवाजमा असतो. त्यात पायलट पुढे तर पाठीमागे पोलिसांचे वाहन आणि रुग्णवाहिका असते. मात्र रावत यांच्या सुमूर ते वेलिंग्टन या प्रवासात अशी खबरदारी घेतल्याचे दिसले नाही. रावत यांच्या हेलिकॉप्टरच्या मागेपुढे कोणतेही चॉपर नव्हते. रावत हे मृत्यूसमयी कोणत्याही सैन्यदलाचे सक्रिय प्रमुख नव्हते; परंतु तीनही सैन्यदलांचे प्रमुख समन्वयक आणि केंद्र सरकारचे सामरिक सल्लागार म्हणून

## *पत्नीही सामाजिक कार्यात सक्रिय*

***या अपघातात मरण पावलेल्या रावत यांच्या पत्नी मधुलिका रावत या आर्मी वाईव्हज् वेलफेअर असोसिएशनच्या अध्यक्ष होत्या. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी संरक्षण कर्मचाऱ्यांच्या बायकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केले. लष्करी कर्मचाऱ्यांच्या विधवा, दिव्यांग मुले आणि कॅन्सरग्रस्त रुग्णांना मदत करणाऱ्या 'वीर नारीज' या सेवाभावी संस्थेच्या कार्यातही त्यांनी योगदान दिलं आहे.***

त्यांच्यावरील जबाबदारी अत्यंत महत्त्वाची होती. त्यामुळे या दौऱ्यात त्यांच्या सुरक्षेची पुरेशी काळजी घेतली जाणे आवश्यक होते, ती घेतली गेली नाही. म्हणजे देशातील व्हीव्हीआयपी व्यक्तिंच्या सुरक्षिततेचा शिष्टाचारदेखील पाळला गेला नाही, या संशयाला जागा आहे.

**बिनधास्तपणा भोवला**

जगात आधुनिक दळणवळण यंत्रणा इतक्या प्रभावी असताना हवामान किंवा तांत्रिक कारणामुळे एवढी भयानक आपत्ती ओढवणे हे आपल्या सुरक्षा यंत्रणेतील बिनधास्तपणावर शिक्कामोर्तब करणारे आहे. २६/११ च्या मुंबई हल्ल्याच्या वेळीही असा बिनधास्तपणा दिसून आल्याचे त्यावेळी देशभरातील प्रसारमाध्यमांनी म्हटले होते. त्या दुर्दैवी घटनेत पोलिस दलात विविध पदांवर कार्यरत असलेले विजय साळसकर, अशोक कुमठे आणि हेमंत करकरे या जांबाज अधिकाऱ्यांना देशाने गमावले. गुंड आणि दहशतवाद्यांचे कर्दनकाळ असलेले हे अधिकारी शत्रूच्या निःपातासाठी एकाच वेळी पुढे आले आणि




अतिरेक्यांचे लक्ष्य ठरले.

**अखेर मृत्यूचाच विजय**

तामिळनाडूतील हेलिकॉप्टर अपघातात रावत यांच्यासह १३ योद्ध्यांचा एकाच वेळी मृत्यू होणे, ही बाब अत्यंत क्लेशदायक आहे. जनरल रावत हे याआधीही एका भीषण अपघातातून बचावले होते. नागालँडमधील दिनापूर येथील लष्कराच्या '३-कोअर'च्या मुख्यालयाचे प्रमुख असताना ३ फेब्रुवारी २०१५ रोजी ते प्रवास करीत असलेल्या हेलिकॉप्टरच्या इंजिनात बिघाड होऊन हा अपघात घडला होता. तेव्हा या पोलादी सेनानीने, 'मी पहाडी माणूस आहे, मला असे मरण येणार नाही' अशी धाडसी प्रतिक्रिया दिली होती. त्यावेळी त्यांनी मृत्यूवर विजय मिळवला होता. दुसऱ्यांदा घडलेल्या अपघातात मात्र मृत्यू विजयी ठरला.

**अत्यंत हुशार आणि बहादूर अधिकारी**

स्वातंत्र्याच्या ७० वर्षांनंतर संरक्षण दलप्रमुख (सीडीएस) हे पद निर्माण करून बिपीन रावत यांची त्यापदी नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे ते पहिलेच सीडीएसप्रमुख होते. उत्तराखंडमधील पौरी गढवाल जिल्ह्याच्या पौरी शहरात १६ मार्च १९५८ रोजी लष्करी घराण्यात जन्मलेले बिपीन रावत हे शत्रूच्या उरात धडकी भरवणारे बहादूर अधिकारी होते. त्यांचे वडील लक्ष्मणसिंह रावत हे सैन्यात लेफ्टनंट जनरल म्हणून कार्यरत होते. लष्कराच्या उपप्रमुख पदावरून ते निवृत्त झाले होते. त्यांनी १११ गुरखा रायफल्सला कमांड केले होते. जनरल रावत यांनीसुद्धा आपल्या वडिलांच्या रेजिमेंटमध्ये प्रवेश केला होता. १९७८ मध्ये त्यांनी भारतीय सैन्यात कमिशन ऑफिसर म्हणून प्रवेश केला. नॅशनल डिफेन्स अकॅडमीत सैनिकी प्रशिक्षणात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल त्यांना 'स्वोर्ड ऑफ ऑनर' हा सर्वात मोठा पुरस्कार देण्यात आला होता. सैन्यासाठीच्या सर्वच परीक्षा ते चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होत राहिले. अमेरिकेतील पोर्ट लिव्हनबर्ग येथून त्यांनी जनरल स्टाफचा अभ्यासक्रम पूर्ण केला होता.

**बहुराष्ट्रीय सेनेचे कांगोत नेतृत्व**


## *अनेक पदकांनी सन्मानित*

***बिपीन रावत यांना त्यांनी ४३ वर्षांच्या कारकीर्दीत बजावलेल्या धाडसी आणि विशेष सेवेबद्दल अनेक पदकांनी सन्मानित करण्यात आले. यामध्ये परमविशिष्ट सेवा मेडल, उत्तम युद्धसेवा मेडल, अतिविशिष्ट सेवा मेडल, युद्धसेवा मेडल, सेना मेडल, विशिष्ट सेवा मेडल या पदकांचा समावेश आहे.***

युद्ध आणि संघर्षाच्या परिस्थितीत काम करण्याचा प्रदीर्घ अनुभव त्यांच्या गाठी होता. त्यांनी कांगो या आफ्रिकन देशात संयुक्त राष्ट्र संघाच्या बहुराष्ट्रीय सेनेचेही नेतृत्व केले होते. देशात सुरक्षेचा प्रश्न उद्भवलेल्या प्रत्येकच ठिकाणी मग ते काश्मीर असो, लडाख असो की भारत-चीन सीमा असो, त्यांनी उत्कृष्ट काम केले. दहशतवादी हल्ल्याच्या वेळी चुप्पी साधणाऱ्या; परंतु दहशतवाद्यांवरील लष्करी कारवाईवर गळा काढणाऱ्या मानवाधिकार कार्यकर्त्यांच्या पोकळ आक्षेपांना भीक न घालता बिपीन रावत यांनी दहशतवादी आणि त्यांच्या समर्थकांविरूद्ध कडक कारवाई केली. एका सैनिकाने सैनिकासारखे काम करून देशाला सुरक्षित ठेवले पाहिजे, या सिद्धांतानुसार ते सदैव कार्यरत राहिले.

गेल्या काही वर्षात आपण चीन आणि पाकिस्तानच्या कुरापतखोरीला ठोस प्रत्युत्तर दिले. त्यामागची रणनिती आखण्यामध्येही रावत यांचा मोलाचा सहभाग होता. लढाईच्या काळात नौदल, वायूदल आणि लष्कर या तीनही दलांनी एकत्र काम केले पाहिजे, या हेतूने स्थापन केलेल्या सीडीएसपदी आल्यानंतर त्यांनी शत्रू राष्ट्रांना वचक बसविणारी कामगिरी केली. लष्कराच्या आधुनिकीकरणाचे कार्य त्यांनी हाती घेतले होते. त्यांच्या आकस्मिक मृत्यूनं ही प्रक्रिया काही काळ हा होईना, खंडित होणार आहे. •••

*देशात आरक्षण धोरण १९५० च्या दशकापासून राबवण्यात येत आहे. गेल्या सत्तर वर्षांत आरक्षण धोरणाचा अनुभव सकारात्मक आहे. आज अनेक ठिकाणी असं दिसून येतं, की आरक्षणाने काही कुटुंबांचा, काही जातींचाच फक्त फायदा झालेला आहे. अनेक जाती अशा आहेत, ज्यांना फारसा फायदा झालेला नाही. म्हणजे सामाजिक न्यायाच्या नावाखाली सुरू झालेल्या आरक्षणाच्या धोरणातूनच आता नवीन प्रकारचा अन्याय होत आहे. ही एक वेगळीच शोकांतिका आहे. यामुळे समाजातील खऱ्या वंचितांच्या मनात राग साठलेला आहे. याचा उद्रेक होण्याआधीच आरक्षण धोरणाची न्याय्य पुनर्रचना केली पाहिजे.*



**प्रा. अविनाश कोल्हे**

# आरक्षण : न्याय्य पुनर्रचनेची नितांत गरज

**नो**व्हेंबर २०२१ मध्ये आरक्षणासंदर्भात एक महत्त्वाचा न्यायालयीन निर्णय आला, ज्याची म्हणावी तशी चर्चा झाली नाही. भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनातून 'आरक्षण' हा विषय कधीही जाणार नाही, याची एव्हाना खात्री झाली आहे. याचा नवा पुरावा म्हणजे सर्वोच्च न्यायालयाचा ताजा निकाल. गुरूवार, २५ नोव्हेंबर २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला 'क्रिमिलेअर'साठी ठेवलेली आठ लाख रुपये वार्षिक उत्पन्नाच्या अटीमागची भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. आता केंद्र सरकार एका महिन्याच्या आत याबद्दल भूमिका न्यायपालिकेसमोर स्पष्ट करणार आहे.

या न्यायालयीन प्रक्रियेमुळे यंदा केंद्रीय वैद्यकीय महाविद्यालयांतील प्रवेश रखडले आहेत. हे लक्षात घेऊन अरविंद दातार या ज्येष्ठ वकिलाने या वर्षी सरकारने जुन्या नियमांप्रमाणे प्रवेश देऊन शैक्षणिक वर्ष सुरू करावे आणि पुढच्या शैक्षणिक वर्षांपासून आरक्षणाचे नवे नियम लागू करावेत, अशी सूचना केली आहे. केंद्र सरकारने अद्याप ही सूचना स्वीकारलेली नाही. यामागे असलेलं निवडणुकांचं आणि मतांचं राजकारण स्पष्ट दिसत आहे. आणखी तीन-चार महिन्यांनी देशातील काही राज्यांत विधानसभा निवडणुका होणार आहेत. मात्र या मुद्याला देशव्यापी आयाम आहेत. म्हणून या प्रकरणाची पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे.

**२७ टक्के आरक्षण कशाच्या आधारे?**

आपल्या देशात वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी 'राष्ट्रीय पात्रता आणि प्रवेश परीक्षा' (नीट) घेतली जाते. या परीक्षेत मिळालेल्या गुणांनुसार भारतातल्या वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश मिळतो. या परीक्षेत २७ टक्के जागा ओबीसींसाठी तर १० टक्के जागा आर्थिकदृष्ट्या दुर्बल; पण जातीच्या आधारावर आरक्षणात समावेश नसणाऱ्या वर्गासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय झाला होता. यासाठी आवश्यक ती घटनादुरूस्तीसुद्धा करण्यात आली होती. मग अपेक्षेनुसार हा मुद्दा न्यायपालिकेत गेला. देशातल्या ओबीसींची संख्या माहिती नसताना (इ.स. १९३१ पासून जातीनिहाय जनगणना झालेली नाही) २७ टक्के आरक्षण कशाच्या आधारावर देण्यात आलं आहे, हा यातील पहिला महत्त्वाचा मुद्दा आहे.

ओबीसी जनगणनेचा मुद्दा तसा जुना जरी असला तरी अद्याप तो सुटलेला नाही. ऑगस्ट २०२१ मध्ये भारतीय संसदेने १२७ वी घटनादुरुस्ती एकमताने संमत करून एक प्रकारचा इतिहास घडवला, असेच म्हणावे लागेल. तेव्हा झालेल्या मतदानात बाजूने ३८५ मतं, तर विरोधात एकही मत पडलं नाही. या घटनादुरूस्तीमुळे जातींना मागास ठरवण्याचा अधिकार राज्यांना आता परत मिळाला आहे. त्यासाठी आता घटनेच्या कलम '३४२ अ' मध्ये दुरूस्ती करावी लागणार आहे. त्याचप्रमाणे घटनेच्या कलम '३३८ ब' आणि कलम '३६६' मध्येसुद्धा बदल करण्याची गरज आहे. आपल्या राज्यघटनेत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी आरक्षण दिलं आहे. त्याचप्रमाणे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गांसाठी (म्हणजे ओबीसी) आयोग स्थापन करण्याची तरतूद आहे. त्यानुसार १९५२ साली काकासाहेब कालेलकर आयोग आणि १९७८ मध्ये मंडल आयोग स्थापन झाले होते. मंडल आयोगाच्या शिफारशींनुसार 'इतर मागासवर्गीय' या गटाला २७ टक्के आरक्षण मिळालेलं




आहे. आता या संदर्भात एक अतिशय महत्त्वाची मागणी समोर येत आहे. ती मागणी म्हणजे 'जातीनिहाय जनगणना' करण्याची मागणी. यासाठी दोन ऑगस्ट २०२१ रोजी पुण्यात झालेल्या 'महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या' बैठकीत यासंदर्भात एक महत्त्वपूर्ण ठराव संमत करण्यात आला. निवृत्त न्यायाधीश आनंद निरगुडे यांच्या अध्यक्षतेखाली हा आयोग स्थापन करण्यात आलेला आहे. राज्याकडे 'वस्तुनिष्ठ माहिती' (इम्पिरिकल डाटा) उपलब्ध नाही. यासाठी आता प्रशासकीय यंत्रणा राबवून जातीनिहाय जनगणना करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**जातीय जनगणनेच्या मागणीमागील इतिहास**

४ मार्च २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांतील आरक्षणाला स्थगिती दिली. त्यानंतर ओबीसी आरक्षणाचा मुद्दा तापला आणि त्याचाच एक भाग म्हणून जातीनिहाय जनगणनेची मागणी करण्यात आली आहे. यातील ताणेबाणे समजून घेण्यासाठी या विषयाचा थोडासा इतिहास समजून घेतला पाहिजे.

आधुनिक काळात 'देशाची जनगणना' ही फार महत्त्वाची बाब असते. याद्वारे गोळा केलेल्या माहितीच्या आधारेच सरकार विकासाची धोरणं ठरवतं. याला अर्थशास्त्राच्या भाषेत 'विकासासाठी माहिती' असं म्हणतात. इंग्रज सरकारने आपल्या देशात अनेक चांगल्या गोष्टी सुरू केल्या, हे मान्य करण्यास हरकत नाही. यातील एक चांगली गोष्ट म्हणजे जनगणना. आपल्या देशात पहिली जनगणना इ.स. १८७१ साली झाली. त्याकाळी इंग्रज सरकार भारतीय जनतेबद्दल सर्व प्रकारची, म्हणजे अक्षरशः सर्व प्रकारची माहिती गोळा करत असे. यात जनतेचा धर्म, शिक्षण, उत्पन्न वगैरेसोबतच जातीचीसुद्धा माहिती असे. जातीनिहाय जनगणनेची पद्धत १९३१ सालापर्यंत सुरू होती. त्यानंतर स्वतंत्र भारतात दर दहा वर्षांनी जनगणना करण्याची पद्धत सुरू राहिली, पण जातीनिहाय जनगणना बंद करण्यात आली. याचे कारण आपल्याला जातीव्यवस्था नष्ट करायची होती. प्रत्यक्षात ती किती नष्ट झाली, हा संशोधनाचा विषय आहे.

आता तर असे दिसते, की जाती-उपजातींच्या अस्मिता टोकदार झालेल्या आहेत. आधी धर्मनिहाय राजकीय पक्षं असत. आता जातीनिहाय राजकीय पक्ष निर्माण झालेले दिसतात. भारताच्या राजकारणात अतिशय महत्त्व असलेल्या उत्तर भारतात तर जातींचे राजकारण फार जोरात असते. मुलायमसिंग यादव यांचा समाजवादी पक्ष, लालूप्रसाद यादव यांचा राष्ट्रीय जनता दल, नितीशकुमार यांचा जनता दल (सेक्यलर) वगैरे पक्ष 'ओबीसींचे पक्ष' म्हणून ओळखले जातात. तसेच मायावतींचा बहुजन समाज पक्ष आणि कै. रामविलास पासवान यांचा पक्ष 'दलितांचे पक्ष' म्हणून ओळखले जातात.

**ओबीसी नेत्यांचा आक्षेप**

गेल्या काही वर्षांपासून ओबीसी नेत्यांना असे वाटायला लागले होते, की ओबीसींची लोकसंख्या सांगण्यात येते त्यापेक्षा प्रत्यक्षात खूप जास्त आहे. म्हणूनच हे नेते जातीनिहाय जनगणनेची मागणी करत आहेत. आपल्या देशात आजही १९३१ साली झालेल्या जातीनिहाय जनगणनेतील आकडेवारी समोर ठेवण्यात येते. त्यानंतर लोकसंख्येत होत असलेल्या वाढीच्या दरानुसार ओबीसींची लोकसंख्या किती वाढली असेल, याचा अंदाज बांधण्यात येतो. गेली अनेक वर्षे ओबीसी नेते या पद्धतीला आक्षेप घेत आहेत. मनमोहनसिंग सरकारने अशी जनगणना करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानुसार इ.स.

२०११ साली अशी जनगणना सुरू झाली. त्या सर्वेक्षणाचं नाव होतं 'सोशियो-इकॉनॉमिक कास्ट सेंसस'. या सर्वेक्षणासाठी सुमारे पाच हजार कोटी रुपये खर्च झाले. ग्रामीण भागातील माहिती गोळा करण्याची जबाबदारी केंद्रीय ग्रामीण विकास खात्याची होती, तर शहरी भागातील माहिती केंद्रीय गृह आणि शहरी दारिद्र्य निर्मुलन विभागाकडे होती.

सर्वेक्षणाचा अहवाल आला तेव्हा केंद्रात सत्तांतर झालेलं होतं. हे सर्वेक्षण सुरू होतं आणि अहवाल उपलब्ध झाला, तेव्हासुद्धा सर्वेक्षणाच्या कार्यपद्धतीबद्दल गंभीर आक्षेप घेण्यात आले होते. परिणामी हे सर्वेक्षण निरूपयोगी ठरले. एवढंच नव्हे तर जुलै २०२१ मध्ये केंद्रीय गृह खात्याचे राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी लोकसभेत सांगितले, की अनुसूचित जाती आणि जमाती वगळता इतर जातींची माहिती गोळा करायची नाही, असा सरकारचा निर्णय झाला आहे. तेव्हापासून नितीशकुमार, जितनराम मांझी वगैरे नेते 'असं सर्वेक्षण झालं पाहिजे', अशी मागणी करत आहेत. आता पंकजा मुंडे यांनीसुद्धा अशीच मागणी केली आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेने ८ जानेवारीला एका ठरावाद्वारे केंद्र सरकारला असे सर्वेक्षण करण्याची विनंती केली आहे. एक एप्रिल रोजी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगानेसुद्धा केंद्र सरकारला याबद्दल विनंती केली आहे.

**जातीनिहाय जनगणना गरजेची**

आपल्या देशात आणि जागतिक पातळीवरसुद्धा १९९० हे दशक फार महत्त्वाचं ठरलं. जागतिक पातळीवर सोव्हिएत युनियनचं साम्राज्य कोसळलं आणि शीतयुद्ध समाप्त झालं. भारतात 'रामजन्मभूमीचं आंदोलन' आणि 'मंडल आयोग' हे दोन मुद्दे महत्त्वाचे ठरले. या दोन्हींपैकी आजही

धगधगत असलेला मुद्दा म्हणजे ओबीसींचे आरक्षण आणि मंडल आयोगाच्या यादीत नसलेल्या जातींची आरक्षणाची मागणी. यासाठी जातीनिहाय जनगणना करणे ही गरज आहे. जातीनिहाय जनगणनेची मागणी २००१ साली झाली होती. पण तेव्हा ती मान्य झाली नाही. दहा वर्षांनंतर जेव्हा २०११ सालच्या जनगणनेची तयारी सुरू झाली तेव्हासुद्धा ही मागणी पुढे आली. तेव्हा मात्र मनमोहनसिंग सरकारला ही मागणी मान्य करावी लागली. त्यानुसार काम सुरू झाले, पण यासाठी वेगळे सर्वेक्षण करण्यात आले. पण या सर्वेक्षणातून गोळा करण्यात आलेल्या माहितीचा काहीही उपयोग झाला नाही. आता पुन्हा हा मुद्दा तापला आहे.

जातीनिहाय जनगणनेसंदर्भात दरम्यानच्या काळात झालेले बदल नोंदले पाहिजेत. स्वातंत्र्यपूर्व काळात लोक सहसा आपली खरी जात सांगत नसत. खालच्या जातीतील व्यक्ती हमखास वरची जात सांगत असत. आता यात आमुलाग्र बदल झाला आहे. जातींद्वारे मिळणारे आरक्षणाचे फायदे लक्षात घेता आज तर वरच्या जातीतील लोकसुद्धा आपण खालच्या

## *आरक्षणाची व्यापक मागणी*

***ओबीसी आणि इतर सामाजिक घटकांची शास्त्रशुद्ध माहिती सरकारकडे उपलब्ध नाही. मंडल आयोगाने ओबीसींची संख्या लोकसंख्येच्या ५२ टक्के असल्याचा अंदाज बांधला होता. त्यानुसार २७ टक्के आरक्षण दिलं. मंडल आयोगाचा अहवाल १९८० साली केंद्र सरकारला सादर करण्यात आला होता. या अहवालाची अंमलबजावणी व्हायला १९९३ साल उजाडावं लागलं. या घटनेला आता २८ वर्षे झाली आहेत. त्याच सुमारास मंडल आयोगाच्या यादीत नसलेल्या जातीसुद्धा आरक्षणाची मागणी करायला लागल्या. आता तर या मागण्यांनी उग्र स्वरूप धारण केलं आहे. महाराष्ट्रातील मराठा आरक्षण हे याचे उत्तम उदाहरण आहे.***

जातीचे आहोत, हे सांगायला कमी करणार नाहीत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या देशातील काही धोरणं मागासलेल्या जाती, जमाती व मागासलेल्या वर्गांना आर्थिक, शैक्षणिक व राजकीय सवलती देण्याच्या दिशेने आखण्यात आली. यात गैर काहीच नाही. आता मात्र यात वेगळेच राजकारण शिरलं आहे.

जातीनिहाय जनगणना ही एक बाब आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे, आरक्षणावर असलेली पन्नास टक्क्यांची मर्यादा. यासंदर्भात दोन महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. एक म्हणजे इंद्रा साहनी खटल्यातील निकाल. मराठा आरक्षणाच्या संदर्भात महाराष्ट्र सरकारतर्फे बाजू मांडतांना नेमका हाच मुद्दा पुढे आणण्यात आला होता. इंद्रा साहनी निर्णयाचा पुनर्विचार करण्यासाठी न्यायालयाने किमान अकरा न्यायमूर्तींचे खंडपीठ बसवावे, अशी मागणी महाराष्ट्राने केली होती. एवढेच नव्हे, खुद्द सर्वोच्च न्यायालयाच्या काही निर्णयांनी पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त असलेले आरक्षण वैध ठरवले आहे. हा गोंधळ दूर करण्यासाठी इंद्रा साहनी निर्णयाचा फेरविचार झाला पाहिजे, अशी महाराष्ट्र सरकारची रास्त मागणी होती.

**पुढारलेल्यांनाही हवंय आरक्षण**

मे २०२१ मध्ये दिलेल्या मराठा आरक्षणासंदर्भातील निकालात सर्वोच्च न्यायालयाने एकमताने म्हटले आहे, की इंद्रा साहनी निकालाचा पुनर्विचार करण्याची गरज नाही. या वादावादीतला दुसरा आणि महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आरक्षण फक्त 'सामाजिक' आणि 'शैक्षणिक' मागासलेपणावरच ठरवावे, की त्यात आता 'आर्थिक मागासलेपण' हा निकषसुद्धा टाकावा, हा १९९० च्या दशकापासून या संदर्भातील वाद राष्ट्रीय पातळीवर सुरू झाला. मंडल आयोगाने ओबीसींना २७ टक्के आरक्षण दिल्यापासून 'इतर पुढारलेल्या पण आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या' जातींनी आरक्षणाची मागणी करायला सुरुवात केली.

मंडल आयोगाने ओबीसी आरक्षणाचा मुद्दा जसा राष्ट्रीय पातळीवर नेला, तसाच 'आर्थिकदृष्ट्या मागासलेपण' हा मुद्दा तेव्हापासून राष्ट्रीय पातळीवर चर्चेत आलेला आहे. नरसिंहराव पंतप्रधान असताना सप्टेंबर १९९१ मध्ये त्यांनी आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांसाठी १० टक्के आरक्षण देणारा कायदा केला होता. सर्वोच्च न्यायालयाने ओबीसींसाठी दिलेले २७ टक्के आरक्षण वैध ठरवत आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांसाठी दिलेले १० टक्के आरक्षण मात्र अवैध ठरवले होते. याचा अर्थ असा, की 'आर्थिकदृष्ट्या मागासलेपण' हा मुद्दा गेली तीस वर्षे चर्चेत आहे. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयानेसुद्धा अनेकदा पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त असलेले आरक्षण वैध ठरवले आहे. यातील दुसरा उपमुद्दा १०३ व्या घटनादुरूस्तीबद्दलचा आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे आज देशात 'आर्थिक मागासलेपण' या मुद्द्यावर एकमत झालेले दिसत आहे. 'बसपा'च्या मायावती, रिपब्लिकन पक्षाचे रामदास आठवले यांनीसुद्धा 'उच्चवर्णीय पण आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या' वर्गाला आरक्षण द्यावे, अशी जाहीर भूमिका घेतलेली आहे.

**पन्नास टक्क्यांची मर्यादा कधीच ओलांडली**

१९९१ साली जसे काँग्रेस पक्षाच्या सरकारने दहा टक्के आरक्षण दिले होते, तसेच ८ जानेवारी २०१९ रोजी नरेंद्र मोदी सरकारमधील तत्कालिन साामाजिक न्यायमंत्री थावरचंद गेहलोत यांनी १०३ वी घटनादुरूस्ती करणारे विधेयक मांडले. यानुसार केंद्र सरकार आर्थिक निकषांवरसुद्धा आरक्षण देऊ शकते. हे विधेयक त्याच दिवशी लोकसभेत पारित झाले होते. दुसऱ्याच दिवशी ते विधेयक राज्यसभेत मांडण्यात आले. तेव्हा द्रमुक आणि डाव्या पक्षांनी हे विधेयक संसदेच्या समितीपुढे पाठवावे, अशी सूचना केली. मात्र तसे न करता ९ जानेवारी २०१९ रोजी हे विधेयक राज्यसभेतही मंजूर झाले. त्यानंतर नियमाप्रमाणे हे विधेयक राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीसाठी गेले आणि स्वाक्षरी होऊन १४ जानेवारी २०१९ रोजी याबद्दलचे राजपत्र प्रकाशितसुद्धा झाले.

हा प्रवास लक्षात घेतला म्हणजे ५० टक्क्यांची मर्यादा जानेवारी २०१९ मध्येच ओलांडण्याचे अधिकार केंद्र सरकारला मिळालेले आहेत. यानुसार केंद्र सरकारने आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांसाठी ९.५ टक्के जागा आरक्षित केल्या आहेत. याचा साधा अर्थ असा, की जानेवारी २०१९ पासूनच केंद्र पातळीवर आरक्षणाची टक्केवारी ५९.५ टक्के एवढी झालेली आहे. अपेक्षेप्रमाणे या घटनादुरूस्तीला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने आव्हान देणारी याचिका दाखल करून घेतलेली आहे, पण निर्णय येईपर्यंत याच्या अंमलबजावणीला स्थगिती दिलेली नाही.

**तामिळनाडूत आरक्षणाची गुंतागुंत**

तामिळनाडूत इतर मागासवर्गीय (ओबीसीत) आणि



त्यातल्या जाती-उपजातींचे राजकारण फार तीव्र आहे. थेवर आणि गाऊंडर या दोन ओबीसीतील जाती सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या शक्तिशाली आहेत. मात्र वनियार संख्येने जास्त आहेत. वनियार समाजाने संख्येच्या बळावर १९४० च्या दशकापासून राजकारणावर पकड बसवली आहे. आपल्या मागण्या मान्य करवून घेण्यासाठी आंदोलनं इत्यादी मार्ग वापरण्यात वनियार वाकबगार आहेत. यातील गुंतागुंतीचे मुद्दे समजून घ्यावे लागतात. १९५१ साली तामिळनाडूत ओबीसींसाठी २५ टक्के, तर अनुसूचित जाती/जमातींसाठी १६ टक्के आरक्षण होते. १९७१ साली करूणानिधी सरकारने हे आरक्षण अनुक्रमे ३० टक्के आणि १८ टक्के केले. आज तामिळनाडूत एकूण ६९ टक्के आरक्षण आहे. ३० टक्के ओबीसी (यात ख्रिश्चन आणि मुस्लिम येतात), २० टक्के अतिशय मागासलेल्या जाती, १८ टक्के अनुसूचित जाती आणि १ टक्का अनुसूचित जमाती, असे वर्गीकरण आहे.

यातील पक्षीय राजकारण बाजूला ठेऊन या विषयाची चर्चा करावी लागते. तामिळनाडूची एकूण लोकसंख्या अंदाजे सव्वाआठ कोटी आहे. यात ८८ टक्के हिंदू, ६.१ टक्के ख्रिश्चन तर ५.८ टक्के मुस्लिम आहेत. वनियार समाजाची लोकसंख्या सुमारे १३ ते १५ टक्के आहे. हा समाज 'मागासलेले वर्ग' या यादीत गेली अनेक वर्षे आहे. तामिळनाडूत मागासलेल्या वर्गांसाठी शैक्षणिक आणि सरकारी नोकऱ्यांत पन्नास टक्के आरक्षण आहे. वनियार समाज राज्याच्या उत्तर भागात पसरलेला आहे. यातील जास्तीत जास्त लोक शेतमजूर आहेत. इ.स. १९८७ साली या समाजाने स्वतःसाठी 'पन्नास टक्के आरक्षणात वीस टक्के एवढा खास कोटा असावा', अशी मागणी केली. यालाच आता आपण 'आरक्षणांतर्गत आरक्षण' म्हणतो.

या समाजाची मागणी १९८९ साली अंशतः मान्य झाली. याच वर्षी जुलै महिन्यात डॉ. एस. रामोदास यांनी 'पट्टाली मक्कल

## आरक्षण धोरणात बदल करण्याची वेळ

*भारतासारख्या गरीब देशात शासनव्यवस्थेला गोरगरिबांच्या मदतीसाठी, उन्नतीसाठी अनेक योजना आखाव्या लागतात. 'आरक्षण' ही अशीच एक असंख्य योजनांपैकी एक. कालानुरूप आरक्षणाच्या धोरणात योग्य ते बदल झालेच पाहिजेत. आपल्या देशात सुरुवातीला म्हणजे १९५० च्या दशकात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचे आरक्षण राष्ट्रीय पातळीवर सुरू झाले. नंतर नव्वदच्या दशकात मंडल आयोगाच्या शिफारशींनुसार ओबीसींसाठी आरक्षण सुरू झाले. आता उच्चवर्णीय, पण गरीब घटकांसाठी आरक्षणाची तरतूद करण्याची वेळ आलेली आहे. एवढेच नव्हे तर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी यांना वर्षानुवर्षे आरक्षणाच्या धोरणात कालानुरूप न्याय्य बदल करण्याचीसुद्धा वेळ आली आहे. यासाठी मद्रास उच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयाची चर्चा करावी लागते. अपेक्षेप्रमाणे एक नोव्हेंबर २०२१ रोजी मद्रास उच्च न्यायालयाने तामिळनाडू सरकारचा 'वनियार' या मागासवर्गीय समाजाला १०.५ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय 'घटनाबाह्य' ठरवत रद्द केला. फेब्रुवारी २०२१ मध्ये तामिळनाडू सरकारने या संदर्भात कायदा केला होता. जेव्हा तामिळनाडू सरकारने हा कायदा केला, तेव्हा तिथं अण्णाद्रमुक पक्ष सत्तेत होता. नंतर एप्रिल २०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांत सत्तांतर झाले आणि द्रमुक सत्तेत आला. आज देशभर असं राजकीय वातावरण आहे, की कोणताच पक्ष आधीच्या सरकारने दिलेले आरक्षण परत घेण्याची हिंमत दाखवू शकत नाही. त्याचप्रमाणे द्रमुकनेसुद्धा वनियार समाजाला दिलेले आरक्षण सुरू ठेवले. आता मद्रास उच्च न्यायालयाने ते रद्द केले आहे. न्यायमूर्ती दोरायस्वामी आणि न्यायमूर्ती के. मुरली शंकर यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.*

काची' (पी.एम.के.) या पक्षाची स्थापना केली. या पक्षावर वनियार समाजाचा वरचष्मा आहे. सरकारने मागासवर्गीयांच्या पन्नास टक्के आरक्षणात दोन उपगट केले. वीस टक्के आरक्षण 'अतिशय मागासलेले वर्ग' आणि 'विमुक्त' यांसाठी वेगळे ठेवण्यात आले. वनियारांचा समावेश 'अतिशय मागासलेले वर्ग' यात करण्यात आला. तेव्हा अशी अपेक्षा होती, की अतिशय मागासलेल्या वर्गांसाठीच्या वीस टक्के आरक्षणाचा जास्तीत जास्त लाभ वनियारांना मिळेल. मात्र 'अतिशय मागासलेले वर्ग' आणि 'विमुक्त' समाज यात वनियारांच्या जोडीने सुमारे १०९ जाती आहेत. आता तर ही संख्या ११६ झाली आहे! आता वनियार समाजाची तक्रार आहे, की त्यांना आरक्षणाचे फायदे पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत.

**आरक्षणातील आरक्षण**

वनियारांचं समाधान करण्यासाठी राज्य सरकारने २६ फेब्रुवारी २०२१ रोजी खास कायदा केला. याद्वारे 'अतिशय मागासलेले वर्ग आणि विमुक्त' यांना असलेल्या वीस टक्के आरक्षणाची तीन गटांत विभागणी केली. वनियकुल क्षत्रिय आणि वनियारांच्या इतर उपजातींसाठी १०.५ टक्के, विमुक्तांसाठी ७ टक्के आरक्षण तर उरलेले २.५ टक्के बाकीच्या अतिशय मागासलेल्या वर्गांसाठी देणात आले. ही आरक्षणांतर्गत आरक्षणाची पुढची पायरी असून यासाठी राज्य सरकारने २०१२ सालच्या दुसऱ्या मागासवर्गीय आयोगाच्या शिफारशींचा आधार घेतला.

तामिळनाडू सरकारच्या निर्णयावर अनेकांनी टीका केली होती. फक्त एकाच मागासवर्गीयांसाठी याप्रकारे वेगळा कोटा देणे कितपत योग्य आहे, हा खरा आक्षेप आहे. अलीकडेच तिथल्या सरकारने निवृत्त न्यायमूर्तींच्या नेतृत्वाखाली एक आयोग स्थापन केलेला आहे. राज्या तल्या सर्व जातींच्या लोकसंख्येबाबत शास्त्रीय माहिती गोळा करण्यासाठी सरकारने हा आयोग स्थापन केला आहे. राज्य सरकारने या आयोगाच्या अहवालाची वाट पाहायला हवी होती, हा दुसरा महत्त्वाचा आक्षेप.

ही सर्व चर्चा नजरेखालून घातली म्हणजे लक्षात येते, की आज भारतात सर्वात वादग्रस्त मुद्दा म्हणजे आरक्षण! हे धोरण १९५० च्या दशकात मान्य होऊन तेव्हापासूनच राबवण्यात येत आहे. आपल्याला गेल्या सत्तर वर्षांत आलेला आरक्षण धोरणाचा अनुभव सकारात्मक आहे. आज अनेक ठिकाणी असं दिसून येतं, की आरक्षणाने काही कुटुंबांचा, काही जातींचाच फक्त फायदा झालेला आहे. अनेक जाती अशा आहेत, ज्यांना फारसा फायदा झालेला नाही. म्हणजे सामाजिक न्यायाच्या नावाखाली सुरू झालेल्या आरक्षणाच्या धोरणातूनच आता नवीन प्रकारचा अन्याय होत आहे. ही एक वेगळीच शोकांतिका आहे. यामुळे समाजातील खऱ्या वंचितांच्या मनात राग साठलेला आहे. याचा उद्रेक होण्याआधीच आरक्षणाच्या धोरणाची न्याय्य पुनर्रचना केली पाहिजे. •••

**(लेखक राज्यशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत)**

# एस.टी. कामगारांच्या संपाचे झांगडे



कॉ. भीमराव बनसोड

*एस.टी. महामंडळ तोट्यात असल्यामुळे सरकार संपावरील कामगारांची मागणी मान्य करीत नाही. महामंडळाने अप्रत्यक्षरित्या खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबल्यामुळे एस.टी. तोट्यात असल्याचे कर्मचाऱ्यांना वाटते. मग सरकारच्या चुकीची शिक्षा आम्हाला का, असा प्रश्न करून कामगार सरकारी कर्मचारी म्हणून मान्यता मिळण्याची मागणी करत आहेत.*




२७ ऑक्टोबरपासून सुरू असलेल्या एसटी कामगारांच्या संपावर अद्याप तोडगा निघालेला नाही. राज्यात एसटीचे एकूण ९२ हजार २६६ कर्मचारी आहेत. सरकारी दडपशाहीनंतरही आज एकूण कर्मचाऱ्यांपैकी केवळ १९ हजार ८६ कर्मचारी कामावर हजर झाले. पण अजूनही ७३ हजार १८० कर्मचारी संपात आहेत. संप सुरू झाल्यापासून महाराष्ट्र शासनाने संपावरील ८१९५ कामगारांना निलंबित केले असून, १८२७ कर्मचाऱ्यांना कामावरून काढले आहे. निलंबित होणाऱ्या व कामावरून काढून टाकलेल्या कामगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. कारण संप अजूनही सुरू आहे. एसटी गाड्या पूर्वीप्रमाणे रस्त्यावर आलेल्या नाहीत.

**जीवनाचा अविभाज्य भाग**

खरं म्हणजे, महाराष्ट्राच्या विकासात सहकार क्षेत्राने जशी मोलाची भागिदारी केली, तशीच भागिदारी वाहतुकीच्या क्षेत्रात एस.टी. महामंडळाच्या लाल पऱ्यांनी केली. महाराष्ट्राच्या दुर्गम, ग्रामीण भागापर्यंत पोचणाऱ्या या एसटी बस म्हणजे शरीररूपी महाराष्ट्राच्या रक्तवाहिन्याच ठरल्या आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाच्या व त्यातही ज्येष्ठ नागरिकांच्या, विद्यार्थी, मुले-मुली यांच्या जीवनाचा एसटी अविभाज्य भाग बनलेली आहे.

स्वातंत्र्यापूर्वी व नंतरही काही काळ देशातील इतर क्षेत्राप्रमाणे महाराष्ट्रातही वाहतूक क्षेत्र खाजगी कंपन्या अथवा व्यक्तिंच्या ताब्यात होते. मी दुसरी - तिसरीच्या वर्गात असताना नागपूर रोडवर असलेल्या माझ्या गावातून प्रवासाची खाजगी वाहतुकीची व्यवस्था असल्याचे मला आठवते. त्यावेळी रस्ते आजच्यापेक्षाही जास्त खराब होते. अशा रस्त्यावरून जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणापर्यंत अथवा मोठ्या गावापर्यंत ही प्रवासी वाहतूक होती. रस्त्याप्रमाणेच त्यावेळच्या गाड्यांचीही अवस्था वाईटच होती. आजच्या एसटी महामंडळाच्या गाड्यांपेक्षाही त्या वाईट परिस्थितीत होत्या. मोठ्या असलेल्या गाड्यांना प्रॅन्सिल व लहान असलेल्या गाड्यांना हाफ्टन म्हणत. ही नावे कोणी व कशी दिली, हे माहीत नाही. पण प्रॅन्सिलपेक्षा निम्म्या आकाराची ही हाफ्टन होती. म्हणून तिला हाफ्टन म्हणत असावेत असे वाटते. त्यावेळी या गाड्या ऑटोस्टार्ट असण्याचे काही कारणच नव्हते. तेवढी यांत्रिक प्रगती अजून झालेली नव्हती. म्हणून थोडे पैसे मिळण्याच्या आशेवर गावागावातील प्रवासी बसवून देणाऱ्या व्यक्तिंना या गाड्यांच्या इंजिनमध्ये झेड आकाराचे लोखंडी रॉड फिट करून तो रॉड ताकदीने फिरवून त्यामार्फत इंजिनाला गती द्यावी लागत होती. नंतर या गाड्या चालू होत होत्या. अशी एकंदर गाड्यांची व वाहतुकीची परिस्थिती होती. पुढे चालून अशा खाजगी गाड्यांवरील सर्व ड्रायव्हर्सना एसटी महामंडळात सामावून घेण्यात आले.

**बिनबुडाचे नेतृत्व**

महाराष्ट्रात सार्वजनिक प्रवासी वाहतूक १९३२ पासून सुरू आहे. पण ही वाहतूक वर सांगितल्याप्रमाणे खाजगी क्षेत्रातच होती. खाजगी क्षेत्रासाठीसुद्धा पुढे चालून वाहतुकीचे नियम व कायदे करण्यात आले. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषावार प्रांतरचना करण्यात आली. १९४८ मध्ये मुंबई स्टेट रोड कॉर्पोरेशन नावाने प्रवासी वाहतूक करण्यासाठी सरकारी कंपनी स्थापन करण्यात आली. प्रवाशांच्या सार्वजनिक वाहतुकीचा एकाधिकार या कंपनीला देण्यात आला. पुढे संयुक्त महाराष्ट्र चळवळ झाली. परिणामी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला. त्या वेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असलेल्या यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली याआधीच्या वाहतूक कंपन्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एमएसआरटीसी कॉर्पोरेशनमध्ये) विलीन करण्यात आल्या. अशा या एसटी महामंडळाला सरकारच्या धोरणानुसार पुन्हा एकदा खासगीकरणाकडे ढकलण्यात येत आहे. म्हणूनच एस.टी. महामंडळाला राज्य सरकारचा उपक्रम समजून या महामंडळातील सर्व कामगार, कर्मचाऱ्यांना सरकारी नोकराप्रमाणे पगार व इतर सवलती द्याव्यात ही संपकऱ्यांची मागणी आहे. पण सरकार ही



मागणी मान्य करायला तयार नाही. विलिनीकरणासाठी त्यांनी एक समिती नेमली आहे. या मागणीबाबत तात्काळ निर्णय घेता येणार नाही. सर्व बाजूंचा अभ्यास करून निर्णय घ्यावा लागेल. त्यासाठी वेळ लागेल म्हणून आम्ही समिती नेमली आहे, असे परिवहनमंत्री आणि या महामंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष असलेले अनिल परब यांचे म्हणणे आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व आघाडी सरकारचे सर्वेसर्वा असलेले ज्येष्ठ नेते खा. शरद पवार यांचीही हीच भूमिका आहे. मनसेप्रमुख राज ठाकरे, भाजप व या पक्षाचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी सरकारचे विरोधक या नात्याने संपकऱ्यांची बाजू लावून धरली होती. पण सत्तेत असताना भाजपने याबाबत फारसे काही केले नव्हते, हे या कर्मचाऱ्यांसह सर्व जनतेला माहीत आहे. पण या विरोधी पक्षीय नेत्यांनी या आंदोलनाचे नेतृत्व करण्याचा प्रयत्न केला असला तरी आणि त्याबाबत त्यांच्या सरकारशी काही वाटाघाटी होऊन काही बाबी निष्पन्न झाल्या असल्या तरी त्या मान्य करण्यास संपावरील कर्मचारी अजिबात तयार नाहीत. त्यामुळे हे नेतृत्व तसे बिनबुडाचे ठरले आहे. कोणतीही युनियन त्यांचे नेतृत्व करण्यास सध्यातरी सक्षम नाही. त्यामुळे सर्वांकडूनच हे आंदोलन निसटले आहे, असेच म्हणावे लागेल.

सरकारने एस.टी. कामगार कर्मचाऱ्यांची विलिनीकरणाची प्रमुख मागणी वगळता इतर मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यापैकी एक म्हणजे या कर्मचाऱ्यांचा सध्या असलेला १२ टक्के महागाई भत्ता वाढवून तो २८ टक्के करण्यात आला असल्याचे सांगितले आहे. घरभाडे भत्ताही वाढवून दिल्याचे सरकारने सांगितले आहे.

**पगारवाढ होऊनही नाराजी**

जे कर्मचारी १ ते १० वर्षे या श्रेणीत आहेत, या कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात ठोक ५ हजारांची वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. ज्यांचं मूळ वेतन १२ हजार ८० रुपये होतं, त्यांचं वेतन आता १७ हजार ३९५ झालं आहे. मूळ वेतन १७ हजार ८० वरून २४ हजार ५८४ रुपये झालं आहे. त्यामुळे जवळपास ७ हजार २०० रुपयांची पगारवाढ पहिल्या श्रेणीतल्या कर्मचाऱ्यांची झाली आहे. १० ते २० वर्षांपर्यंतच्या कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात ४ हजारांची वाढ केली आहे. त्यामुळे ज्यांचा पूर्ण पगार २३ हजार ०४० होता तो आता २८ हजार ८०० रुपये झाला आहे.

२० वर्षांहून अधिक काळापासून सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारात २ हजार ५०० रुपयांनी वाढ करण्यात आली. त्यामुळे त्यांचे मूळ वेतन २६ हजार आणि एकूण वेतन ३७ हजार ४४० होतं, त्यांचं वेतन आता ४१ हजार ०४० झालं आहे. ज्यांचं मूळ वेतन ३७ हजार होतं आणि एकूण वेतन ५३ हजार २८० होतं, त्यांना २५०० रुपयांची वाढ केल्यामुळे मूळ वेतन ३९ हजार ५०० तर एकूण वेतन ५६ हजार ८८० होईल. पण याबाबत या कामगार कर्मचाऱ्यांचे म्हणणे असे आहे, की सरकारकडे कामगारांचा सध्या आहे तोच पगार द्यायलासुद्धा पैसे नसतात. यापूर्वी दोन-दोन, तीन-तीन महिने आमचा पगार पैशाअभावी थकत होता. अशा परिस्थितीत आता आमचे पगार माननीय कोर्टाच्या निकालामुळे नियमित होत असले तरी वाढीव महागाई भत्ता धरून नियमित पगार होण्याची शक्यता कमीच आहे.

कामगार संघटनांशी झालेल्या चर्चेत सरकारकडून सांगण्यात आले, की गेल्या वर्षी कोरोनामुळे एसटी आर्थिक नुकसानीमध्ये होती. अशा स्थितीत राज्य सरकारने एस.टी.महामंडळाला कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी २ हजार ७०० कोटींची मदत केली होती. तरीही काही कारणास्तव त्यांचे पगार उशिरा होत होते. त्यातून निर्माण होणाऱ्या आर्थिक समस्येमुळे काही कामगारांनी आत्महत्या केल्या. म्हणून राज्य शासनाने त्यांचा पगार प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत देण्याची हमी घेतली आहे. पण केवळ या आश्वासनाने तूर्त तरी संप मागे घेतला जाण्याची शक्यता दिसत नाही. संप सुरू झाल्यानंतर सरकारने घेतलेल्या आडमुठ्या भूमिकेमुळे काही महिला व पुरुष कामगारांनी निराशेपोटी आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. अत्यंत तुटपुंज्या

पगारातून निर्माण होणाऱ्या आर्थिक तणावामुळे संपाच्या १८ व्या दिवसापर्यंत राज्यभरातून ३७ कामगारांनी आत्महत्या केल्या. आता ही संख्या वाढली असण्याची शक्यता आहे.

**मागणीत तथ्य आहेच**

हे एस.टी. कामगार, कर्मचारी शासकीय कर्मचारी म्हणून सामावून घेण्याच्या मागणीवर इतके ठाम का आहेत? तर या एस.टी. महामंडळात ज्यांची वीस-वीस, पंचवीस-पंचवीस वर्षे नोकरी झाली असेल, अशा कामगारांच्या हातात प्रत्यक्षात केवळ दहा ते बारा हजार रुपये पडतात आणि नवीन लागलेले कामगार आहेत, त्यांना चार ते आठ हजार रुपयांपर्यंत पगार मिळतो. एवढ्या तुटपुंज्या पगारात कोणाही कामगाराला आपल्या संसाराचा गाडा ओढणे या वाढत्या महागाईच्या काळात अत्यंत कठीण झाले आहे. त्यामुळे त्यांच्या मागणीत निश्चितच तथ्य आहे.

राज्यभर एसटीच्या १६,००० बसेस चालतात. ६५ लाखांपर्यंत प्रवासी रोज एसटीतून प्रवास करतात. यातून मिळणाऱ्या नफ्यामधून एसटी कर्मचाऱ्यांचे पगार आणि इतर खर्च केला जातो. पण कोरोनाच्या काळात एसटीचा तोटा १० हजार कोटींच्या घरात गेल्याचे सरकार सांगते. या संपाविरोधात सरकारने तडकाफडकी उच्च न्यायालयात जाऊन हा संप बेकायदेशीर असल्याचा आदेश मिळविला. सरकार या कर्मचाऱ्यांवर दडपशाही करणार नाही, असे जरी परिवहन मंत्री अनिल परब यांनी सांगितले असले तरी, त्यांनी हेही सूचित केले आहे, की कोर्टाच्या आदेशाचा अवमान झाल्यामुळे जे काही आम्हाला करणे भाग पडेल ते आम्ही करू. याचा अर्थ असा, की ते या कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करतील आणि त्यानुसार त्यांनी आतापर्यंत प्रत्येक जिल्ह्यातून संपावरील किमान २५ ते १०० कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. त्यांच्या निलंबनाचा कामगार, कर्मचाऱ्यांच्या धैर्यावर विपरित परिणाम होऊन ते कामावर परत येतील असे सरकारला वाटते. त्या दृष्टीने त्यांनी काही आगारांमधून तुरळक बसगाड्या सुरू झाल्या असल्याचे वातावरण निर्माण केले आहे. कामावर येणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोणीही रोखू शकणार नाही, रोखल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा दमही दिला. पण सरकारच्या या कारवाईचा फारसा उपयोग झाल्याचे दिसत नाही.

**कामगार, कर्मचाऱ्यांना त्रास**

संपकऱ्यांची प्रमुख मागणी मान्य न करण्यामागे एसटी महामंडळ तोट्यात असल्याचे प्रमुख कारण सरकार सांगते. त्यामुळे एस.टी. महामंडळाकडे या कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यासाठी लागणारे पैसे नसल्याने या मागणीचा विचार करण्यासाठी कमिटी नेमल्याचे सांगून सरकार वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करीत आहे. एस.टी. महामंडळ तोट्यात आहे, ही खरी गोष्ट असू शकेल; परंतु ते तोट्यात का आहे? त्याला कामगार, कर्मचारी, कंडक्टर, ड्रायव्हर जबाबदार आहेत काय? नाही. मग त्यांनी याचे भोग का भोगावेत? एस.टी. महामंडळ चालविणारी आतापर्यंतची आघाडीची, युतीची सर्वच सरकारे, परिवहनमंत्री यांसारख्या लोकांनी केलेला भ्रष्टाचारी व्यवहार हे या महामंडळाच्या आर्थिक तोट्यासाठी मुख्यत: जबाबदार आहे. मग सरकार जर या आर्थिक तोट्यासाठी जबाबदार असेल तर त्याचा भुर्दंड सामान्य जनतेने व या कामगार, कर्मचाऱ्यांनी का म्हणून सोसावा, हा खरा प्रश्न आहे. हे महामंडळ तोट्यात असल्याने महाराष्ट्र सरकारने नुकतेच प्रवाशांकडून १७ टक्के भाडेवाढ वसूल करण्याचा निर्णय घेऊन त्याची लगेच अंमलबजावणीही केली. तेव्हा याचा भुर्दंड प्रवासाच्या काळात तात्पुरता का होईना सर्वसाधारण नागरिकांना सोसावा लागतो. पण याचा कायमचा भुर्दंड त्या महामंडळात काम करणाऱ्या कामगार, कर्मचाऱ्यांना बसतो आहे.

तेव्हा बसस्थानकावरील गाळे, हॉटेल भाड्याने देण्यात, शिवशाही बस खरेदी करून त्याचा बोजा महामंडळावर टाकण्यात, ब्रिक्सला स्वच्छतेचे कंत्राट देण्यात, बसमध्ये वाय फाय

## राज्य सरकार अपयशी

*कोणत्याही आंदोलनावर दडपशाही करण्यापूर्वी त्या आंदोलनाला समाजाचा पाठिंबा मिळू नये यासाठी समाजातील बहुसंख्य घटकांना आंदोलनाविरोधात उभे करावे लागते. तशी त्या समाजघटकांची मानसिक तयारी करावी लागते. त्या दृष्टीने देशभर गाजलेल्या शेतकरी आंदोलनाला ते माओवादी, नक्षलवादी, पाकिस्तानवादी, खलिस्तानवादी आहेत, अतिरेकी आहेत, त्यांना पाकिस्तानातून व विदेशातून पैसा मिळतो वगैरे बाबी सांगून, ज्याप्रमाणे देशातील जनतेला त्याविरोधात उभे करण्याचा प्रयत्न केंद्रातील भाजप सरकारने केला, तद्वतच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या संपकऱ्यांना कामावर परत येण्याचे आवाहन करत असताना असे सांगितले, की सध्या दिवाळीचा मोसम आहे. वाहतूक जास्त वाढलेली आहे. अशा परिस्थितीत प्रवाशांची गैरसोय होणार नाही यासाठी या कर्मचाऱ्यांनी तूर्त त्यांचा संप मागे घ्यावा. सरकारने त्यांच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यासाठी कमिटी नेमली आहे. असे आवाहन करण्यामागचा त्यांचा हेतू हाच आहे, की समाजातील इतर समाजघटकांनी या कर्मचाऱ्यांच्या विरोधात उभे राहावे. पण त्या प्रयत्नात अजून तरी महाराष्ट्र सरकारला यश आले नाही. शेतकऱ्यांच्या आंदोलनाविरोधात जसे केंद्र सरकार अपयशी ठरले तसेच एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत राज्य सरकार अपयशी ठरले, असे म्हणावे लागेल.*



बसवण्यात, तिकीट मशीन खरेदी करण्यात, बस सॅनिटायजिंगचे कंत्राट देण्यात, बसचे स्टील बॉडीत रूपांतर करण्यात, एसएलडी युनिट खरेदी करण्यात, एलईडी बसबोर्ड खरेदी करण्यात भ्रष्टाचार झाल्याची माहिती कामगार, कर्मचाऱ्यांना आहे. पण ते त्या विरोधात कर्मचारी या नात्याने बोलण्याला धजावत नाहीत; परंतु एस.टी. महामंडळ तोट्यात का आहे, त्याचे खरे कारण त्यांना माहीत असल्यामुळे ते या संपात जोरदारपणे उतरलेले आहेत.

**खाजगीकरणाचे धोरण जबाबदार**

एस.टी. महामंडळ तोट्यात असण्याला सरकारने घेतलेले खाजगीकरणाचे धोरणही तितकेच जबाबदार आहे. या धोरणानुसार त्यांनी एक प्रकारे अवैध वाहतुकीला परवानगी दिल्यासारखेच आहे. त्यामुळे ज्यातून बऱ्यापैकी नफा होऊ शकेल, असे मार्ग त्यांनी खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन मिळेल याप्रकारे सुरू ठेवले आहेत. मोठमोठ्या शहरांत जाणाऱ्या रात्रीच्या खासगी ट्रॅव्हल्स हे त्याचे एक मोठे उदाहरण आहे. त्यामुळेही एस.टी.चा धंदा पूर्वी ज्याप्रमाणे जोरात चालत होता, तसा तो आता चालत नाही. त्याचप्रमाणे सरकारने अवैध वाहतुकीला कायदेशीर परवानगी दिल्यामुळेसुद्धा एस.टी. महामंडळाला तोटा होत आहे, अशी कर्मचाऱ्यांची भावना आहे.

पण खाजगीकरणाचे धोरण हे केवळ आताच्या याच सरकारचे धोरण नाही तर यापूर्वीच्या सर्वच राज्य सरकारांचे, युती व आघाडी तसेच केंद्रामध्ये सत्तेत राहिलेले यूपीए १ व २ असो किंवा मग त्यापूर्वीचे किंवा आताचे एनडीए सरकार असो, या सर्वांनीच खाजगीकरणाचे धोरण राबविल्यामुळे केवळ एसटी महामंडळच नव्हे तर, सर्वच सरकारी, सहकारी क्षेत्र, सरकारने हेतूपुरस्सर डबघाईला आणलेले आहे. कारण या सर्वच सरकारांवर प्रभाव असलेल्या देशातील राज्यकर्त्या वर्गाच्या आणि कार्पोरेट घराण्यांच्या हितसंबंधांना ही सरकारे बांधलेली असल्यामुळे ते खाजगीकरणाचे धोरण राबवितात. ही सार्वजनिक क्षेत्रे सरकार अदानी, अंबानी यांसारख्या मोठ्या कार्पोरेट घराण्यापासून तर ठिकठिकाणच्या जिल्हा, तालुका पातळीवरील लहान-मोठ्या खाजगी उद्योजकांना देण्याचे धोरण सरकारने घेतले आहे. त्यामुळे एस.टी महामंडळाला या धोरणाचा फटका बसला आहे. त्यामुळे केवळ एस.टी महामंडळ तोट्यात नाही, तर सरकारी मालकीच्या शेती महामंडळापासून ते मत्स्यबीज आणि वीज महामंडळही तोट्यात आहे. त्यातील बरीचशी महामंडळे तर राज्य सरकारने गुंडाळूनच ठेवली आहेत. केंद्र सरकारनेही अनेक महामंडळांचे (नॅशनल टेक्स्टाईल कार्पोरेशनपासून ते बीएसएनएलपर्यंतच्या सर्व कार्पोरेशनचे) विभाजन आणि खाजगीकरण करून ती विक्रीला काढलेली आहेत. सरकारची म्हणून जी कोणती महामंडळे असतील, ती सर्व सरकारने जाणीवपूर्वक तोट्यात आणलेली आहेत, जेणेकरून तोट्याचे भांडवल करून त्यांचे खासगीकरण करण्याचे वातावरण तयार करता येईल. खाजगी उद्योजकांना व त्यांचे जे कोणी सगे-सोयरे, नातेवाईक, कंत्राटदार, व्यापारी, कारखानदार, बिल्डर असतील या सर्वांना हे उद्योगधंदे मातीमोल किमतीने देता येतील, असा हा सर्व सरकारांनी ठरवून केलेला व्यवहार आहे. अशा प्रकारे सरकारी, निमसरकारी, सहकारी, मंडळे व महामंडळे मोडकळीस आणण्याचे धोरण असल्यामुळे, त्याचे भोग देशातील सर्वच कामगार, कर्मचाऱ्यांना व तमाम जनतेला भोगावे लागत आहेत. ही वस्तुस्थिती या संपाने अधोरेखित केली आहे.

**केंद्राच्या खाजगी क्षेत्राला पायघड्या**

सध्याचे केंद्र सरकार केवळ विमानतळेच नव्हे तर विमान वाहतूकसुद्धा अदानी, अंबानी, टाटा, बिर्ला यांना देण्याच्या प्रयत्नात आहे. एअर इंडिया कंपनी नुकतीच टाटांना विकली आहे. काही विमानतळे अदानींना चालवायला दिलेली आहेत. रेल्वे वाहतुकीचेसुद्धा खाजगीकरण करण्याचा विचार बोलून दाखवलेला आहे. अशा परिस्थितीत केंद्राच्या पावलावर पाऊल टाकून राज्य सरकारेसुद्धा चालतात. तेव्हा अशा एकूण वातावरणात कर्मचाऱ्यांनी एस.टी. महामंडळाला सरकारमध्ये सामील करून घ्यावे व आम्हाला सरकारचे कर्मचारी म्हणून मान्यता द्यावी, या मागणीसाठी एकजुटीने बेमुदत संपासारखे आंदोलन करून मोठीच हिंमत दाखविली आहे. •••

**(लेखक कामगार चळवळीतील कार्यकर्ते आहेत)**

# प्रबोधनकारी महाराष्ट्रातून
# बहुजनांनाच का केले डिलीट?




**डॉ. श्रीमंत कोकाटे**

***पत्रकार गिरीश कुबेर यांनी त्यांच्या 'रिनेसन्स स्टेट-दि अनरिटन स्टोरी ऑफ द मेकिंग ऑफ महाराष्ट्र' या पुस्तकात महाराष्ट्राचा इतिहास मांडताना ब्राह्मण्यवादी मंडळींचं जोरदारपणे उदात्तीकरण केलं. मात्र त्याचवेळी परिवर्तनवादी चळवळीत अमूल्य योगदान देणाऱ्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, अण्णा भाऊ साठे यांचा उल्लेख मात्र जाणीवपूर्वक टाळला. त्यामुळे कुबेर यांनी प्रबोधनकारी महाराष्ट्राच्या इतिहासातून बहुजनांना का डिलीट केले, असा प्रश्न महाराष्ट्र विचारत आहे.***

पत्रकार, लेखक गिरीश कुबेर यांनी त्यांच्या 'रिनेसन्स स्टेट-दि अनरिटन स्टोरी ऑफ द मेकिंग ऑफ महाराष्ट्र' या ग्रंथात महाराष्ट्राच्या मानबिंदूची यथेच्छ बदनामी केलेली आहे. इतिहासाची मोडतोड करून ब्राह्मणी वर्चस्व महाराष्ट्राच्या माथी मारण्याचे अत्यंत विकृत काम कुबेरांनी केलेले आहे. त्यामुळे कुबेरांना प्रचंड विरोध झाला. अगदी नाशिक येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात त्यांना तोंड काळं करूनच भाषणाला उभं राहावं लागलं. एखादा स्वाभिमानी माणूस असता तर पोलिसात तक्रार दिली असती; परंतु तक्रार न देता उद्दामपणे तेथे भाषणही ठोकलं.

**अभिव्यक्ती स्वातंत्र्य बदनामीसाठी नाही**

कुबेरांचं तोंड काळ केल्यानंतर त्यांच्या काही समर्थकांनी त्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे असे म्हणून त्यांचे तोंड काळे करणाऱ्या संभाजी ब्रिगेडचा निषेधदेखील केला. संभाजी ब्रिगेड ही संघटना संविधानिक मूल्यांची पालन करणारी संघटना आहे. अनेक वेळा संविधानाच्या रक्षणासाठी पुढे आलेली आहे. आम्ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे समर्थक आहोत. संविधानाने अभिव्यक्ती स्वातंत्र्य विचार व्यक्त करण्यासाठी दिलेले आहे, महापुरूषांची बदनामी करण्यासाठी नाही. कुबेरांनी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज इत्यादी महामानवांची बदनामी करण्याचा अपराध केलेला आहे. संभाजी ब्रिगेडचा निषेध करणारे खरेच प्रामाणिक असतील, तर त्यांनी पहिला निषेध कुबेरांचा करायला हवा. जे कुबेरांसारख्या विकृत, घाणेरड्या व्यक्तीचे समर्थन करतात, त्यांचे पुस्तक इंटरेस्टिंग म्हणून प्रमोशन करतात, त्यांना शिवराय, फुले, शाहू, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात राहण्याचा अधिकार नाही. त्यांचंही




तोंड काळं करायला पाहिजे.

**प्रतिवाद करणारा लेख लोकसत्ताने का टाळला?**

कुबेरांचे हे पुस्तक म्हणजे पुरंदरेंचा इंग्लिश अवतार आहे. कुबेरांसारख्या विकृत व्यक्तीचे समर्थन करणाऱ्या ढोंगी पुरोगाम्यांमुळे महाराष्ट्राचे अतोनात नुकसान झालेले आहे. अनेक तथाकथित विचारवंत, नेते म्हणतात, की 'विचारांची लढाई विचारांनीच लढली पाहिजे.' हे अगदी बरोबर आहे. विचारांची लढाई विचारांनीच झाली पाहिजे. मग काय, कुबेरांनी चूक केली म्हणून आपणही चूक करायची काय? विचाराने लढायला मूळ विचार तर हवा. बरं, कुबेरांच्या विकृत पुस्तकाचा प्रतिवाद करणारा वैचारिक लेख 'लोकसत्ता'कडे पाठवला होता, तो विचारांची भाषा बोलणाऱ्यांनी का छापला नाही? याउलट त्यांचे कौतुक करणाऱ्या मिलिंद म्हैसकरांचा लेख मात्र 'लोकसत्ता'ने छापला.

**अभिजात मराठी भाषेचे शत्रू**

कुबेरांनी प्रस्तुत पुस्तकात प्रचंड गरळ ओकलेली आहे. महाराष्ट्राच्या हीरकमहोत्सवी वर्षातच महाराष्ट्राची भाषा, इतिहास, संस्कृती, लोकजीवन यांच्यावर सनातनी नांगर फिरवला आहे. मराठी भाषा ही प्राकृतपासून विकसित झालेली अभिजात भाषा आहे, असे विद्वान सांगतात. तिला कुबेर संस्कृतची शाखा आहे, असे लिहून मराठीचा मुडदा पाडतात. कुबेरांसारख्या अर्धवटरावांमुळेच आजपर्यंत मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला नाही. त्यामुळे कुबेर हे अभिजात मराठी भाषेचे शत्रू आहेत.

रिनेसन्स म्हणजे पुनर्जागरण चळवळ, प्रागतिक विचार; परंतु कुबेरांमध्ये सनातनी विचार ठासून भरलेले आहेत. कोंडदेव-रामदास हे शिवरायांचे गुरू नसताना त्यांना शिवरायांच्या गुरूस्थानी आणण्याची चूक कुबेरांनी केलेली आहे. छत्रपती संभाजीराजे पराक्रमी, बुद्धिमान, लोककल्याणकारी राजे असतानादेखील त्यांना खलनायक दाखविण्याचे काम कुबेरांनी केलेले आहे. ''सोयराबाईंची हत्या संभाजीराजांनी केली. शिवाजीराजांनी संभाजीराजांना कैदेत ठेवले होते. संभाजींकडे गुणवत्ता नव्हती. राजारामांकडे योग्यता नव्हती. बाजीराव पेशवा मात्र शिवाजीच्या योग्यतेचा होता.'' अशी धातांत खोटी, निराधार, बदनामीकारक विधानं कुबेरांनी सदर पुस्तकात लिहिलेली आहेत. कुबेरांनी अनेक घराण्यांची यादी दिलेली आहे; परंतु नागनिका, प्रभावती गुप्ता, अहिल्याबाई होळकर यांचा साधा नामोल्लेखदेखील केलेला नाही.

**सावरकरांचे कौतुक, मात्र कर्मवीरांना टाळले**

महाराष्ट्राच्या प्रबोधन पुनर्जागरण चळवळीत मोलाचे योगदान असलेल्या महात्मा बसवेश्वर, चक्रधर स्वामी, संत तुकाराम महाराज, महर्षी वि.रा. शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, अण्णा भाऊ साठे यांचा साधा नामोल्लेखदेखील या पुस्तकात नाही. मात्र ज्ञानेश्वर, रामदास, टिळक, हेडगेवार, सावरकर इत्यादींचे तोंडभरून कौतुक आहे. महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी लढ्यात वि.रा. शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, अण्णा भाऊ साठे यांचा काहीही वाटा नाही, असे कुबेरांना वाटते काय?

राजर्षी शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड यांच्याबाबत फक्त पासिंग कॉमेंट करून पुढे जाणाऱ्या कुबेरांनी न्या. रानडे, टिळक, छत्रे, गोळवलकर यांचे तोंड फाटेपर्यंत कौतुक केले आहे. जातीयवादी टिळकांना आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणणारे कुबेर कोणत्या लाईनचे आहेत, हे न समजण्याइतका आधुनिक महाराष्ट्र दूधखुळा राहिलेला नाही.

**महाराष्ट्राची माफी नाही**

बहुजनांतील निवडक महापुरूषांचे, नेत्यांचे कौतुक करायचे आणि उर्वरित महाराष्ट्राच्या प्रतीकांवर, अस्मितेवर गोळ्या घालायच्या, हे पाताळयंत्री-कपटी कारस्थान कुबेरांनी सदर पुस्तकात केलेले आहे. आपण काही नेत्यांच्या मर्जीमुळे मनमानी करू, महाराष्ट्राची विटंबना करू असा जर कुबेरांचा समज असेल तर कुबेरांना प्रागतिक महाराष्ट्र कदापिही माफ करणार नाही. कुबेरांना थोडफार काही असेल तर, त्यांनी वैचारिक वादासाठी तयार राहावे किंवा बदनामीकारक मजकूर वगळावा किंवा पुस्तक मागे घ्यावे.

**(लेखक परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते आहेत)**


पाक्षिक **द पीपल्स पोस्ट** समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

**द पीपल्स पोस्ट ची वर्गणी बँक ट्रान्सफरने भरण्यासाठी तपशील**

बँक :- **स्टेट ऑफ इंडिया, समर्थ नगर शाखा, औरंगाबाद.**

खाते : - **द पीपल्स पोस्ट** खाते क्र. : - **३७८५६३७३४१९**

आयएफएससी क्र. :- SBIN0007919 एमआयसीआर क्र. :- **४३१००२०१०**

टीप :- पैसे ट्रान्सफर केल्यानंतर ७३५००९१५६९ या क्रमांकावर एसएमएसद्वारे अथवा thepeoplespost2014@gmail.com या ईमेलवर कळवावे.

**वार्षिक वर्गणी :- ५०० रु. सहामाही वर्गणी :- ३०० रु.**

चेक/डीडी ''द पीपल्स पोस्ट'' या नावाने व्यवस्थापक 'द पीपल्स पोस्ट' कार्यालय सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेट जवळ, औरंगाबाद - ४३१००१ या पत्यावर पाठवावेत.

# क्रांती-प्रतिक्रांती



बी.जी. वाघ

***कुठल्याही बदलाची सुरुवात धार्मिक व सांस्कृतिक बदलांनीच होत असते. ख्रिश्चन धर्मामुळे ज्यू व रोमन संस्कृती मागे पडल्या. ख्रिस्ती धर्म पुढे राजधर्म झाला. धर्मसत्ता आणि राजसत्ता एकत्र आल्याने चर्चने पुष्कळ धार्मिक जुलूम केले. इस्लामचा उदय झाल्यानंतर ख्रिश्चन आणि इस्लाम धर्मियांतील संघर्षामुळे युरोपचे सर्व चित्र बदलले. ते केवळ सांस्कृतिक, धार्मिकच नव्हते तर आर्थिक, राजकीयदेखील होते. ही सर्व क्रांती-प्रतिक्रांतीचीच अनेक रूपे होती.***

**(धर्म एक चक्रव्यूह)**

माणसाला आपल्या अस्तित्वाची होणारी तर्कशुद्ध जाणीव म्हणजे विद्रोह म्हणता येईल. माणूस तर्कशुद्ध पद्धतीने विचार करील तर व्यवस्थेविरुद्ध बंड करीलच. अन्याय म्हणजेदेखील माणसाला होणारी तर्कशुद्ध जाणीवच असते. त्यामुळे माणूस आपल्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांची कारणे शोधतो. बुद्धाने सांगितल्याप्रमाणे प्रत्येक घटनेमागे कारण असतेच. माणूस जर या अनैतिक व्यवस्थेविरुद्ध बंड करणार नसेल तर त्याला माणूस म्हणता येणार नाही. माणसाने व्यवस्थेविरुद्ध निरंतर बंड करीत राहिले पाहिजे, असे सार्त्रने म्हटले आहे. कामू आपल्या 'रिबेल'मध्ये (Rebel) बंडाची मांडणी करतो. क्रांती ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे, असे मार्क्सने म्हटले आहे. माओची सांस्कृतिक क्रांतीदेखील अशाच विचारांचे प्रतीक आहे. माणसे मनाने गुलाम होतात ते सांस्कृतिक व्यवस्थेमुळेच. धर्म माणसाला बंड करू देत नाही. कारण धार्मिक व्यवस्था ईश्वर प्रणित असते, अपरिवर्तनीय असते. त्यामुळे जोपर्यंत आपण 'धर्म' या संस्थेशी लढत नाही, तोपर्यंत खऱ्या क्रांतीला, परिवर्तनाला सुरुवात होत नाही. बुद्धाने ब्राह्मणी धर्म आणि व्यवस्थेविरुद्ध बंड केले ते तर्क, विवेक आणि प्रज्ञेच्या जोरावरच.

**क्रांती अंतर्बाह्य व्हावी लागते**

सत्य- असत्य जाणण्याची माणसाची अंगभूत क्षमता म्हणजे प्रज्ञा होय. तिचा निरंतर विकास करीत राहिल्यानेच आपण खऱ्या ज्ञानाकडे, सत्याकडे जाऊ शकतो. त्यासाठी प्रत्येक गृहीत कल्पना, धारणा, परंपरा यांना नाकारावेच लागते. म्हणजे खऱ्या बंडाची सुरुवात माणसाच्या मनातच होत असते. आपण अंधश्रद्धेला श्रद्धा मानतो, असत्याला सत्य मानतो आणि अधर्माला धर्म मानतो, याचे कारण आपण मनाने मृत झालेलो असतो. धर्माचे विष किंवा अफू आपल्या रक्तात पसरलेली असते. त्यासाठी आत्मशोधाची, आत्मचिंतनाची आवश्यकता असते. बुद्धाने म्हणूनच प्रज्ञेला सर्वोच्च स्थान दिले



आहे. त्याशिवाय मानवाप्रती, समाजाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्याची आपल्याला जाणीव होत नाही. क्रांती ही बाहेरूनच नाही, तर आतूनही व्हावी लागते. जीवन नश्वर आहे. त्याची चिंता करण्याची आवश्यकता नाही. शाश्वत जीवनाचा विचार करा. ते फक्त ईश्वर देऊ शकतो. जग मिथ्य आहे, माया आहे म्हणणारे दुसरे एक तत्त्वज्ञान माणसाला आपल्या अस्तित्वाची तर्कशुद्ध जाणीव होऊ देत नाही. त्यामुळे नवे ज्ञान, विज्ञान वा तत्त्वज्ञानाकडे तो पाठ फिरवून बसतो. त्यामुळे समाजाचा नैतिक व भौतिक विकास होत नाही.

**ईशोपनिषद सांगते :**

**ईशावास्यंमिदं सर्वयत किंच जगत्यांजगत।**

**त्येन तक्तेन भुंजीथः मा गृधःकस्य स्वियधनम।**

या जगात जे काही आहे असे वाटते आणि भासते, ते ते ईश्वराद्वारे झाकावयाचे आहे. म्हणजे हे जग स्वतंत्र असे काही नसून ईश्वरच आहे, हे जाणून घ्यावयाचे आहे. याचा अर्थ हे जग सत्य नसल्याने त्याचा त्याग करायचा आहे. जीवनाचे ध्येय मोक्षप्राप्ती आहे. 'मोक्ष' ही कल्पना हिंदू धर्मातच आहे. बौद्ध धर्मातही ती निर्वाण स्वरूपात आली आहे; परंतु निर्वाण

## *ब्लॅकमेलिंग हा पुरोहिताचा धंदा*

*विज्ञान हा आधुनिक जगताचा धर्म असला, तरी माणूस स्वतःचे प्रतिबिंब धर्मातच शोधतो. आपण अमुक धर्माचे आहोत, असे सांगितल्याशिवाय त्याची ओळख पूर्ण होत नाही. हिंदू धर्मात याउलट आहे. त्याने आपली जात सांगितल्याशिवाय त्याची ओळख पटत नाही. विज्ञान माणसाला धर्मापासून मुक्त करू शकले नाही याची अनेक कारणे आहेत. मुळात माणसाला जे मृत्यूचे भय आहे, ते विज्ञान दूर करू शकत नाही. जगण्यासाठी सुरक्षितता असावी लागते, श्रद्धा असावी लागते. विज्ञान श्रद्धेची जागा घेऊ शकत नाही. धर्म एक मानसिक गरज आहे. त्या गरजेचे ब्लॅकमेलिंग करणे हा पुरोहितांचा धंदा आहे. भूतप्रेतात्मक अवस्थेतून धर्मांचा उदय झाला आहे. तुतानखमूनची कबर, मोठमोठे पिरॅमिड्स, प्रेते प्रदीर्घ काळ टिकून राहावीत म्हणून रसायनशास्त्राचा जन्म झाला. हे सर्व त्या आदिम भय, इच्छा, वासनेतून निर्माण झाले आहे. मृत्यूनंतरचे अदृश्य जग हीच त्यामागील प्रेरणा होती. निसर्गपूजेतून देवकल्पना विकसित झाल्या आहेत. बॅबिलोनियन संस्कृतीचे बरेच देव आर्यांनी भारतात आणले आहेत. आपण देव आणि धर्महीं आयात करीत असतो. कुठल्याही बदलाची सुरुवात धार्मिक व सांस्कृतिक बदलांनीच होत असते. ख्रिश्चन धर्मामुळे ज्यू व रोमन संस्कृती मागे पडल्या. ख्रिस्ती धर्म पुढे राजधर्म झाला. धर्मसत्ता आणि राजसत्ता एकत्र आल्याने चर्चने पुष्कळ धार्मिक जुलूम केले. इस्लामचा उदय झाल्यानंतर ख्रिश्चन आणि इस्लाम धर्मियांतील संघर्षामुळे युरोपचे सर्व चित्र बदलले. ते केवळ सांस्कृतिक, धार्मिकच नव्हते तर आर्थिक, राजकीयदेखील होते. ही सर्व क्रांती-प्रतिक्रांतीचीच अनेक रूपे होती.*

म्हणजे नागार्जुनाच्या मते, शून्याचा साक्षात्कार. 'शून्याचा साक्षात्कार म्हणजे सत्य आहे', असे त्याने म्हटलेले आहे. ती काहीशी वैचारिक स्वरूपाची कल्पना आहे. इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्मात शेवटच्या दिवसाची (Last judgement day) कल्पना आहे. त्या दिवशी ईश्वर सर्व मृतात्म्यांना जिवंत करील आणि त्यांच्या पाप-पुण्याप्रमाणे त्यांना स्वर्गात किंवा नरकात पाठवील. या धार्मिक कल्पना उत्क्रांत होत आलेल्या आहेत. त्यांच्यामागेही काही तर्कशुद्ध जाणिवा आहेतच; परंतु त्यामागे पारलौकिक ध्येये आणि आकांक्षा आहेत, ज्या विज्ञानाला मान्य करता येत नाहीत. अंतिम दिवसाच्या भयामुळे माणूस कदाचित न्यायबुद्धीने वागेल. सर्वांप्रती समता, करुणा बाळगेल. ब्राह्मणी धर्मात तो उदात्तवादही नाही. माणसाला विषमतेने वागवावे हाच त्यांचा ईश्वरप्रणित धर्म आहे. धर्म नीतिमत्तेचा मोठा स्रोत आहे. बुद्धाने नीतिमत्तेला सर्वोच्च स्थान दिले आहे; परंतु वेदांमध्ये किंवा वेदप्रणित धर्मात नीतिमत्तेला स्थान नाही. ब्राह्मणाने कितीही अधम कृत्य केले तरी तो कायम पवित्र आहे, अशी या धर्माची धारणा आहे. त्यांनी स्वर्गाचीही प्रतवारी केली आहे. देवांची तर केली आहेच. त्यामुळे शूद्र स्वर्गात जाण्याची शक्यता नाही. त्यासाठी वर्णाश्रमधर्माची निष्ठेने सेवा करून त्याला आधी ब्राह्मण व्हावे लागेल. यामागे तर्कविवेक काहीही नाही. त्यामुळे धर्म आणि विज्ञान यात कायम संघर्ष राहिला आहे.

**सत्य जाणणे माणसाची मूलभूत प्रेरणा**

विज्ञानामुळे धर्मात मूलभूत परिवर्तन झाले नाही; परंतु त्याची शक्ती मात्र निश्चितच कमी झाली. विज्ञानामुळे माणसात बदल होतो तो विचार करण्याच्या पद्धतीमध्ये. कोपर्निकस, गॅलिलिओ यांचा छळ झाला. ब्रूनोला तर जिवंत जाळण्यात आले; परंतु न्यूटनचा छळ झाला नाही. कारण समाजात मूलभूत स्वरूपाचे बदल झाले होते. माणसांच्या प्रज्ञेचा विकास होत होता. ईश्वर, अमरत्व व नीतिमत्ता ही मानवी प्रज्ञेचीच रूपे आहेत, असे कांटने म्हटले आहे. कांटवर बौद्ध धर्माचा प्रभाव आहे. त्याने म्हटले आहे की, 'जगात दोनच गोष्टी सत्य आहेत. वर तारकांनी लखलखणारे आभाळ व खाली शुद्ध नीतिमत्ता.' नीतिमत्तेचे मूळ धर्म नसून माणसाची प्रज्ञा (Practical reasoning) आहे, हे त्याने सिद्ध केले आहे. म्हणजेच ईश्वर, अमरत्व, नीतिमत्ता या कल्पना प्रज्ञेतून आल्या आहेत आणि त्या प्रज्ञेनेच समजून घेतल्या पाहिजेत. प्रज्ञा स्वभावतःच बंडखोर असते. कारण तिची निष्ठा सत्याशी असते. सत्य जाणणे ही माणसाची एक मूलभूत प्रेरणा आहे. सॉक्रेटिसने सत्य बोलण्याचा हट्ट धरला व त्यासाठी देहदंडाची शिक्षाही आनंदाने भोगली. त्यामुळे पुढे सत्यासाठी संघर्ष करणारे अनेक तत्त्वज्ञ, विचारवंत जन्मले. त्यांची प्रेरणा सॉक्रेटिसच होता.

पुढे जे अनेक सांस्कृतिक व धार्मिक बंड झाले ते अशा बंडखोर विचारवंतांमुळेच. व्हॉल्टेअर, रुसो, डिडेरो यांनी फ्रेंच राज्यक्रांतीचे वैचारिक नेतृत्व केले. त्यांनी धर्माची कठोर चिकित्सा केली. डिडेरो याने तर असे म्हटले आहे की, 'या सर्व धर्मगुरूंना, पुरोहितांना झाडावर फाशी दिली पाहिजे. त्यासाठी त्यांचीच आतडी त्यांच्या गळ्यात अडकवली पाहिजेत.' बुद्धाची क्रांतीदेखील अशीच सर्वस्पर्शी होती; परंतु त्यांनी हिंसेचा वापर केला नाही, तर लोकांना त्यांच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त केले. माणसाचे महत्त्व हे कुठल्याही धर्मापेक्षा श्रेष्ठ आहे, हे सिद्ध केले. धर्म हे साधन आहे, साध्य नव्हे. साध्य आहे तो माणूस. नेमके हेच विचार पुढे कांटने मांडले आहेत. भारतात बुद्धानंतर कबिराने असा विद्रोह केला

तो अधिक जहाल शब्दांत. कबीर रामाचे नाव घेत असले, तरी त्यांचे तत्त्वज्ञान बुद्धाचेच होते. महात्मा फुले हे याच परंपरेतले मोठे बंडखोर. त्यांनी धर्मग्रंथांतली लबाडी, कावेबाजपणा, धूर्तपणा उघडकीस आणला. त्यांचा 'गुलामगिरी' हा अत्यंत क्रांतिकारक ग्रंथ म्हणता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपुढे हे आदर्श होतेच; परंतु त्यांनी फ्रेंच राज्यक्रांतीतूनही प्रेरणा घेतली होती. व्हॉल्टेअर हाही त्यांचा आदर्श होता. भारतीय धर्मव्यवस्थेवर, समाजव्यवस्थेवर कडाडून हल्ला करणारे ते भारतातील व्हॉल्टेअरच होते. त्यांच्याइतका तर्कशुद्ध हल्ला व्हॉल्टेअरनेही केला नाही.

**धर्म करतो सत्येची साधना**

धर्म एक साचेबद्ध व्यवस्था असते. कालांतराने तिच्यात अनेक दुर्गुण शिरतात. ती निव्वळ अन्यायीच नाही, तर सत्तेमुळे भ्रष्ट आणि अनैतिकही होत जाते. अंधश्रद्धा व अज्ञानाचा ती पद्धतशीरपणे प्रचार करते. लोक अधिकाधिक धार्मिक व्हावेत, त्यांनी परधर्मियांचा द्वेष करावा, अधिक कट्टर व्हावे असा तिचा प्रयत्न असतो. त्यामुळे ते अधिक सुरक्षित होतील, असे धर्मगुरूंना वाटते. त्यांची सत्ता टिकवणे हाच त्यांचा हेतू असतो. त्यामुळे धर्म सत्याची साधना करीत नाही, तर सत्तेची साधना करतो. सत्य (Truth) आणि सत्ता यात स्वभावत:च संघर्ष असतो. सत्याला फार काळ दडपता येत नाही. त्यामुळे धर्मविरोधी अनेक बंड, विद्रोह होतात. त्यांचे नेतृत्व सत्याचे साधक म्हणवणारे विचारवंत, समाज क्रांतिकारक करीत असतात. तिला आपण 'क्रांती' म्हणतो. ती एका रात्रीत होत नाही. त्यासाठी गुलामाला गुलामीची जाणीव करून द्यावी लागते. अर्थात, या बंडाला दडपून टाकण्याची व्यवस्थेची ताकद प्रचंड असते. ती स्वभावत:च धूर्त असते. ती स्वत:मध्ये बदल झाल्याचे नाटक करते. संधीची वाट पाहते. दबा धरून बसते आणि योग्य वेळी विद्रोहातून निर्माण झालेल्या प्रत्येक स्फुल्लिंगाला ती नष्ट करून टाकते. हिलाच आपण 'प्रतिक्रांती' म्हणतो. रजनीशांनी म्हटले आहे की, जेव्हा व्यवस्थाच परिवर्तनाची भाषा करू लागते, तेव्हा धोका अधिकच गडद झालेला असतो. व्यवस्था प्रतिक्रांतिसाठी स्वत:ला तयार करीत असते. बुद्धाने जेव्हा क्रांती घडवली, तेव्हा त्याचा प्रतिकार करण्याची क्षमता तत्कालीन वैदिकांत नव्हती. बुद्ध हे असाधारण व्यक्तिमत्त्व होते. जे जे बुद्धाला भेटायला गेले, ते बुद्धाला शरण गेले आहेत. बुद्ध धर्म हा लोकधर्म आणि राजधर्मही झाला होता. त्यामुळे वैदिक त्यांना शरण गेले. त्यांना पर्यायच नव्हता. तत्कालीन ब्राह्मणी व्यवस्था नीचतम पातळीवर होती. वेद, ब्राह्मणके, आरण्यके यांत धर्मचर्चा नव्हतीच. होता तो ब्राह्मणत्वाचा, त्यांच्या श्रेष्ठत्वाचा उद्घोष. ब्राह्मणांचे चारित्र्य शून्य पातळीवर होते. मग ब्राह्मणत्वाला एवढे महत्त्व कशामुळे, हा बुद्धाचा प्रश्न रास्तच होता. ब्राह्मण बुद्धीनेही मंद



## *तरीही ब्राह्मण असतो पवित्रच*

***धर्म नीतिमत्तेचा मोठा स्रोत आहे. बुद्धाने नीतिमत्तेला सर्वोच्च स्थान दिले आहे; परंतु वेदांमध्ये किंवा वेदप्रणित धर्मात नीतिमत्तेला स्थान नाही. ब्राह्मणाने कितीही अधम कृत्य केले तरी तो कायम पवित्र आहे, अशी या धर्माची धारणा आहे.***

होते. त्यांच्यात तर्क, विवेक, सद्बुद्धीचा अभाव होता.

**ब्राह्मणांकडून सामान्यांची फसवणूक**

ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व इतरांनी मान्य करावे यासाठीच ते तथाकथित धर्मग्रंथ निर्माण करीत होते. तो एक अधर्मच होता. ब्राह्मणांचा जन्म ब्रह्मदेवापासून. वेदही ब्रह्मदेवनिर्मितच. त्यामुळे आपल्या स्थानाला अधिक बळकटी आणण्यासाठी अनेक धार्मिक कल्पनांना, मिथ्सना त्यांनी जन्म दिला. त्यांपैकी परशुराम हे एक पात्र होते. महात्मा फुल्यांनी परशुरामाला उघड पत्र दिले आहे. अशा खोट्या कल्पनांवर, धूर्त चालींवर ब्राह्मणांनी एक धर्म निर्माण केला आणि त्याच्या प्रचारासाठी रामायण, महाभारतासारखे ग्रंथही निर्माण केले. आहे त्या ग्रंथांतही ब्राह्मणांच्या हिताकरिता अनेक कथा-उपकथा रचल्या आणि त्या सर्व देवतामुखातूनच वदवल्या; जेणेकरून सामान्य माणसाला त्या खऱ्या वाटाव्यात. बुद्धाचा धर्म नेमका वैदिकांच्या विरोधात होता. सर्वप्रथम त्याने वेद नाकारले. वेद ब्राह्मणांचे सत्ताशास्त्र होते. त्याने यज्ञसंस्था नाकारली. यज्ञसंस्थेमुळे ब्राह्मणांना विपुल धनधान्य, गाई आणि दानात स्त्रियाही मिळत. सर्व काही वेदांतच आणि वेद संस्कृतमध्ये, जे फक्त ब्राह्मणांनाच वाचता येत होते. ही सामान्यजनांची शुद्ध फसवणूक होती. 'आम्ही शूद्र का', असे कोणी विचारलेच तर ते म्हणत, 'ते सगळे वेदांत आहे आणि वेद ईश्वराने निर्माण केले आहेत.' भारतातल्या साधू-संतांचा छळ याच पद्धतीने करण्यात आला. बहुसंख्य संत शूद्रवर्णीयच होते. त्यांच्यातील बहुतेकांचे

खून झाले आहेत. कारण ते धर्मात ब्राह्मणांची बरोबरी करू पाहत होते.

**ज्ञानसत्ता हाच धम्मसत्तेचा पाया**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'क्रांती-प्रतिक्रांती' या ग्रंथात वर्णव्यवस्थेतील अनैतिक इतिहासाचा धांडोळा घेण्यात आला आहे. तो त्यांनी अत्यंत तर्कशुद्ध पद्धतीने घेतलेला आहे. जगभरच्या धार्मिक क्रांती-प्रतिक्रांती आणि धर्म व तत्त्वज्ञानाचा अभ्यास त्यामागे आहे. भगवान बुद्धांची क्रांती ही ज्ञानक्रांती होती, तशीच ती धम्मक्रांतीही होती. जगाच्या पाठीवर संघटित धर्मांचा जन्म व्हायचा होता. जगातला पहिला वैश्विक धर्म हा बौद्ध धर्मच होय. कारण तो संपूर्ण मानवजातीला विश्वबंधुत्व, समता, स्वातंत्र्य, सामाजिक व धार्मिक न्याय देण्याची घोषणा करतो. वैदिकांची ज्ञान व सत्य संकल्पना व बुद्धाची ज्ञान व सत्य संकल्पना यात जमीन-अस्मानाचे अंतर आहे. वैदिकांचे ज्ञान सर्वार्थाने काल्पनिक व मिथ्य धारणांवर आधारित आहे. ते ब्राह्मणकेंद्री आहे. बुद्ध तर्क, विवेक, विज्ञानाच्या सहाय्याने ज्ञानाची मांडणी करतात. त्यांचे सत्य बहुआयामी (Multidiamensional), इहवादी व मानवकेंद्री आहे. बुद्धाने चार आर्यसत्यांची घोषणा केली असली, तरी त्यांचे सत्य त्यांनी अंतिम मानले नाही. सत्य आणि ज्ञान या संकल्पना गतिमान आहेत. हा अत्यंत आधुनिक दृष्टिकोन आहे. त्यावर विज्ञान उभे आहे. बौद्ध धर्माचा उदय ही केवळ धार्मिकच नाही, तर सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्रांती होती. बौद्धकाळातच मौर्य साम्राज्य स्थापन झाले होते. बौद्ध धर्माने चातुर्वर्ण्याचा सिद्धांत उद्ध्वस्त करून सामाजिक व धार्मिक समता प्रस्थापित केली होती. त्यामुळेच मौर्य सम्राटांना राजकीय क्रांती करता आली. स्वत: बुद्ध हे राजपुत्रच होते. त्यांचे शिष्यही सम्राटच होते. या अर्थाने बुद्धाने धम्मसत्ता प्रस्थापित केली, जिचा पाया ज्ञानसत्तेवर आधारलेला होता. मेगॅस्थेनिसच्या 'इंडिका'मध्ये राजाचे सल्लागार बौद्ध भिक्खूच होते, असे म्हटले आहे. सम्राट अशोकाच्या काळात तर निर्विवादपणे बौद्ध धर्म हा राजधर्म झाला होता. परंतु तो पूर्णत: सहिष्णुता, प्रेम, करुणा व पंचशीलावर आधारित होता. स्वत: अशोक पंचशीलाचे कटाक्षाने पालन करणारा होता. वैदिकांमध्ये कुठल्याही शीलाचे पालन करण्याची आवश्यकता नव्हती. कारण वैदिक धर्मानुसार ब्राह्मण हे जन्मजात पवित्र व खून, बलात्कार, व्यभिचार हा त्यांच्यासाठी दंडनीय अपराध नव्हता. तत्कालीन धर्मसूत्रांनी ते स्पष्ट केले होते.

**सम्राट अशोकाचं कार्य म्हणजे ज्ञानसत्ताच**

चातुर्वर्ण्याचे उच्चाटन हा ब्राह्मणवर्गावर, वैदिक व्यवस्थेवर मोठाच आघात होता. त्यांचे वर्चस्व जाऊन ते शूद्रांच्या पंक्तीत जाऊन बसले. कारण त्यांच्या धर्मसूत्राप्रमाणे शूद्रांच्या सत्ता-संपत्तीवर ब्राह्मणांचाच अधिकार होता व शूद्र कुठल्याही सन्मानाला पात्र नव्हते. येथे तर धर्मसत्ता, अर्थसत्ता, राजसत्ता अशोकाच्या हाती एकवटली होती आणि त्यांचे दु:ख म्हणजे तो ब्राह्मण नव्हता. अशोक हा सर्व धर्मांना, पंथांना, वैदिकांना सहिष्णुतेने वागवत होता व सर्वांचा सन्मानही करीत होता; परंतु वेद, यज्ञसंस्था, वर्णसंस्था मोडीत निघाल्यामुळे ब्राह्मणांच्या आर्थिक व सामाजिक, धार्मिक स्थानाला ग्रहण लागले होते व हा वर्ग अत्यंत अस्वस्थ होता. त्यांची कुटिल कारस्थाने चालूच होती. अशोकाची महान लष्करी सत्ता होती व सबंध भारतावर त्याचे एकमुखी नेतृत्व होते. त्याने आपल्या शेजारच्या राजांना अभय दिले होते व त्यांना मित्र करून बौद्ध धर्माच्या प्रचार व प्रसारास लावले होते. सम्राट अशोकाचे शिलालेख, त्याने बांधलेली भव्य विहारे, स्तूप, नालंदासारखी विद्यापीठे त्याच्या सत्तेचे स्वरूप स्पष्ट करतात. ती एक ज्ञानसत्ताच होती. ती वैदिकांच्या मुळावर आली होती. शेवटी इसवी सनपूर्व १८५ ला पुष्यमित्र शुंगाने अशोकाच्या नातवाच्या सेनापतीने बंड करून बृहद्रथाचा वध केला. ही प्रतिक्रांतीच होती. त्यानंतर त्याने ब्राह्मणी धर्माची, वैदिकांची सत्ता स्थापन केली. याचाच अर्थ वर्णाश्रमधर्माची पुनश्च स्थापना केली. या काळात बौद्ध वाङ्मय नष्ट करणे, विहार, स्तूप आणि इतर धार्मिक बौद्धस्थळे उद्ध्वस्त करण्याचे काम त्याने केले. याच काळात मनुस्मृतीचे लिखाण त्याने करवून घेतले व तिलाच धार्मिक कायदा म्हणून मान्यता देऊन कडक अंमलबजावणी सुरू केली. मनुस्मृतीतला धर्म हा राजधर्म झाला. बौद्ध भिक्खूंचा छळ झाला. त्यांच्या कत्तली सुरू झाल्या. त्यांपैकी काही बौद्ध भिक्खू इतर देशांत आश्रयाला गेले. बौद्ध धर्माचा ऱ्हास होऊन शूद्रांचे, स्त्रियांचे अधिकार नष्ट करण्यात आले. बौद्ध धर्माच्या ऱ्हासाची अनेक कारणे बाबासाहेबांनी नमूद केली आहेत. बुत (मूर्ती) आणि बुद्ध यातील फरक मुस्लिम आक्रमकांना कळला नाही. त्यांनी सरसकट सर्व बुद्धविहारे नष्ट केली. नालंदा विद्यापीठाला आग लावण्यात आली. ते जागतिक दर्जाचे बौद्ध विद्यापीठ होते. जगभरचे विद्यार्थी, संशोधक तेथे येत. बौद्ध भिक्खूच नसल्यामुळे बौद्ध धर्माची शिकवण द्यायला कोणी राहिले नाही. त्यामुळे वैदिक धर्म हाच लोकांना खरा धर्म वाटू लागला.

**(लेखक निवृत्त सनदी अधिकारी आहेत)**

***क्रांती एका रात्रीत होत नाही***

***सत्याला फार काळ दडपता येत नाही. त्यामुळे धर्मविरोधी अनेक बंड, विद्रोह होतात. त्यांचे नेतृत्व सत्याचे साधक म्हणवणारे विचारवंत, समाज क्रांतिकारक करीत असतात. तिला आपण 'क्रांती' म्हणतो. ती एका रात्रीत होत नाही. त्यासाठी गुलामाला गुलामीची जाणीव करून द्यावी लागते.***

*विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशात राजकीय पक्षांची लगबग सुरू आहे. भाजप विकासाला प्राधान्य देत असल्याचे दाखवण्यासाठी अनेक कामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन करण्यावर भर देत असून समाजवादी पक्ष, बहुजन समाज पक्ष हे विविध जातींवर प्रभाव टाकण्यासाठी त्यांच्या नेत्यांना आपलेसे करणे, त्या जातींचे मेळावे घेणे आणि त्यांच्यासाठी यात्रा काढण्यावर भर देत आहेत. काँग्रेसही राज्यातलं आपलं स्थान बळकट करण्याच्या दृष्टीने क्लृप्त्या लढवत आहे.*

**भास्कर नाशिककर**

# उत्तर प्रदेशाचे 'मैदान' तापतेय











**को**रोनाची छाया अद्याप कायम आहे. ओमायक्रॉन या नव्या रुपात तो आपले अस्तित्व दाखवत आहे. तरीही कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने हाहाकार माजवलेल्या उत्तर प्रदेशात मात्र राज्य विधानसभा निवडणुकीसाठी वातावरण तापू लागले आहे. अर्थात, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, पंजाब आणि गोवा या पाचही राज्यांत आगामी काही महिन्यांत राज्य विधानसभेसाठी निवडणुका होणार आहेत. पंजाबात काँग्रेस तर अन्य राज्यांत भारतीय जनता पक्षाची सत्ता आहे. मात्र, सगळ्यांचे डोळे लागले आहेत ते उत्तर प्रदेशच्या निवडणुकीकडे.

उत्तर प्रदेशात योगी आदित्यनाथ यांना कडवे आव्हान देण्याचे प्रयत्न माजी मुख्यमंत्री आणि समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव, बसपाच्या नेत्या मायावती, काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी-वड्रा व आम आदमी पक्षाने चालविले आहेत. बेरीज-वजाबाकीची गणिते मांडत आघाड्यांचे राजकारण आकाराला येत आहे. जनजागृतीसाठी सपाने यात्रा काढण्याचा सपाटा लावला आहे.

**मतांवर डोळा ठेऊन...**

बहुजन समाजाचे राजकारण करत राज्यात वेगवेगळे सोशल इंजिनिअरिंगचे प्रयोग केलेल्या मायावती यांनी तसेच अखिलेश यादव यांनी ब्राह्मण मतांवर डोळा ठेऊन त्यांच्या अनुनयाची पावले उचलली आहेत. अखिलेश यादव यांनी त्या समाजाला खूश करण्यासाठी भगवान परशुरामांचा १०८ फुटांचा पुतळा सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून उभारायचे ठरवले आहे. भाजपसह समाजवादी पक्ष, बहुजन समाज पक्षाने विविध जातींवर प्रभाव टाकण्यासाठी त्यांच्या नेत्यांना आपलेसे करणे, त्या जातींचे मेळावे घेणे आणि त्यांच्यासाठी यात्रा काढण्यावर भर दिला आहे. थोडक्यात, लोकानुयायाला आता उत्तर प्रदेशात ऊत येऊ लागला आहे.

उत्तर प्रदेश हे देशातील लोकसंख्येच्या बाबतीत आणि लोकसभेच्या जागांबाबत प्रमुख राज्य आहे. राज्यात लोकसभेच्या ८०, तर राज्य विधानसभेच्या ४०३ जागा आहेत. राज्य विधानसभेत सत्ताधारी भाजपकडे ३१२ जागा आहेत. राज्याचे राजकारण जातीवादाभोवती फिरत आहे. उच्चवर्णियांपासून ते दलित, मागासांना खूश करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. राज्य विधानसभेची मुदत १४ मे २०२२ रोजी संपत आहे. राज्यात २०११ च्या जनगणनेनुसार, ४० टक्के इतर मागासवर्गीय, २०.८ टक्के दलित, ०.८ टक्के आदिवासी, २३ टक्के उच्चवर्णीय, १९ टक्के मुस्लिम आणि इतर घटक ०.९ टक्के आहेत. ही टक्केवारी डोळ्यासमोर ठेऊनच राजकीय आघाड्या करण्याची आणि प्रत्येकाला प्रतिनिधित्व देण्याची आश्वासने दिली जात आहेत. काँग्रेसने महिलांना ४० टक्के प्रतिनिधित्वाचा नारा दिला आहे, तर समाजवादी पक्षाने दिवंगत माजी पंतप्रधान चरणसिंग यांचे नातू जयंत चौधरी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकदलाशी हातमिळवणी केली आहे. तरीही राज्यातील विविध जाती, जमातींचे प्रतिनिधित्व करणारे छोटे पक्ष, राजकीय मंच यांना सोबत घेऊन आपली स्थिती मजबूत करण्यावर भाजपसह सगळ्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

**विकास कामांबाबत दावे-प्रतिदावे**

वाराणसीचे खासदार असलेल्या नरेंद्र मोदी यांनी काशी विश्वनाथ धाम प्रकल्पाचे उद्घाटन केले, गंगेत उतरून अर्घ्य दिले, विश्वनाथ मंदिर परिसरातील घाटावर भ्रमंती केली. मात्र हा प्रकल्प आपल्याच काळात हाती घेतला होता, असा दावा अखिलेश यादव यांनी केला आहे. मोदी यांनी त्याआधी ज्या बलरामपूर जिल्ह्यात शरयू नहार प्रकल्पाचे उद्घाटन केले, त्याचेही ७५ टक्के काम आपल्याच काळात झाल्याचा दावा अखिलेश यांनी केला आहे. या प्रकल्पाने शरयूसह घागरा, रापती, बाणगंगा आणि रोहिणी या नद्या जोडल्या गेल्या. ९८०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पावर गेल्या ४ वर्षांत ४,६०० कोटी रुपये खर्च झाले. असे सांगण्यात येते, की या प्रकल्पामुळे १४ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येऊन, त्याचा लाभ २९ लाख शेतकऱ्यांना होणार आहे. त्याहीआधी नरेंद्र मोदी यांनी ३४१ किलोमीटरच्या लखनौ ते गाझीपूर दरम्यानच्या पूर्वांचल एक्सप्रेसवेवर विमान उतरवून सगळ्यांचे लक्ष वेधले होते. त्याचे त्यांनी उद्घाटन केले. फेब्रुवारी २०२० मध्ये मोदी यांनी चित्रकूट ते इटावा दरम्यानच्या बुंदेलखंड एक्सप्रेसवेच्या कामाचे भूमिपूजन केले होते. यातून सत्ताधारी भाजप आणि विरोधी समाजवादी पक्ष यांच्यात श्रेयवादाची लढाई सुरू झाली आहे. प्रकल्पांची सुरुवात आम्ही केली आणि त्याच्या उद्घाटनाच्या फिती मोदी कापत आहेत, ते 'कैचीजिवी' आहेत, अशी टीका समाजवादी पक्षाने सुरू केली आहे. यातील वास्तव मात्र उत्तर प्रदेशातील जनतेला चांगल्या प्रकारे माहिती असल्याने आगामी निवडणुकीत ती योग्य तो निर्णय करेल, असे बोलले जाते.

**विकासकामांचा धडाका**

२०१७ च्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी नागरिकांना आश्वासन देणारे जे लोककल्याण संकलपत्र जारी केले होते, त्याची पूर्तता आपण करत असल्याचा मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा दावा आहे. 'रिफॉर्म, परफॉर्म, ट्रान्सफॉर्म' अशी त्यांची राज्याच्या विकासाची त्रिसूत्री आहे. राज्यातील चार मेट्रो शहरांचा विकास, उडान योजनेअंतर्गत ९ विमानतळ जोडणे, २८ विमानतळांचे प्रगतीपथातील काम ही योगींची जमेची बाजू आहे. पायाभूत सुविधांचा विकास, एक्सप्रेसवेची निर्मिती यावर त्यांच्या सरकारचा भर आहे. देशातील २८ टक्के एक्सप्रेसवे उत्तर प्रदेशात आहेत. २०२० पासून राज्य सरकारने २८ हजार कोटींची कामे केंद्राकडे प्रस्तावित केली आहेत. एवढेच नव्हे तर, उत्तर प्रदेशच्या जलशक्ती खात्याचे मंत्री महेंद्रसिंग यांनी, योगी सरकारने प्रलंबित १८ सिंचन प्रकल्पांचे काम पूर्ण करून ५० लाख शेतकऱ्यांना दिलासा दिल्याचा दावा केला आहे. मोदी यांनी काही दिवसांपूर्वीच बुंदेलखंड भागाला दिलासा देणाऱ्या केन-बेटवा प्रकल्पाचीही घोषणा केली आहे. एवढेच नव्हे तर अनेक जिल्ह्यांमध्ये, अगदी गाव आणि शहर पातळीवरही तीस लाख ते तीन कोटी रुपये खर्चाचे शेकडो प्रकल्प हाती घेऊन मतदारांना आकृष्ट करण्याचे प्रयत्न भाजपने सुरू केले आहेत. त्यांनी लोकोपयोगी कामांचा धडाका लावला आहे.

सत्तेवर आल्यावर रोडरोमिओंविरोधात मोहीम उघडणे, गुंडापुंडांना अटकाव करण्यासाठी त्यांचे एन्काऊंटर घडवणे, दंगलखोरांना सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून शोधून सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई त्यांच्याकडून वसुल करणे, अशा गोष्टी योगींनी केल्या. विकास दुबे या ब्राह्मण समाजातील गुंडाचं एन्काऊंटर तर वादाच्या भोवऱ्यात सापडलं होतं. समाजात संतापाची लाट उसळली होती. लव्ह जिहादला अटकाव करण्यासाठी, बेकायदा धर्मांतराला आळा घालण्यासाठी योगींनी विधेयक आणले होते. लोकसंख्या नियंत्रणासाठी लोकसंख्याविषयक विधेयक बनवले होते. 'सोच इमानदार, काम दमदार', असा नारा देत ते आपल्या सरकारने उद्योगव्यवसायांना प्रोत्साहन, त्यांची गुंतवणूक, परकी गुंतवणुकीला प्रोत्साहन, त्यातून ३० लाखांवर रोजगाराची निर्मिती, अखंडित वीज, शेतकऱ्यांना सत्तेवर आल्यावर दिलेली २७ हजार कोटींची कर्जमाफी यावर भर देत मताचा जोगवा आपण मागणार आहोत, असे स्पष्ट केले. सध्याचा विकासकामांचा धडाका हा त्याचाच भाग आहे.

२०१४ आणि २०१९ च्या लोकसभा आणि २०१७ च्या राज्य विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने आपली स्थिती मजबूत केली आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला ऐंशीपैकी ६२ जागा (४९.९७ टक्के मते) जिंकता आल्या होत्या, २०१४ च्या तुलनेत त्यांच्या ९ जागा घटल्या होत्या. विधानसभेच्या निवडणुकीत २०१२ मध्ये १५ टक्के मते मिळवणाऱ्या भाजपने २०१७ मध्ये ३९.६७ टक्के मते मिळवली होती. •••

**(लेखक समकालिन विषयाचे अभ्यासक आहेत)**

## *विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांच्या नामकरणांवर भर*

***गेला महिना सातत्याने गाजतो आहे ते प्रामुख्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांचे दौरे, त्यांनी केलेली उद्घाटने किंवा नवनव्या प्रकल्पांसाठी केलेली भूमिपूजने यामुळे. मोदी यानिमित्ताने विरोधकांवर टीकेची राळ उठवण्याची एकही संधी सोडत नाहीत. विकास कामांचे ते उद्घाटन करत असले तरी, विविध विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांना आकार देण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू असतानाच, राज्यातील आघाडीच्या लोकसंख्यात्मक बलशाली जातींच्या नेत्यांची, त्यांच्या पूर्वजांची, त्यांच्या इतिहासकालीन राजे-महाराजे यांची नावे देऊन मतदारांच्या भावभावनांना हात घातला जात आहे.***

# लोकसाहित्यातील सांस्कृतिक प्रभुत्व बदलण्याची गरज



**डॉ. मिलिंद कसबे**

*आज लोककला आणि त्यांचा वाहक उपेक्षित, वंचित वर्ग लाचार बनलाय, तर चित्रपट, नाटक यांच्यासारख्या अभिजात कलांना ऊर्जितावस्था येते आहे. दिवसेंदिवस त्यांचा वाहक, उच्चवर्ग मात्र श्रीमंत होताना दिसत आहे. जात आणि कर्मकांडाचे वाहक असलेल्या धर्मांनी उभा केलेला हा अनर्थ आहे, याकडे डोळसपणे पाहण्याची ही वेळ आहे.*

मराठी साहित्यात लोकसाहित्याचा जो अभ्यास झाला आहे तो एकांगी झाला आहे असे माझे मत आहे. प्रभाकर मांडे, गंगाधर मोरजे ते अगदी तारा भवाळकर यांच्यापर्यंतच्या अभ्यासपरंपरेने लोकसाहित्याकडे लक्षवेधी नजरेने पाहिले हे खरे आहे. लोकसाहित्यातील लोकपरंपरांना त्यांच्यातील बारकाव्यांसह अधोरेखित केले हेही खरे आहे; परंतु त्यांनी लोकसाहित्याची चिकित्सा केली नाही. लोकसाहित्याच्या या पहिल्या पिढीच्या अभ्यासकांनी लोकसाहित्याची समाजशास्त्रीय चिकित्सा न केल्यामुळे ते अधिकाधिक उदात्तीकरणात रमले. जगभरातले लोकसाहित्याचे अभ्यासक काय लिहीत होते ते या पहिल्या पिढीतल्या मराठी अभ्यासकांना माहीत नव्हते असे नाही; परंतु त्यांच्या परंपराधार्जिन्या, रूढीग्रस्त आणि जात-वर्गवर्चस्वी मानसिकतेने त्यांना लोकसाहित्याकडे नैसर्गिक नजरेने पाहण्याची मुभा दिली नाही. एकतर लोकपरंपरेचे गुणगाण गाण्यात त्यांनी आपली शक्ती खर्च केली आणि दुसरीकडे, विद्यापीठीय क्रमिक लेखनाने त्यांना स्वतंत्र मांडणीपासून रोखले. पहिल्या पिढीतील लोकसाहित्याच्या अभ्यासकांच्या साचलेपणाचा अनिष्ट परिणाम आजपर्यंत मराठी साहित्य भोगते आहे, हे वेगळे सांगायला नको.

माणूस कलेकडे कसा वळला? त्याला कलानिर्मितीची गरज का वाटली आणि लोककलांकडून कसाकसा आविष्कृत होत गेला, याविषयी विचारवंत एरिक फ्रॉम यांचे The Sane Society हे पुस्तक पाहिले तर लोकसाहित्य आणि लोककलांबद्दलचे अनेक गैरसमज दूर होतात. माणसाच्या जगण्यात कलेचा आविष्कार ही बाह्य जगतातली गोष्ट वाटत असली तरी ती त्याच्या अंतर्विश्वाशी जोडलेली गोष्ट आहे, हे मान्य केले की पुढचा प्रवास समजून घ्यायला सोपे होते.

**केवळ धर्माधिष्ठित परंपरांचा अभ्यास**

माणूस जेव्हा प्राणीसृष्टीतून मानवीसृष्टीत आला तेव्हा तो प्राण्यांसारखा स्वतंत्र व्यक्ती उरला नाही तर तो समूहाचा, समाजाचा आणि त्याने उभ्या केलेल्या संस्कृतीचा अविभाज्य घटक बनला. स्वतःशी, दुसऱ्याशी पर्यायाने समाजाशी संवाद साधणे ही त्याची गरज बनली. या त्याच्या मानसिक गरजेतूनच तो आपले शरीर आणि मन याची फारकत न करता त्याने या जगाला सर्वांगाने समजून घेण्याचा प्रयत्न म्हणजे कलेचा जन्म आहे. माणूस जसजसा कलेतून अभिव्यक्त होत गेला, तसतसे त्याचे जगणे अधिक सार्थ आणि सजीव झाले, याकडे एरिक फ्रॉम यांनी अत्यंत जाणीवपूर्वक जे लक्ष वेधले आहे ते फार महत्त्वाचे आहे. लोकसाहित्य आणि लोककलांच्या जन्मखुणा माणसाच्या या नैसर्गिक अभिव्यक्तीत दडलेल्या आहेत. माणूस निसर्गाशी, स्वतःशी आणि समाजाशी जो जो संवाद साधत गेला; तो संवाद म्हणजे समाजातल्या अनेक कलांचा जन्म आहे. माणूस जेव्हा आपल्या भोवतालचे जग बुद्धीने समजून घेतो, तेव्हा विज्ञान आणि तंत्रज्ञान जन्माला येते आणि याच आपल्याला समजलेल्या जगाची समज जेंव्हा तो इंद्रियांद्वारे अभिव्यक्त करतो, तेव्हा विविध कलांची उधळण होते. यातूनच ताल, सूर, नृत्य, नाट्य, चित्र, शिल्प या साऱ्या कलांचा जन्म होत असतो. लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे धर्मशास्त्रांनी अमानुषपणे लादलेल्या रूढी, परंपरा आणि धर्मकल्पनांचा अभ्यास नाही हे कधीतरी मान्य करायला हवे. दुदैवाने मराठी साहित्यातील लोकसाहित्याचा अभ्यास केवळ धर्माधिष्ठित परंपरांचा अभ्यास म्हणून पुढे आला. त्यामुळे त्यातील दैवी कल्पनांना बाजूला काढता आले नाही.

पहिल्या पिढीतल्या मराठीतील लोकसाहित्यांच्या मान्यवर अभ्यासकांनी ही चर्चा जाणीवपूर्वक चिकित्सेच्या आणि आत्मटीकेच्या पातळीवर नेली नाही. त्यातले बहुतांशी अभ्यासक धर्मरक्षक जातींच्या कळपातले असल्याने त्यांनी लोकसाहित्याचा अभ्यास पाश्चात्य संशोधन परंपरेकडे दुर्लक्ष करून तो पौर्वात्यांकडे वळवला. अर्थात, यातच त्यांचे सौख्य



होते.

**ग्राम्सीचे भाकीत ठरतेय खरे**

लोकसाहित्याच्या अभ्यासकांची दुसरी पिढी अनेकार्थाने महत्त्वाची आहे. ही पिढी चिकित्सेच्या पातळीवर लोकसाहित्याकडे पाहू लागली. त्यातल्या जातव्यवस्थेची चिकित्सा करू लागली. धर्माने उभ्या केलेल्या खुळ्या कल्पनांना विरोध करू लागली. प्रा. अहिरे आणि त्यांचा संशोधकीय समकाळ यासाठी महत्त्वाचा मानला पाहिजे. ते जुन्या कल्पनांना बाद करून नव्या विचारांचे रोपण करते. विशेषतः दलित चळवळीच्या मुशीतून घडलेले जे लोकसाहित्याचे अभ्यासक पुढे आले, त्यांनी मात्र आपल्या मांडणीची दिशा अधिक स्पष्ट ठेवली. शेती, माती आणि गावगाड्याच्या मिथकात अडकलेल्या शेतकरी लेखकांना मात्र ही कोंडी अद्यापही फोडता आलेली नाही. मराठीत लोकसाहित्याच्या संशोधनाला अनेक मर्यादा आहेत, हेही कधीतरी मोकळेपणाने मान्य करायला हवे. या मर्यादांची अनेक कारणे आहेत. त्यापैकी जातवास्तव हेही एक महत्त्वाचे कारण आहे. समाजात जाती उगवण्यापूर्वीच माणसाच्या मनात कलाविष्कार होता; पण कलेची जातनिहाय वर्गवारी करणाऱ्या धर्मप्रसारकांना या लोकाविष्काराचा उपयोग आपल्या सांस्कृतिक प्रभुत्वासाठी करायचा होता हे मात्र आपण सोईने विसरतो आहोत. प्रसिद्ध मार्क्सवादी विचारवंत ग्राम्सी यांनी हेजिमनीचा सिद्धांत मांडला आहे. या सिद्धांताला 'धुरिणत्व'किंवा 'प्रभुत्व' म्हणता येईल. हा सिद्धांत साहित्य, संस्कृती आणि तत्वज्ञान अशा वेगवेगळ्या क्षेत्रांत महत्त्वाचा मानला जातो. 'जो वर्ग समाजाची भौतिक शक्ती असतो, तो वर्ग समाजाची बौद्धिक शक्तीही असतो' या विचारातून ग्राम्सीचा हा मार्क्सवादी सिद्धांत उभा राहिला आहे. ग्राम्सीने 'वर्चस्व' आणि 'प्रभुत्व' या दोन वेगवेगळ्या संकल्पना मानल्या आहेत. लोकांना धाकदपटशा दाखवून वर्चस्व सिद्ध केले जाते. ते दमनाने सिद्ध होते; परंतु प्रभुत्व मात्र सोईस्करपणे लोकांची संमती मिळवून गाजवले जाते. आजच्या काळात धर्मांनी आणि धर्मरक्षकांनी लोकांची संमती मिळवून प्रभुत्व लादण्याचा जो सपाटा लावला आहे, तो पाहता ग्राम्सीचे भाकीत अधिकाधिक खरे ठरताना दिसत आहे.

**सांस्कृतिक राजकारण**

मराठीत लोकसाहित्य आणि लोककलांचा प्रवास पाहता ते दैववादी, वरच्या मंडळींनी बहुजन समाजाची संमती मिळवून उभे केलेले सांस्कृतिक प्रभुत्व आहे असे दिसते. ग्राम्सीच्या मते, समाजातील सत्ताधीश मंडळी आपली सत्ता अबाधित ठेवण्यासाठी केवळ आर्थिक मार्ग अवलंबतात असे नाही; तर ते सांस्कृतिक वर्चस्व मिळवून आपली सत्ता कायम ठेवण्याचा प्रयत्न करतात. हे सांस्कृतिक प्रभुत्व ते सहमतीच्या नावाखाली मिळवून समाजातल्या मोठ्या वर्गावर प्रभुत्व मिळविण्यात यशस्वी होतात. लोकसाहित्यात परपरेने पसरवलेली धार्मिकता कुठून आली? लोककलेचा आणि विधींचा संबंध कुणी जोडला ? तर हे सांस्कृतिक सत्ता मिळवू पाहणाऱ्या उच्चभ्रूंनी अत्यंत चलाखपणे अठरापगड जातींची संमती मिळवून धर्म बळकटीसाठी नियोजलेले सांस्कृतिक राजकारण दिसते. पोतराजाने आयुष्यभर भीक मागायची, तमाशातल्या नाचणाऱ्या स्त्रीने तमाशाच्या फडात हजारो रसिकांना मंत्रमुग्ध करायचे पण व्यक्तिगत जीवनात मात्र एक दर्दभरी दास्तान बनायचे. गोंधळी, भोपे, रायरंद, नंदीबैलवाले, दशावतारी, कुडमुडे जोशी या सर्वांची अवस्था वेगळी नाही. या सर्वांची अवस्था आणि यातल्या अनेक लोककला आणि कलावंत आता नामशेष होत

आहेत. त्यांच्यापुढे जगण्याचे भेसूर प्रश्न उभे आहेत. हे असे का झाले? लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी याचे समाजशास्त्रीय कारण शोधायला हवे होते. पण ते अभ्यासक्रम रंगवण्यात आणि लोककलांचा उत्सव करण्यात दंग होते. लोकसाहित्य आणि लोककला या गोष्टी एक असल्या तरी त्यातली जातव्यवस्था मात्र वेगळी आहे. लोकसाहित्याचा वाहक गावकुसातला आहे, तर लोककलेचा वाहक गावकुसाबाहेरचा आहे. तो बहुतांशी अस्पृष्य आहे. म्हणून लोककलावंतांचे प्रश्न अधिक गंभीर आहेत, हेही लक्षात घेतले पाहिजे.

**लोककलेची सांस्कृतिक शोकांतिका**

महाराष्ट्रात लोककलेचे हजारो अभ्यासक आहेत; परंतु त्यातली बहुतांश मंडळी क्रमिक पुस्तकांत रमली, काही मंडळी नोकरीतल्या ॲकॅडमिक फायद्यावर विसावली तर काही मंडळी लोककलेच्या उदात्तीकरणात अडकली. याचा सर्वात मोठा तोटा लोककलेच्या अभ्यासातून लोककलावंतांना न मिळणाऱ्या सामाजिक न्यायाच्या प्रक्रियेवर झाला. लोककलांचे उदात्तीकरण, उत्सवीकरण सारेच काही झाले; परंतु लोककलावंत मात्र आहे तिथेच दारिद्र्याच्या विवंचनेत राहिला. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ते अण्णा भाऊ साठे या महापुरुषांना हे कलेचे प्रभुत्व बदलायचे होते. म्हणूनच लोककलांना नव्या बदलांचा मार्ग त्यांनी दाखविण्याचा प्रयत्न केला. सत्यशोधकी जलसे, आंबेडकरी जलसे आणि साम्यवादी कलापथके हा या नव्या बदलांचा मार्ग त्यांनी दाखवला. पण तो मार्ग जात्यंध व्यवस्थेला पचणारा आणि परवडणाराही नव्हता. अण्णा भाऊ साठे यांनी हा नवा बदल रुजवण्यासाठी पुरेपूर प्रयत्न केले; परंतु तमाशा फडात बहुसंख्येने वावरणाऱ्या अणा भाऊंच्या कलावंत वारसदारांनीच हा बदल कृतीत आणला नाही ही लोककलेची सांस्कृतिक शोकांतिकाच म्हणावी लागेल.

**भारतीय कलेचा चेहरा एकांगी**

भारतीय कलेचा इतिहास हा नेहमीच सांस्कृतिक वर्चस्वाचा इतिहास राहिला आहे. यात अभिजात कला विरुद्ध लोककला यांचा वर्गीय संघर्ष दुर्लक्षित करून हा सांस्कृतिक इतिहास कळणार नाही. आर्य विरुद्ध अनार्य, वैदिक विरुद्ध अवैदिक, ब्राह्मण विरुद्ध ब्राह्मणेतर, स्पृश्य विरुद्ध अस्पृश्य, संस्कृत विरुद्ध प्राकृत, अभिजात विरुद्ध गावंढळ, शुद्ध विरुद्ध अशुद्ध, शहरी विरुद्ध ग्रामीण, नाटक विरुद्ध तमाशा, शास्त्रीय विरुद्ध अशास्त्रीय... असे अनेक संघर्ष भारतीय समाजाने अनुभवले आहेत. या संघर्षाची तात्त्विक मीमांसा जरा बाजूला ठेऊन पाहिले तर, हे जे संघर्ष उभे राहिले त्यात धर्म जात आणि वर्ग हे नेहमीच केंद्रभागी राहिले आहेत असे आपल्या लक्षात येईल. सुसंस्कृत, अभिजात आणि शास्त्रीय कशाला म्हणायचे, हे भारतातल्या वरच्या धर्मांनी आपापल्या धर्मग्रंथांमार्फत रुजवले. स्वतःला श्रेष्ठ म्हणवून घेणाऱ्या धर्मकेंद्रित जातींनी आपण जे जे करतो



ते शास्त्रीय, अभिजात आणि शुद्ध आहे अशी स्वयंघोषणा करून भारतीय समाजातील बहुतांशी बहुजनवर्गाला त्यांच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीपासून रोखले हे वेगळे सांगण्याची गरज नाही. 'उत्पादनप्रक्रियेचा ताबा ज्या वर्गाकडे असतो, तोच वर्ग सांस्कृतिक वैचारिक वर्चस्वही गाजवीत असतो,' असे कार्ल मार्क्स यांनी त्यांच्या 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो'मध्ये जे म्हटले आहे ते भारतीय समाजाच्या सांस्कृतिक इतिहासाला लावून बघितले तर, जे समाजव्यवस्थेच्या उतरंडीत वर होते, सत्ताधीश होते, धर्मरक्षक होते किंवा समाजाचे अर्थकारण नियंत्रित करण्याची सांस्कृतिक सत्ता ज्यांच्या हातात होती त्यांनी आपापल्या फायद्याप्रमाणे कला व साहित्याला नियंत्रित केलेले दिसते. राजेशाहीत राजाच्या पदरी पाळलेले भाट किंवा कवी राजाच्या मर्जीबाहेर गेले नाहीत. राजाचे गुणगाण गाणे एवढेच इतिकर्तव्य त्यांनी बजावले. भारतीय इतिहासातल्या अनेक गोष्टी त्यामुळे बाहेर आल्या नाहीत. धर्माचा आणि जातीचा वर्गीय वरचष्मा असल्याने उपेक्षित-वंचितांचा खरा इतिहास जसा बाहेर आला नाही, तसाच उपेक्षित आणि वंचितांच्या कलेला राजाश्रय आणि समाजमान्यता मिळाली नाही. ब्राह्मणी वर्चस्व ज्याला शुद्ध आणि शास्त्रीय म्हणते तेच अभिजात आणि चांगले आहे असा जो वर्गवर्चस्ववादी समज तयार झाला, त्यामुळे भारतीय कला व साहित्याचा चेहरा एकांगी झाला, ही गोष्ट नाकारता येणार नाही.

**धार्मिकता नाकारलीच पाहिजे**

भारतातल्या लोककलांच्या अभ्यासाची दिशा बदलण्याची आज नितांत गरज भासते आहे. जातींच्या पुंजक्यांनी चिरफाळलेल्या भारतात ही गोष्ट करणे तसे दुरापास्त होते; परंतु आज जागतिकीकरणात भारत बदलतो आहे. धर्मांनी उभ्या केलेल्या तटबंद्या उद्ध्वस्त होताहेत आणि जातींचा विळखाही सैल होताना दिसतो आहे. जातीव्यवस्थेचा विखार पचवून नवी पिढी पुढे निघाली आहे. ती आचाराने आणि विचारानेही ग्लोबल बनते आहे. अशावेळी 'लोक' बदलतो आहे 'लोकसाहित्य' मात्र एक ऐतिहासिक दंतकथा बनून रहायला नको. लोकसाहित्यातील

रिच्युअलची चिकित्सा व्हायला हवी. धर्माच्या हस्तक्षेपाची चिकित्सा व्हायला हवी. कर्मकांड नाकारायला हवेत. हे झाले नाही तर लोकसाहित्य आणि लोककलांमधला निसर्गभाव कळणार नाही. लोककला आणि लोकसाहित्यात प्रवाहीत झालेला नैसर्गिक श्रध्दाभाव नाकारण्याचे काही कारण नाही; परंतु त्यातली धार्मिकता मात्र नाकारलीच पाहिजे.

महाराष्ट्रातील मराठी लोककलांची आजची अवस्था बिकट आहे. अज्ञान अशिक्षितपण, दारिद्र्य आणि उपेक्षा अशा चौरंगी पेचात हा लोककलावंत उभा आहे. आधुनिकीकरणाचे ठळक परिणाम लोककलांवर झाले. शेती आणि गावगाडा उद्ध्वस्त झाल्याने लोककलावंत रस्त्यावर आले. त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली, भिकाऱ्यागत त्यांची अवस्था झाली. या सगळ्या अनर्थांचे मूळ भारतीय समाजव्यवस्थेत रुजलेल्या जात-धर्मवर्चस्ववादी मानसिकतेत दडलेले आहे, हेही नाकारता येणार नाही. आज लोककला आणि त्यांचा वाहक उपेक्षित, वंचित वर्ग लाचार बनलाय, तर चित्रपट, नाटक यांच्यासारख्या अभिजात कलांना ऊर्जितावस्था येते आहे. दिवसेंदिवस त्यांचा वाहक, उच्चवर्ग मात्र श्रीमंत होताना दिसत आहे. जात आणि कर्मकांडाचे वाहक असलेल्या धर्मांनी उभा केलेला हा अनर्थ आहे, याकडे डोळसपणे पाहण्याची ही वेळ आहे. म्हणून आज सुसंस्कृत, अभिजात कशाला म्हणायचे आणि गावंढळ कशाला म्हणायचे, याचे वर्चस्ववादी भेद छेदण्याची ही वेळ आहे. साहित्याच्या बाबतीत या भेदाला क्रांतिकारी शह देण्याचे काम दलित, ग्रामीण, आदिवासी, स्त्रीवादी या पुरोगामी साहित्यप्रवाहांनी जसे केले, तसे शास्त्रीय कला आणि लोककला यांच्यामध्ये होणे गरजेचे होते. पण जातीय व वर्गीय वर्चस्वाच्या मक्तेदारीमुळे ते पुरेसे झाले नाही. इथे एजाज अहमद यांचे साहित्याबद्दलचे मत मुद्दाम सांगावेसे वाटते. ते लोककलेलाही लागू करता येईल. अहमद म्हणतात, ''साहित्याला मोठेपण प्राप्त होण्यासाठी पुस्तकरूपात येण्याची गरज नसते. मीरेची आणि कबिराची वाणी जर साहित्य म्हणून मान्य होत असेल, तर पथनाट्य, जलसा आणि जत्रेतून गायली जाणारी गीतेदेखील साहित्यच असते.''

**जगण्यापुढील आव्हाने**

भारतीय लोककलांमधला ठासून भरलेला आशय पाहिला, की त्यांच्यातील कलेच्या दर्जाबद्दल कुणालाही शंका येत नाही. वेगवेगळ्या बोलीभाषांमध्ये लिहिली गेलेली गीते, पौराणिक, ऐतिहासिक कथानके, विनोदी प्रसंग हे सारेच काही अफलातून असते. चित्रपटाच्या पडद्यावर आणि दूरदर्शनच्या स्क्रीनवर दिसणाऱ्या अनेक आभासी आणि कृत्रिम गोष्टींपेक्षा ते अधिक सच्चे असते. भारतातील विविध राज्यांत सादर होणाऱ्या विविध ढगांच्या लोककला पाहिल्या, की भारताच्या संस्कृतीत रुजलेल्या या लोकाभिव्यक्तीचे मनमोहक आणि हवेहवेसे वाटणारे रूप मनाला वेगळाच आनंद देऊन जाते. हा आनंद देणाऱ्या लोककला या आपल्या आदिमतेशी, परंपरेशी, रुढींशी आणि मनातल्या आनंदाशी जोडल्या गेल्या आहेत. त्या आजही टिकून आहेत, हे खरे असले तरी त्या आपली अखेरची वाटचाल करत आहेत किंवा अत्यंत बिकट अवस्थेतून जात आहेत, हे नाकारता येत नाही. कोरोना संसार्गातल्या लॉकडाऊनने तर त्या पुरत्या कोसळल्या आहेत. या लोककलांचे वाहक लाखो कलावंत आहेत. भारताच्या खेडोपाड्यात ते अत्यंत बिकट अवस्थेत राहत आहेत. शिक्षणाचा अभाव, दारिद्र्य आणि आरोग्याच्या समस्या यांसारखे भेडसावणारे प्रश्न उराशी घेत ते दिवस काढत आहेत. अर्थातच हे सारे कलावंत उच्चभ्रू समाजातले नाहीत. ते तळातल्या जातीचे, गरीब, श्रमिक वर्गातले आहेत. गावगाड्यातल्या बलुतेदार जातीतले, दलित, उपेक्षित आणि भटक्या जातसमूहांतले आहेत. त्यांचे धर्म कोणतेही असोत, पण लोककलावंतांचे जातीय स्थान मात्र त्या त्या धर्मातल्या खालच्या जात-वर्गातले आहेत.

> ## ...तर मराठी लोककलांचे चित्र वगळे असते
>
> ***महात्मा जोतिबा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णा भाऊ साठे, वामन दादा अशा प्रबोधनकारी परंपरेने लोककलांना नवा विज्ञानवादी, विवेकी आणि समाजवादी चेहरा देण्याचा जो प्रयत्न केला, तो लोककलेने आणि त्यातल्या कलावंतांनी प्रामाणिकपणे स्वीकारला असता, तर आज मराठी लोककलांचे चित्र फार वेगळे असते.***

मनोरंजन आणि प्रबोधन हे लोककलांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. पण केवळ मनोरंजनावर विसंबून प्रबोधनाकडे मात्र लोककलावंताचे दुर्लक्ष झाले हेही नाकारता येत नाही. जात आणि धर्माच्या जाचक व्यवस्थेत अडकलेल्या लोककलांनी प्रबोधनाच्या रस्त्यावर ज्या मोकळेपणाने उतरायला हवे होते, ते मात्र झाले नाही. महाराष्ट्रातल्या प्रबोधन परंपरेने पारंपरिक लोककलांना प्रबोधनाचा चेहरा देण्याचा मोठा प्रयत्न केला; परंतु तो रूढी-परंपरेचा पगडा झुगारू न शकलेल्या आणि गावगाड्यातल्या वरच्या जातीवर अवलंबून असलेल्या गरीब लोककलावंतांना स्वीकारता आला नाही. परिणामी ग्रामीण भागात मनोरंजन झाले, पण समाजप्रबोधन मात्र हवे तसे होऊ शकले नाही. महात्मा जोतिबा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णा भाऊ साठे, वामन दादा अशा प्रबोधनकारी परंपरेने लोककलांना नवा विज्ञानवादी, विवेकी आणि समाजवादी चेहरा देण्याचा जो प्रयत्न केला, तो लोककलेने आणि त्यातल्या कलावंतांनी प्रामाणिकपणे स्वीकारला असता, तर आज मराठी लोककलांचे चित्र फार वेगळे असते. •••

# कोकणीतील 'ज्ञान'तपस्वी : दामोदर मावजो



(व्यक्तिविशेष)

– प्रतिनिधी

ज्येष्ठ कोकणी साहित्यिक दामोदर मावजो यांना यंदा मिळालेला ज्ञानपीठ पुरस्कार म्हणजे कोकणी भाषेचा सन्मानच मानला जात आहे. कोकणीसह मराठी आणि इंग्रजी या भाषांमध्ये लिहिलेली जवळपास १०० पुस्तके ज्यांच्या नावे आहेत, त्या रवींद्र केळेकरांनंतर ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे मावजो हे दुसरे गोमंतक साहित्यिक आहेत.

दामोदर मावजो यांचा जन्म १ ऑगस्ट १९४४ रोजी दक्षिण गोव्यातील माजोर्डा या समुद्र किनारपट्टीवरील गावात एका गरुड सारस्वत ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांना पत्नी शैला आणि तीन मुली आहेत. मावजो यांचे प्राथमिक शिक्षण मराठी आणि पोर्तुगाल भाषांमध्ये तर माध्यमिक शिक्षण इंग्रजीमध्ये झाले. ते मडगावच्या न्यू इरा हायस्कुलमध्ये शिकले. वयाच्या १२ व्या वर्षी पितृछत्र हरवलेल्या दामोदर मावजो यांनी १९६१ मध्ये १० वी उत्तीर्ण होईपर्यंत अभ्यास करत काकांच्या घरचे दुकान चालवण्यास मदत केली. १० वी नंतरच्या पुढील शिक्षणासाठी ते मुंबईला गेले. माटुंग्यातील आर.ए. पोद्दार महाविद्यालयातून वाणिज्य शाखेची पदवी त्यांनी मिळवली. लहानपणापासूनच लेखनाची आवड असलेल्या मावजो यांनी मुंबईतील चार वर्षांच्या काळात कोकणी भाषेतून लघुकथा लिहायला सुरुवात केली होती. या लघुकथांचे वाचकांनी जोरदार स्वागत केले. यातल्या काही लघुकथा इंग्रजीत अनुवादित करून प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. पदवीनंतर ते गोव्याला परतले. तिथं ते घरचं दुकान चालवू लागले. आयुष्यात सर्वाधिक काळ ते आपल्या माणसात रमले. त्यामुळे मातीशी नातं सांगणाऱ्या या साहित्यिकाच्या लिखाणात तिथल्या कॅथॉलिक पंथीय लोकांचं अस्सल चित्रण येऊ शकलं.

'गांथन' 'सपनमोगी', 'भुरगीं म्हगेलीं तीं', 'रुमडफूल', 'जागरणां' हे त्यांचे लघुकथासंग्रह. 'काणी एका खोमसाची', 'चित्तरंगी' हे कथासंग्रह, 'एक आशिल्लो बाबुलो' हा नवलकथासंग्रह वाचकांच्या पसंतीस उतरला. 'अशे घडले शणैय गोयंबाब' व 'उंच हावेस उंच माथें' ही गोयंबाबांवरील त्यांची चरित्रात्मक पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांनी 'शितू', 'अलिशा', 'सूद', 'ओ मारिया' आणि 'एनिमी' या पाच कोकणी चित्रपटांच्या पटकथा आणि संवाद लिहिले. 'अलिशा' चित्रपटासाठी उत्कृष्ट पटकथालेखनाचं, तर 'शितू' आणि 'ओ मारिया' या चित्रपटांसाठी उत्कृष्ट संवाद लेखनाचा पुरस्कार देऊन त्यांना गोवा चित्रपट महोत्सवात सन्मानित करण्यात आले. १९८५ मध्ये झालेल्या अखिल भारतीय कोकणी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. कोकणी वाङ्मयाचा पूर्व वसाहतीक आणि उत्तर वसाहतीक इतिहास यावरील प्रकल्पासाठी त्यांना २०११-१२ या वर्षात सिनिअर फेलोशिप देण्यात आली होती.

**ऐतिहासिक ओपिनियन पोलमध्ये सक्रीय सहभाग**

नव्याने स्वतंत्र झालेल्या गोव्याच्या राजकीय स्थितीविषयी निर्णय घेण्यासाठी १९६७ मध्ये गोव्यात घेण्यात आलेल्या ऐतिहासिक ओपिनियन पोलमध्ये ते सहभागी झाले होते. गोव्याचे महाराष्ट्रात विलिनीकरण करण्याऐवजी गोव्याचं स्वतंत्र अस्तित्व ठेवण्याच्या दृष्टीने मतदान करावं म्हणून त्यांनी गोवेकरांचं मत वळवण्याचं कार्य केलं. कोकणी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळावा, गोव्याला स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळावा आणि कोकणी भाषेचा राज्यघटनेच्या ८ व्या परिशिष्टात समावेश करावा या तीन मागण्यांसाठी १९८५ ते १९८७ अशी दोन वर्षे चाललेल्या 'कोकणी पोरजेचा आवाज' या चळवळीच्या सुकाणू समितीतही ते होते. साहित्य अकादमी, नवी दिल्लीच्या कार्यकारी मंडळ आणि वित्तीय समितीचे सदस्य म्हणून त्यांनी पाच वर्षे काम पाहिलं. ते गोवा कला आणि वाङ्मय महोत्सवाचे सहसंस्थापक आहेत.

**समतेचे पुरस्कर्ते**

पुरोगामी विचारांच्या दामोदर मावजोंनी समता आणि न्यायाची कायमच पाठराखण केली आहे. धमक्या किंवा भीतीपोटी ते कधीही मागे हटले नाहीत. आज ७७ व्या वर्षीही ते सातत्याने चौफेर वाचन करतात. त्यांच्या लिखाणातून साहित्यातील नवे ट्रेंड आणि पद्धती पाहायला मिळतात.

# गोमंतक लेखकाच्या सहवासातील काही क्षण



प्रा. रोहिदास जाधव

गोव्यात ९ ते १२ डिसेंबरदरम्यान फुले-शाहू-आंबेडकर विचार प्रसारक मंडळ भोर (जिल्हा-पुणे, महाराष्ट्र) च्या वतीने राष्ट्रीय फुले-शाहू-आंबेडकर विचार संमेलन भरवण्यात आले होते. त्याच्या एक दिवस अगोदर 'ज्ञानपीठ' पुरस्कारांची घोषणा झाली होती. यात कोकणी भाषा आणि साहित्य समृद्ध केलेले प्रसिद्ध लेखक दामोदर मावजो यांना हा पुरस्कार जाहीर झाला होता. दामोदर मावजो यांना फुले-शाहू-आंबेडकर विचार संमेलनात निमंत्रित करून त्यांचा सन्मान करण्याची आमची सर्वांची इच्छा होती. तसा संपर्कही झाला; परंतु गोव्यातील अनेक मान्यवरांनी, रसिकांनी मावजोंच्या घरी त्यांचा सन्मान करण्यासाठी जी रीघ लावली त्याला सीमा राहिली नव्हती. त्यामुळे संमेलनात त्यांचा सन्मान करण्याची आमची संधी चुकली.

**...म्हणून त्यांना भेटण्याची होती अनावर इच्छा**

एखाद्या लेखकाला 'ज्ञानपीठ' पुरस्कार जाहीर होणे हे 'नोबेल' पुरस्कार मिळण्याइतकेच श्रेष्ठ असते. अशा ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त लेखकाची भेट होणे हा त्याहून अधिक गौरवाचा भाग असतो. मला स्वतःला ही संधी अजिबात चुकवायची नव्हती. रवींद्र केळेकर यांच्यानंतर ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे दामोदर मावजो हे दुसरे कोकणी लेखक आहेत. त्यामुळे कोकणी भाषेचा दर्जा अधिक उंचावला आहे. दामोदर मावजो यांच्याबाबत काही जुजबी माहिती मला होती. कोकणी साहित्य वैश्विक होण्यासाठी त्यांची असलेली धडपड, त्यांच्या कथा, कादंबऱ्या यांचा देश-विदेशातील भाषांमधून झालेला अनुवाद, 'कार्मेलिन' या कादंबरीने जागतिक स्तरावर प्रस्थापित केलेला उच्चांक, 'तेरेसाज मॅन' या पुस्तकाला मिळालेला आंतरराष्ट्रीय पुरस्कार अशा काही घटना ज्ञात होत्या. त्याचबरोबर त्यांच्या लेखनातील वास्तव जीवनाचे चित्रण आणि अंधश्रद्धेविरुद्धचे बंड यामुळे या लेखकाला भेटण्याची इच्छा तीव्र झाली. कलबुर्गी आणि गौरी लंकेश यांच्या हत्येनंतर मावजो यांच्याकडे कटाक्ष असल्याच्या बातम्याही आल्या होत्या. त्यांच्यातला बंडखोर लेखक मला माहीत होता. त्यामुळेच त्यांना भेटण्याची इच्छा अनावर होती.


**मृत्यूचे भय नसलेला लेखक**

मावजो यांना भेटायची इच्छा आणखी एका कारणासाठी प्रबळ होती. ती म्हणजे ते केवळ लेखक नाहीत, साहित्यापुरतेही ते मर्यादित नाहीत. वेळप्रसंगी पर्यावरणाची हानी करणाऱ्या प्रकल्पांविरोधात आणि मानवाधिकाराच्या बचावासाठी चार हात करायला मागेपुढे न पाहणारे ते लेखक आहेत. त्यांच्या आस्थांविषयी ते स्पष्ट व प्रामाणिक असल्याने ते कशालाच कधी बळी पडलेले नाहीत. समाजकारणात, राजकारणात सर्जनशील पद्धतीने आवाज उठवला पाहिजे, ही त्यांची प्रामाणिक भूमिका आहे. असे असल्यामुळेच त्यांना जिवे मारण्याच्या धमक्या आल्या पण त्यात त्यांना भीती वाटली नाही. दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश यांचे खून झाले पण तरी मरेपर्यंत त्यांचे काम सुरू होते. उलट मृत्यूने त्यांचे काम अधिक पुढे गेले अशी मावजो यांची भावना आहे. मृत्यूचे भय त्यांना अजिबात वाटत नाही. पण आज देशातील लोकांचा आवाज दाबला जातोय आणि लोक त्याला बळी पडत आहेत, याची त्यांना अधिक भीती वाटते आहे. लोकांमधील उदासिनतेविषयी, अनास्थेविषयी आवाज काढला पाहिजे. सरकार कुठलाही पक्ष चालवो, पण प्रस्थापित व्यवस्थेविषयी माणसं निब्बर, निष्काळजी होतात. त्याविरोधात मावजो आवाज उठवताना दिसतात. हे त्यांच्या स्वभावाचे व्यवच्छेदक लक्षण त्यांच्या भेटीसाठी मला अस्वस्थ करत होते.

उत्तम कांबळे सरांनी त्यांना फोन केला आणि ११ डिसेंबरला सायंकाळी भेटीची वेळ ठरवली. 'पेडण्या'हून आम्ही 'कांदोळी'ला आलो. डॉ. रावसाहेब कसबे या ठिकाणी आराम करत होते. त्यांना गाडीत घेतले आणि पणजीमार्गे 'माजोर्डा'साठी निघालो. यावेळी अनेक विचारांनी मनात गर्दी केली होती. निसर्गसंपन्न गोवा, नारळ, आंब्यांच्या हिरव्यागार वनश्री, सागरी किनारे आणि संपन्न वातावरणाला साजेशी, तितकीच लयबद्ध कोकणी भाषा! अत्यंत सात्विक आणि इतरांच्या मनात घर करणारी! त्या भाषेची सेवा करणाऱ्या ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त लेखकाला भेटताना संवादाची प्रमेयं काय असतील? मी ज्यांच्यासोबत चाललो तेही आंतरराष्ट्रीय पातळीवरील विचारवंत आहेत. डॉ. रावसाहेब कसबे आणि उत्तम कांबळे यांची नेमकी भूमिका काय राहील? असे अनेक प्रश्न मला सतावत राहिले. मात्र या दोन्ही विचारवंतांच्या चेहऱ्यावर मावजोंना भेटण्याची ओढ मी स्पष्टपणे पाहत होतो.

**भेटीचे उत्कट काव्य**

विचारांच्या गर्दीतच 'माजोर्डा' येथील रेल्वे ट्रॅकच्या बाजूला असलेल्या, सर्व बाजूंनी झाडीवेलींनी वेढलेल्या टुमदार घरासमोर आमची गाडी उभी राहिली. गाडीतून उतरून घराचे फाटक बाजूला करून आत शिरताच घरात



**दामोदर मावजो यांना साहित्यातील सर्वश्रेष्ठ मानला जाणारा 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाल्याबद्दल माजोर्डा येथील निवासस्थानी त्यांचा पुष्पगुच्छ आणि ग्रंथ देऊन सत्कार करताना ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे आणि फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते प्रा. रोहिदास जाधव.**

अनेकांनी गर्दी केल्याचे दिसले. रावसाहेब आणि कांबळे सरांना पाहताच त्या गर्दीतूनही मावजो दरवाजात आले. त्यांनी अत्यंत विनयाने आणि हसतमुखाने आमचे सर्वांचे स्वागत केले. इतकेच नाही तर त्यांनी रावसाहेबांना कडकडून मिठी मारली. या मिठीत मराठी-कोकणीचे एकात्म स्वरूप मला दिसले. महाराष्ट्राच्या सह्याद्रीने गोव्याच्या कडेकपारींना आपल्यात सामावून घेण्याचा व स्वतःचे रुप अधिक उन्नत असल्याचे दर्शवणारा हा प्रसंग मला हृद्य वाटला. हा प्रसंग तिथल्या उपस्थितांनी आपल्या नजरेत भरभरून घेतला. कोकणी भाषेचे अनेक साहित्यिक, समीक्षक, गीतकार-संगीतकार तिथे हजर होते. साहजिकच त्यांच्या मनात या भेटीचे एक उत्कट काव्य निर्माण झाले असणार! मावजो ज्या हॉलमध्ये आम्हाला भेटले, तिथे अनेक वस्तूंनी गर्दी केली होती. पुष्पगुच्छ ढिगाने होते. पुस्तके, ग्रंथ भेट म्हणून आले होते. मिठाई, पेढे यांची रेलचेल होती. तिथेच कोपऱ्यात मावजोंचे चित्र काढून कुणीतरी भेट दिलेली फोटो फ्रेम होती. त्यांच्या आदर्शांचे काही फोटो होते. त्यांच्या जीवननिष्ठा प्रतीत करणाऱ्या कलाकृतीही होत्या. त्यांची जीवनसाथी आणि मुलगी येणाऱ्या प्रत्येक पाहुण्यांचे मनःपूर्वक स्वागत करत होत्या. त्यांच्या चहापाण्याची, गोडधोड खायला घालण्याची मनापासून व्यवस्था करत होत्या. आम्हालाही त्यांनी आग्रहाने पेढे आणि स्वतः बनवलेले लाडू खायला घातले. त्याची लज्जत न्यारीच होती. या सर्वांचा आस्वाद घेत घेतच विचारवंतांच्या गप्पा रंगल्या. त्यातूनच उदात्त अंतःकरणाच्या मावजो यांचा परिचय होत गेला. आपल्या भूमिकेशी ठाम, विवेकवादी व अंधश्रद्धेच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या मावजोंचे वेगळेपण पारखण्याची गरजच उरली नाही. कांबळे सरांनी आणि मी स्वतः पुन्हा पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला. काही पुस्तके भेट दिली. भोरच्या फुले-शाहू-आंबेडकर विचार प्रसारक मंडळाने म्हणजे महाराष्ट्राने आणि डॉ. रावसाहेब कसबे व उत्तम कांबळे या विचारवंतांनी मावजोंचा हा सन्मान करण्याची पहिली संधी प्राप्त करून घेतली. आम्ही कृतकृत्य झालो.

**आतिथ्यशील आणि विनयशील**

भारताच्या साहित्य जगतातील सर्वोच्च पुरस्कारप्राप्त लेखकाला भेटण्याचा आनंद शब्दातीत होता. 'महाराष्ट्र आणि मराठी भाषकांनी माझा कायम सन्मान केला आहे. पुरस्कार जाहीर झाल्यानंतरही महाराष्ट्रातील एकजात साऱ्या वृत्तपत्रांनी याची दखल घेऊन मला अधिक मोठे केले. याबाबत मी कृतज्ञता व्यक्त करतो. माझी महाराष्ट्र आणि मराठीशी कायम नाळ जुळली गेली आहे. आपण माझ्या घरातील आहात. त्यामुळे आपण माझ्याकडे कधीही येऊ शकता.' असे भावोद्गार मावजो यांनी निरोपाच्या वेळी काढले. विचाराने आणि कर्तृत्वाने अतिविशाल असलेले मावजो तितकेच आतिथ्यशील, ऋजू, विनयशील व आपुलकीच्या भावनेने ओतप्रोत भरलेले दिसले. म्हणूनच 'ज्ञानपीठ' आपल्या घरात, आपल्या माणसाला मिळाल्याचा आनंद घेऊन आम्ही परतलो.

•••

**(लेखक फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते आहेत)**

पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

## वार्षिक वर्गणीदारांना

२०%

## सवलत!

### देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक

---

**हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!**

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदाराचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा :

कार्यालय : ११ तळमजला, बी ब्लॉक, लक्ष्मी निवास,
जे.के. सावंत मार्ग, यशवंत नाट्य मंदीरा समोर,
माहीम (वेस्ट), मुंबई- ४०००१६

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ६०० | ५०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ३०० | ३०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | १५० | १५० | |

(वार्षिक विशेषांक - ६) / (६ महिने-३)

चेक किंवा डीडी ने पेमेंट

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. -------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. --------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ MasterCard ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : -------------------------------- जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना------ वर्ष-----

नाव : ---------------------------------------------------पत्ता : ----------------------------------------

---------------------------------------------------शहर : ------------------------------------------------

राज्य : ------------------------ पिन कोड : ------------------- फोन नं. (घर) : --------------------------

मो. नं. : ----------------------इ-मेल : ------------------------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता
२९ ऑगस्ट ते १२ सप्टेंबर २०१८

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२
किंवा ७३५००९१५६३ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा
thepeoplespost2014@gmail.com

लॉग ऑन करा
www.thepeoplespost.com

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.


# बाबासाहेबांचे दाहक अनुभव

**डॉ.** बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५-३६ दरम्यान लिहिलेले 'वेटिंग फॉर अ व्हिसा' हे आत्मकथन आजही कोलंबिया विद्यापीठात शिकवले जाते. बाबासाहेबांचे मराठी वाचकांपासून दुर्लक्षित असलेले हे आत्मकथन पहिल्यांदाच मराठी भाषेत आणण्याचे महत्कार्य आंबेडकरी चळवळीतील लेखक भीमराव सरवदे यांनी केले आहे. या ग्रंथाचा मराठी अनुवाद 'आठवणी आणि अश्रू' या नावाने औरंगाबादच्या आनंद प्रकाशनाने नुकताच प्रकाशित केला आहे.

दलित साहित्यातील हे पहिलेच आत्मकथन म्हणावे लागेल. पीपल्स एज्युकेशन सोसायटीकडे या ग्रंथाचे इंग्रजी हस्तलिखित उपलब्ध असल्याने त्यांनी ते १९ मार्च १९९० रोजी प्रकाशित केले. याचा मराठी अनुवाद नुकताच प्रकाशित झाला. त्यामुळे डॉ. आंबेडकरांना जवळपास ४० वर्षांमध्ये आलेले कटू अनुभव त्यांच्याच शब्दात मराठी वाचकांना वाचावयास मिळणार आहेत. हे आत्मकथन का लिहावेसे वाटले, याचे स्पष्टीकरण देताना डॉ. बाबासाहेब प्रस्तावनेत म्हणतात, विदेशी लोकांनाही अस्पृश्यता काय आहे हे माहीत आहे; परंतु प्रत्यक्षात याची झळ त्यांना बसली नसल्यामुळे ती किती जुलमी आहे, याची जाणीव त्यांना नाही. त्यांना हे समजावून सांगण्यासाठी अस्पृश्यतेचे वर्णन करण्यापेक्षा अस्पृश्यांवरील अन्यायाच्या काही प्रकरणांचे वर्णन करणे अधिक चांगले, म्हणून मी यात सहा अनुभव सांगितले आहेत. त्यातील चार स्वतःचे तर दोन इतर अस्पृश्य व्यक्तींचे आहेत, असे बाबासाहेब म्हणतात. कोरेगावचा बालपणीचा प्रवास, बडोद्याचा भयंकर प्रसंग, चाळीसगावचा माझा भीषण अपघात, दौलताबाद येथे मुसलमान अंगावर धावून आले या चार प्रकरणांमध्ये बाबासाहेबांना आलेले अनुभव तर शिक्षकाच्या पत्नीवर उपचारास डॉक्टरचा नकार आणि भंगी मुलगा तलाठी झाला पण... या दोन प्रकरणांतून बाबासाहेबांनी इतर व्यक्तींचे अनुभव सांगितले आहेत.

**नवव्या वर्षी अस्पृश्यतेचा अनुभव**

डॉ. बाबासाहेबांना पाण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागला. कोरेगावच्या प्रसंगात अस्पृश्यता व पाणी हे दोनच मुद्दे महत्त्वाचे असून त्याचा डॉ. आंबेडकरांना किती त्रास झाला, याचे वर्णन या प्रकरणात आहे. त्यावेळी बाबासाहेबांचे वय फक्त नऊ वर्षांचे होते. आंबेडकर कुटुंब सातारा येथे राहत होते. त्यांचे वडील खटाव तालुक्यातील कोरेगाव येथे दुष्काळी कामावर कॅशिअर म्हणून कार्यरत होते. सुट्टीत मुलांना त्यांनी कोरेगावला बोलावले. मसूर रेल्वे स्टेशनला उतरा, तेथे माझा शिपाई किंवा मी येईल, असा निरोप त्यांनी मुलांना दिला होता. त्याप्रमाणे बाबासाहेब, त्यांचा भाऊ व बहिणीची दोन मुले रेल्वेने निघाली व मसूरला उतरली; परंतु ज्या व्यक्तीमार्फत ते येणार असल्याची खबर वडील रामजींना द्यायची होती, ती व्यक्ती




**(ग्रंथपरिचय)**

**प्रा. बी.सी. सोमवंशी**

वेळेत रामजींपर्यंत पोहोचलीच नव्हती. त्यामुळे मसूर स्टेशनवर ना शिपाई आला होता, ना वडील. त्यामुळे ते बराच वेळ स्टेशनवर बसून होते. स्टेशन मास्तरने तिथं येऊन, का बसला आहात, असा प्रश्न केला. त्यावर घडलेला प्रकार मुलांनी सांगितला. तुम्ही कोण आहात, या स्टेशन मास्तरच्या प्रश्नावर आंबेडकरांनी चटकन उत्तर दिले, 'आम्ही महार आहोत. आम्हाला बैलगाडी मिळाली तर आम्ही कोरेगावला जाऊ.' पण अस्पृश्यांना बैलगाडीत घेणे अशक्य होते. तरी स्टेशन मास्तरने दुप्पट भाड्यात गाडी करून दिली. संध्याकाळी साडेसहाला कोरेगावचा प्रवास सुरू झाला. पाच-सहा मैल गेल्यावर एक कोरडी नदी लागली. येथेच जेवण करून घ्या पुढे पाणी मिळणार नाही, असे गाडीवान म्हणाल्यामुळं मुलं जेवणास बसली. एकजण पाण्यासाठी गेला; परंतु नदीतील खड्ड्यात जनावराचे मलमुत्र पडलेले असल्याने ते पाणी पिण्यायोग्य नव्हते. अर्धवट जेवण करून मुलांनी दशम्या बांधून ठेऊन दिल्या. तहान लागलेली होती पण पाणीच नव्हते. मध्यरात्री ते जकात नाक्यापर्यंत पोहोचले. मुलांना प्रचंड तहान व भूक लागली होती. त्यांच्याकडे जेवण भरपूर होते, पण पाण्याचा प्रश्न होता. बाबासाहेबांनी जकात नाक्यावाल्याकडे जाऊन पाण्याची विचारणा केली. जात महार असल्याचे कळल्यावर तेथील माणसाने पाणी न देता हाकलून दिले. त्यामुळे सर्वजण जेवण न करताच झोपून गेले. दुसऱ्या दिवशी अकरा वाजता ही मुलं कोरेगावला पोहोचली. याचा अर्थ या मुलांना जवळजवळ अठरा तास अन्नपाण्याविना राहावे लागले. यासंदर्भात बाबासाहेब म्हणतात, सातारा-कोरेगाव या प्रवासातील घटनेमुळे मला अभूतपूर्व असा धक्का बसला आणि त्यामुळे मी अस्पृश्यतेबद्दल विचार करू लागलो.

**वटवाघळे फिरणाऱ्या रुममध्ये राहिले**

दुसरा प्रसंग बडोद्यातील. तो कोरेगावपेक्षाही भयानक होता. अमेरिकेतील उच्चशिक्षणासाठी सयाजीराव गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिष्यवृत्ती दिली होती. तेव्हा काही अटी

टाकण्यात आल्या होत्या. शिष्यवृत्तीची सर्व रक्कम फिटेपर्यंत संस्थानात नोकरी करावी लागेल, ही एक अट त्यात होती. सन १९१७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर नोकरीसाठी बडोद्यास निघाले. रात्री स्टेशनवर उतरल्यानंतर त्यांच्यापुढे फार मोठा प्रश्न पडला तो म्हणजे, आता जाणार कुठे आणि राहणार कुठे? या विवंचनेत ते तेथेच उभे होते. शेवटी एका टांगेवाल्याच्या सल्ल्याने पारशी धर्मशाळेत पारशी म्हणून ते राहू लागले. ज्या खोलीत ते राहत होते ती एक स्टोअर रूम होती, जेथे मोडक्या टेबल-खुर्च्या व इतर मोडके फर्निचर अस्ताव्यस्त पडलेले होते. ते धुळीने माखलेले होते. तेथे विजेचा किंवा तेलाचाही दिवा नव्हता. व्यवस्थापक एक मिणमिणता दिवा आणून ठेवत असे. वटवाघळं खोलीत इकडून तिकडे फडफडत असत.

एके दिवशी सकाळी ते ऑफिसला निघाले तेव्हा पारशी समाजाची दहा ते बारा बलदंड माणसं हातात काठ्या घेऊन आली. तू धर्मशाळा दूषित केलीस, तू गुन्हेगार आहेस, असे म्हणत ते रागाने बेभान झाले होते. बाबासाहेब म्हणतात, त्याप्रसंगी मी शांत न राहता प्रतिकार केला असता तर माझा खूनसुद्धा झाला असता. संध्याकाळपर्यंत तू येथे दिसायला नको असा दम भरून ती माणसं निघून गेली. बडोद्यात डॉ. आंबेडकरांचे हिंदू व ख्रिश्चन धर्मातील दोन-तीन मित्र होते. कुठे राहण्याची सोय होते का म्हणून त्यांच्याकडे विचारपूस केली; परंतु व्यर्थ! तोपर्यंत दुपारचे चार वाजले होते. आता कुठे जायचे, हा प्रश्न होता. शहराबाहेर कामठीबाग नावाच्या सार्वजनिक बागेत जाऊन ते विचार करत बसले. रात्री आठ वाजता खोलीवर येऊन आपले सर्व सामान घेऊन मुंबईला घरी निघाले. केवळ अकरा दिवसांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बडोदा सोडून घरी यावे लागले. आता येथे प्रश्न निर्माण होतो तो हा, की जर संस्थानात नोकरी करणे बंधनकारक होते तर आंबेडकरांना सयाजीराव गायकवाड यांनी संरक्षण का नाही दिले किंवा त्यांना त्रास देणाऱ्या लोकांना शिक्षा का नाही केली? कारण त्यावेळी अस्पृश्यताविरोधी अनेक कायदे संस्थानात अस्तित्वात होते. डॉ. बाबासाहेबांनी ३१ ऑगस्ट १९१७ रोजी सयाजीराव महाराजांची भेट घेऊन राहण्याची अडचण, ऑफिस आणि क्लब येथे मिळत असलेल्या अपमानकारक वागणुकीबद्दल सांगितले. तेव्हा ते उलट आंबेडकरांनाच सबुरीचा सल्ला देत म्हणाले, ''क्लबमधील वागणूक व राहण्याच्या गैरसोयीबद्दल योग्य परिस्थिती प्राप्त होताच व्यवस्था करू! ही परिस्थिती नाजूक आहे. त्याबद्दल मलाही एकदम अधिकार गाजवून सवर्ण हिंदू लोकांत असंतोष माजविता येत नाही. आहे त्या परिस्थितीस धैर्याने तोंड देत रहा.''

**अपघातातून थोडक्यात बचावले**

पुढील प्रकरणातील चाळीसगावचा अपघात हा प्रामुख्याने आपल्या पुढाऱ्यांच्या अल्पशा चुकीमुळे व बाबासाहेबांवरील प्रचंड प्रेमापोटी घडला. सुदैवाने त्यात ते थोडक्यात बचावले. मुंबई सरकारने अस्पृश्यांच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमली होती. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक सदस्य होते. त्या कामासाठी ते धुळ्याला जाताना चाळीसगावला उतरले. तेथे अस्पृश्य मंडळींनी त्यांना मुक्काम करण्याची विनंती केली. त्यास बाबासाहेबांनी होकार दिला. रेल्वेस्टेशनपासून बाबासाहेबांना चालत नेणे हे त्यांच्या प्रतिष्ठेला शोभणारे नव्हते. म्हणून ते टांग्याची व्यवस्था करीत होते, पण अस्पृश्य व्यक्तीला टांग्यात घेण्यास कोणताच टांगेवाला तयार नव्हता. शेवटी एकाने टांगा दिला, पण अस्पृश्यांपैकी एकाने टांगा चालवण्याच्या अटीवर. त्या कार्यकर्त्यास टांगा हाकण्याची सवय नसल्याने त्याचे टांग्यावरील नियंत्रण सुटून टांगा पुलाच्या गार्ड स्टोनवर आदळला. बाबासाहेब खाली दगड गोट्याच्या रोडवर आदळून त्यांचा एक पाय फॅक्चर झाला, तर टांगा आणि घोडा खाली नदीत कोसळला. यासंदर्भात डॉ. आंबेडकर म्हणतात, हिंदू टांगेवाला मग तो कितीही हलके काम करणारा असो, तो एखाद्या अस्पृश्य विद्वानापेक्षाही स्वतःला श्रेष्ठ समजतो. असे म्हटले जाते, की पारशी आणि मुस्लिम धर्मात अस्पृश्यता पाळली जात नाही. पण ही गोष्ट निदान भारतापुरती तरी खोटी आहे. म्हणूनच बाबासाहेबांना बडोद्यात पारशांचा जसा अनुभव आला, तसाच मुसलमानांसंदर्भात दौलताबादला आला.

**दौलताबादला मुस्लिमांकडून अपमान**

१९३४ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे तीस सहकारी वेरूळला जात होते. मुंबईवरून नाशिकमार्गे वेरूळला जाताना वाटेत दौलताबाद येथील ऐतिहासिक किल्ला पाहण्यासाठी ते तेथे गेले होते. किल्ल्याच्या दारातच एक पाण्याचा हौद होता. प्रवासात अंगावर धूळ साचल्यामुळे बाबासाहेबांच्या सहकाऱ्यांनी हौदातून पाणी काढून हातपाय धुतले व सर्वजण किल्ल्याच्या गेटवर गेले. त्यांना आत घेण्यात आले. दरम्यान, एक वृद्ध दाढीवाला मुसलमान पाठीमागून मोठ्याने ओरडत येत होता. तो म्हणाला, धेडांनी हौद बाटवला. हे ऐकून जवळचे तरुण व वृद्ध मुसलमान तिथे गोळा झाले. त्या सर्वांनीच शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यांनी अगदी रौद्र रूप धारण केले होते. वातावरण इतके तापले होते, की दंगल घडून खूनखराबा होण्याची शक्यता होती. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांना रागाने म्हणाले होते, तुमचा धर्म हेच शिकवतो का? जर एखाद्या अस्पृश्याने मुस्लिम धर्म स्वीकारला तर तुम्ही त्याला या हौदातील पाणी घेण्यास रोखाल का? या प्रश्नाचे त्यांनी काहीच उत्तर दिले नाही. ते शांत उभे होते. मग बाबासाहेबांनी सुरक्षारक्षकाला रागाने विचारले, आम्हाला किल्ल्यावर जाऊ देता की नाही? त्यांनी परवानगी दिली, पण किल्ल्यावर कोठेच पाण्याला हात लावायचा नाही या अटीवर! एवढेच नव्हे तर, त्यांच्यावर नजर ठेवण्यासाठी एक सशस्त्र सैनिक देण्यात आला होता. •••

**(लेखक अर्थशास्त्राचे आणि मातंग चळवळीचे अभ्यासक आहेत)**

**आठवणी आणि अश्रू** (वेटिंग फॉर अ व्हिसा)
**मूळ लेखक :** डॉ बाबासाहेब आंबेडकर
**मराठी भाषांतर :** भीमराव सरवदे
**प्रकाशक :** आनंद प्रकाशन, औरंगाबाद **पृष्ठे:** ४५, **किंमत:** ५० रु.

कविता

# तोंड बांधलेल्या अभिव्यक्तीचे संमेलन

तोंड बांधलेल्या
अभिव्यक्तीचे संमेलन

कसेही करा पण
होऊ द्या एकदाचे मीलन

विरह फारच
असह्य झाला आहे

अर्धवट असो की अर्धे
तेवढेही चालेल आम्हाला

जागा नको, झालेच नाही,
केलेच नाही म्हणायला

कसेही करून, म्हणायचेच
आहे, करून दाखवले

आत काय वाटेल ते असो
वरून तर दाखवले

सहभागी नाही म्हणून
आमचा समजू नका विरोध

तुमचे चालू द्या
तुम्ही नेहमीसारखेच अविरोध

**- डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**



# फुलण्याचे वेड

फुलण्याचे मज वेड लागले फुलतो आहे
फुलता फुलता रोज फुलोनी झडतो आहे

तलवारीच्या पात्याला घेतो घासूनी
लढण्याशी नाते माझे, लढतो आहे

जोडूया चल, विश्वाची ही मांदियाळी
माणुसकीचा देव्हारा मी भरतो आहे

जळणाऱ्याला कुठे तरी हे कळते सांगा
कष्टाने मी नियतीपुढती चलतो आहे

तरण्यासाठी वरच्या देवा ये रे आता
रिती आसवं पाहूनच मी बुडतो आहे

येथे दारिद्र्याची पौर्णिमा फुलली हो
इतरांसाठी चांदोबा मी हसतो आहे

ऋतूत हिरव्या वाढत गेलो जगण्याच्या पण
झाडांसाठी थोडा थोडा झडतो आहे

**- बाळासाहेब लबडे**

# जुन्याला कलाई करून म्हणा

# नव्या वर्षाच्या शुभेच्छा!

एकीकडे स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरीतच नवं वर्ष म्हणजे २०२२ वर्ष येत आहे. आनंददायी अशी घटना आहे. भारत जेव्हा २०२० मध्ये म्हणजे ट्वेन्टी-ट्वेन्टीमध्ये जाईल तेव्हा तो महासत्ता होईल, असं भाकीत दिल्लीत एका राष्ट्रपतीनं केलं होतं. त्यांच्या कारकीर्दीत भारत काही महासत्ता होऊ शकला नाही. नवे वर्ष पाहायला ते हयात नाहीत. भारत महासत्ता होणार हे त्यांचं एक स्वप्नं होतं. स्वप्नं पाहण्याचा सर्वांना अधिकार असतो. अजून तरी त्यासाठी आधारकार्ड, पॅन कार्डची गरज नाही. नागरिकत्व सुधारणा कायद्याचीही गरज नाही. भारत काही महासत्ता झाला नाही, पण भारताचा कारभारी महासामर्थ्यवान झाला, असं म्हणतात. नव्या वर्षात तेवढीच एक गोष्ट लक्षात ठेवावी अशी आहे. बाकी जुन्या वर्षात वेताळासारखे लटकणारे अनेक जगण्यामरण्याचे प्रश्न मागील पानावरून पुढे चालू याप्रमाणे ओढले जाणार आहेत. एक दिवस बदलेल या आशेवर सामान्य माणूस जगत असतो. बहुतेक वेळा तो दैववादी बनून सटवीनं बनवलेल्या भविष्यावर विश्वास ठेऊन चालत असतो. कसल्याही परवानगीची गरज नसल्यामुळे तो भरपूर स्वप्न पाहतो. नवी स्वप्नं, जुनी स्वप्नं, चुराडा झालेली स्वप्नं असं बरंच काही तो पाहत असतो आणि एक दिवस स्वप्नांतच जगण्याची सवयही तो स्वतःला लावून घेतो. यासाठी कोणत्या बोटीवर त्याला ड्रग घेण्याची आवश्यकता नसते. स्वाभाविकच त्याला कोणा धर्मांतरित वर्दीवाल्याची भीती नसते.

नवं वर्ष येईल तेव्हा त्याच्या अंगावर काही जुने व्रण असतील. फेअर ॲण्ड लवलीसारखं झटपट सुंदर करणारं केमिकल लावूनही ते पुसले जाणार नाहीत. उलट 'दाग अच्छे लगते है', असं त्याला शिकवलं जाईल आणि भागणाऱ्या इंडियात टिकून राहायचं असंल तर कुठल्या तरी विशिष्ट कंपनीनं विक्रीस काढलेलं दूध पी आणि ते कसं प्यायचं हे टीव्हीवर बघ, असंही सांगितलं जाईल. नव्या वर्षात गेल्यानंतर त्यानं जर वळून पहायचं ठरवलं, तर त्याच्यासाठी भेसळीनं लिहिलेला इतिहास असेल. आंदोलनात मरण पावलेल्या शेतकऱ्यांची सात-आठशे प्रेते दिसतील. कोरोनामुळे मरण पावलेल्यांची प्रेते




घेऊन फुगलेली गोदामाई दिसेल. मॉब लिंचिंगमध्ये ओरडणारे दिसतील. रक्त शोषून घेणारी महागाई दिसेल, नोकरीसाठी लांबलचक गर्दी दिसेल, कोरोनाच्या भीतीनं सशाचं काळीज घेऊन जगणारे कोट्यवधी दिसतील, आरक्षणातून तयार होणारी धग दिसेल, काही राज्यांमध्ये होणाऱ्या निवडणुकीच्या फडात चौफेर उधळली जाणारी आश्वासने दिसतील. बरंच काही काही तरी त्याला दिसेल आणि या सर्वात महाशक्तिमान होण्यास निघालेला पण प्रत्यक्षात जनतेचे रोजी-रोटीचे प्रश्न सोडवताना अस्वस्थ, अशक्त बनलेला देशही दिसेल. राष्ट्रवाद, धर्मवादाच्या नव्या कल्पनाही दिसतील. 'अब तेरा क्या होगा' असं दरडावून विचारणाराही कोणीतरी दिसेल. एका दिशेनं चाललेलं आणि जीममधल्या पोरासारखं एकतर्फी सशक्त झालेलं राजकारण दिसेल. आमच्या वाट्याचं काय आणि आमच्या अभिव्यक्तीचं काय, असे प्रश्न दिसतील. देवाच्या घरावर सोन्याचे पत्रे दिसतील आणि छप्पर नसलेल्या फुटपाथवर माणसांची गर्दीही दिसेल. रिवाईंड आणि फॉरवर्डसारखं दिसेल. तरीसुद्धा स्वप्नांवर जगणारा माणूस 'इडा पीडा टळो आणि बळीचं राज्य येवो', 'इडा पीडा टळो आणि संविधान सुरक्षित राहो' असं म्हटल्याशिवाय कसा बरं जगेल. बऱ्याचदा सामान्य माणसाची स्वप्ने आणि त्याचे प्रश्नही कोणा नेत्यापेक्षा महाशक्तिमान ठरत असतात.

# पोलिस कोठडीतील मृत्यूतही

# महाराष्ट्राचीच आघाडी

पोलिस कोठडीत कोणत्याही कारणासाठी एखाद्याला बोलावलं असेल आणि तेथे संबंधिताचा कोणत्याही कारणास्तव मृत्यू झाला असेल तर त्याला कायद्याच्या भाषेत कोठडीतील मृत्यू म्हणतात. पोलिसांच्या ताब्यात असतानाच्या काळात असा मृत्यू झाल्यास त्याची कोठडीतील मृत्यू अशी नोंद होते. असे मृत्यू होण्याचे प्रमाण आपल्या देशात नेहमीच खूप राहिलेले आहे. पूर्वी अशा मृत्यूच्या बाबतीत बिहार, उत्तर प्रदेश, काश्मीर आदी राज्ये बदनाम झाली होती. त्यात ती आघाडीवर होती. पोलिस कोठडीत छळ करणे, अमानवी शिक्षा देणे, प्रसंगी एखादा अवयव तोडणे वगैरे प्रकार आरोपी पोलिसांच्या ताब्यात असताना घडायचे आणि घडत आहेत. या कृत्याला आळा घालण्यासाठी जगभरातील मानवी अधिकार संघटनांनी आवाज उठवला, आंदोलने केली. कायद्यानं काही बदल घडवले, पण मृत्यू काही थांबलेले नाहीत. सर्वसामान्य माणूस, आंदोलक, न्यायाधीश वगैरे अनेक घटकांनी याविषयी चर्चा केली, पण मृत्यू काही थांबलेले नाहीत. खुद्द सरन्यायाधीश रमणा यांनीही चिंता व्यक्त केली होती. नागरिकाला त्याच्या जीविताचं कवच आहे. राज्यघटनेनंच त्याला ते दिलं आहे. जगण्याचा आणि सन्मानानं जगण्याचा हक्क त्याला आहे. आत्महत्येला बंदी आहे. माणसाचं जीवित सर्वात अधिक महत्त्वाचं मानलं गेलंय. हे असताना कायद्याचे रक्षकच अनेकदा कायद्याच्याच मानेवर पाय ठेऊन एखाद्याचा बळी घेतात पोलिस कोठडीत. मानवाच्या मुक्तीचा पोवाडा गाण्यात, तसा विचार करण्यात, फुले-शाहू-आंबेडकरांचं नाव सांगण्यात आघाडीवर असलेल्या महाराष्ट्रात कोठडीतील मृत्यू वाढावेत हे या क्रांतिकारी परंपरेला धरून नाही तर लांच्छनास्पद, लज्जास्पद आहे.

मानवी हक्कांसाठी काम करणाऱ्यांकडे आणि नॅशनल क्राईम ब्युरोकडे असलेल्या माहितीनुसार, २०११ मध्ये देशात १२३ जणांचे कोठडीत मृत्यू झाले. त्यात महाराष्ट्र अव्वलस्थानी म्हणजे १९ जणांचे मृत्यू झाले होते. कोठडीत किंवा कोर्टात नेताना, आणताना किंवा कोर्टाच्या आवारात हे मृत्यू झाले. २०१२ मध्ये सर्वाधिक म्हणजे १३३ लोकांचे मृत्यू झाले. त्यापैकी महाराष्ट्रात होते ३४. २०१३ मध्ये महाराष्ट्रात पुन्हा ३४ मृत्यू झाले. २०१४ मध्ये देशात ९३, २०१५ मध्ये ९७, २०१७ मध्ये १००, २०१८ मध्ये ७०, २०१९ मध्ये ४९, २०२० मध्ये ७६ मृत्यू झाले



आहेत. काही प्रकरणात पोलिसांवर गुन्हे दाखल झाले आहेत. पण अपवाद वगळता कुणाला शिक्षा झालेली नाही. तपास, कारवाई सारे पोलिसांच्याच हातात असते. पुरावे, साक्षीदार त्यांच्याकडेच असतात. शिक्षा होण्याचे प्रमाण खूपच अल्प असते. गुन्हा कबूल करून घेण्यासाठी पोलिस जे काही प्रयत्न करतात त्यात मारहाण, छळ आदींचा मोठ्या प्रमाणात समावेश असतो. सरळ मार्गानं काहीच घडत नाही, अशी पोलिसांची सातत्यानं तक्रार असते. गुन्हेगाराला नमस्कार करून गुन्हा कबूल करून घ्यायचा का, असा त्यांचा प्रश्न असतो. शिवाय गुन्हेगारांनी गुन्हे करताना इतरांना जो त्रास दिला त्याचा विचार करायचा नाही का, असा प्रश्न विचारून पोलिस सातत्यानं आपल्या वर्तनाचं समर्थन करत असतात. दडपशाहीच्या मार्गानं सारं काही लपवत असतात. पोलिसांचं सकृतदर्शनी ठीकही असेल. पण मानवी हक्कांची पायमल्ली करण्याचा अधिकार त्यांना कोणी दिलेला नाही. एखादा गुन्हेगार आहे की नाही हे ठरवण्यासाठी न्यायालय असते. वर्दीच्या जोरावर कोणी कोणाचा प्राण घेऊन एखाद्याला गुन्हेगार सिद्ध करू शकत नाही. पण हे सारे घडते आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्र त्यात आघाडीवर जातो आहे. ज्याला चळवळीची, विचारांची, परिवर्तनाची परंपरा आहे तो महाराष्ट्र. जोपर्यंत कायदा, हक्क यांविषयी जागृती तयार होणार नाही, तोपर्यंत हे असेच चालणार आहे. न्यायालयात, न्यायालयाबाहेर हिंसा घडत असेल तर आपण कोणत्या वळणावर पोहोचलो आहोत?

# इतनी अंधेरी थी न कभी पहले रात...ये भी लिख


लोक लिहीत राहतात, लिहीत आले आहेत, लिहीत राहतीलही; पण काय आणि कसं हा प्रश्नही काळाबरोबर चालत आला आहे आणि चालत राहील यात शंका नाही. माणूस म्हणजे भारतीय माणूस आजही लिहितो आहे, पण तो काय आणि कसे याविषयी गेल्या आठ-नऊ वर्षांपासून चर्चा चालू आहे. ही चर्चाही मोठी मजेशीर आहे. ती कधी मौनात असते, कधी पुटपुटण्याच्या स्वरुपात असते. लिहिण्यासाठी माणूस चांगली जागा शोधण्याचा प्रयत्न करत असतो. पण ती त्याला अपवादानं मिळत असते. आपल्या शब्दांवर चिमुटभर उजेड पडावा यासाठीही तो प्रयत्न करत असतो. पण उजेडाची वाणवा का तयार होते, हेही अनेकदा कळत नाहीय. बरंच काही लिहिण्यासारखं असतं, पण शब्दांपर्यंत पोहोचता येत नाही. खूप अडथळे असतात किंवा आणले जात आहेत. कधी या अडथळ्यांवर काटे उभे असतात, जखमा करण्यासाठी पोज घेऊन... कधी मायावी सावल्या भीती घालवण्यासाठी येतात... कधी संवेदनशील बनलेला किंवा बनवला गेलेला धर्म असतो किंवा स्वतःच धर्म किंवा राष्ट्र बनलेली शक्ती असते. अर्थातच, ती राजकीय असते. या साऱ्यांच्या सहवासात शब्द उगवणार असतात. स्वाभाविकच त्यात सहजपणा येत नाही. शब्दांवर अनेक कटू आवरणे तयार केली जातात. कोंब फुटायला वेळ लागतो. कोंब करपून जाण्याची भीती असते. ती खरी ठरण्याची शक्यता असते. व्यक्त होण्यात अडचणी तयार होतात. त्या वाढत जातात. त्यातूनही प्रयत्न झाला तर धर्म, राष्ट्राचे हळवे अनुयायी धावत येतात. श्रद्धांचा विषय मिरवत शब्दांना बेदखल करण्याचा प्रयत्न करतात. कोरोनाच्या काळात गंगा प्रेताने भरली हेही सांगणं गुन्हा होतो आणि देशात आपली स्पेस मागणंही गुन्हा होतो. हे असं का आणि तसं का नाही, असं विचारणंही गुन्हा होतो. मग आता काय करायचं आणि कसं हा प्रश्न पडतो. या प्रश्नाला वाचा फोडण्याचं काम जावेद अख्तर यांनी नाशिकमध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात केलं आहे. त्यासाठी त्यांनी आपल्या कवितेच्या दोन ओळी वापरल्या. त्यामुळे संमेलनाला एक विचारांचा कणा प्राप्त झाला. अन्यथा हे संमेलन नुसतंच रांगत राहिलं असतं. त्याला कणाच मिळाला नसता. साहित्य कशासाठी, कसं, साहित्यिकाची भूमिका, साहित्याचं प्रयोजन, माणसाला सतावणारा वर्तमान, त्याला जखमी करणाऱ्या वेगवेगळ्या मूलतत्त्ववादाची नखे या सर्वांवर या कवितेनं प्रकाश टाकला. साहित्य आणि स्वातंत्र्य, साहित्य आणि मानवता, साहित्य आणि संघर्ष, साहित्य आणि मूल्ये या सर्वांवर या कवितेनं प्रकाश टाकला. संमेलनाच्या उद्घाटनाच्या सत्रात या विषयाला कुणीच हात घातला नव्हता. तर जावेद अख्तर यांची कविता अशी -

**जिनसे कसीदे लिखे थे, वह फेंक दे कलम**
**फिर खून-ए-दिल से सच्चे कलम की**
**सिफात लिख..**
**जो रोजनामों में कहीं पाती नहीं जगह**
**जो रोज हर जगह की है**
**वह वारदात लिख..**
**जितने भी तंग दायरे हैं, सारे तोड दे**
**अब आ खुली फिजाओं में**
**अब कायनात लिख..**
**जो वाकियात हो गए उनका तो ज़िक्र है**
**लेकिन जो होने चाहिए**
**वह वाकियात लिख..**
**इस बाग में जो देखनी है तुझ को फिर बहार**
**तू डाल-डाल से सदा**
**तू पात-पात लिख**
**जो बात कहते डरते है सब**
**तू वही बात लिख**
**इतनी अंधेरी थी न कभी**
**पहले रात लिख..**

एका शायराला असं का वाटतं, हेही समजून घ्यायला हवं. असं सांगायची वेळ का येते, हेही समजून घ्यायला हवं. कलावंतांच्या, लेखकांच्या मनात उचंबळून येणाऱ्या भावना बाहेरच पडू नयेत यासाठीची एक दृश्य-अदृश्य व्यवस्था तयार केली जात आहे. ती तोडण्याचा प्रयत्न जे करतात ते अडचणीत येतात. लेखन कशावर असायला हवे याच्या नव्या व्याख्या तयार होत आहेत. यामुळेच अंधार वाढवत जाणाऱ्या रात्री आणि संकुचित होत जाणारे दिवस का येत आहेत याचा विचार कोणी करू नये, कोणी बोलण्यासाठी ओठ हलवू नयेत, लेखणीत शाईचे दोन थेंब टाकू नयेत यासाठीचे चक्रव्यूह रचले जात आहेत. बोलण्याचे स्वातंत्र्य आहे पण शब्दांना मोकळीक देता येत नाही, अंधार ओकणारे दिवे आहेत, पण ते पाहता येत नाहीत. दिवे लावणारेच दिव्यांच्या काचा का फोडतात कळत नाही. या साऱ्या प्रश्नांचा वेध घेत एक शायर कशावर लिहायचं हे सुचवत जातो. शब्दांना धीर देत जातो. आजची गरज हीच आहे.

•••

# कोण काय बोलतं



**दहा वर्षांपासून देशात मोठी आर्थिक दरी निर्माण होत असून मूठभर भांडवलदारांकडेच संपत्ती एकवटलेली आहे. त्यामुळे समाजात प्रचंड विषमता वाढली आहे.**

**– पी. साईनाथ**
(आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पत्रकार)



**कामे करताना हेतू चांगला असेल तर सर्वांचेच सहकार्य मिळते. गावच्या समस्या लक्षात घेऊन त्या प्रामाणिकपणे सोडवल्या तर अभ्यासू सरपंच होता येते.**

**– पोपटराव पवार**
(आदर्श गाव हिवरेगावचे सरपंच)



**तुम्ही जगात एकमेव आहात असा विश्वास ठेवल्यानेच तुम्ही अधिक सुंदर बनाल. इतरांशी तुलना करणे सोडून महत्त्वाच्या घडामोडींवर बोला.**

**– हरनाझ संधू**
(भारताची विश्वसुंदरी)



**महाराष्ट्रातील ४२ हजार गावखेड्यांतील शेतकऱ्यांना पावसाचा अंदाज ओळखण्याचे सूत्र सांगून हवामानसाक्षर करण्याचा माझा मानस आहे.**

**– पंजाबराव डख** (हवामानतज्ज्ञ)



**तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांनी मला कधी पैसे मागितले नाहीत आणि मीही कधी पैसे दिले नाहीत.**

**– सचिन वाझे**
(बडतर्फ सहाय्यक पोलिस निरीक्षक)



**मनसे आणि भाजपची युती केवळ मीडियातून होते. याबद्दल मला काहीही माहीत नाही. या बातमीचा सोर्स काय, हे तरी पत्रकारांनी मला सांगावे.**

**– राज ठाकरे** (मनसेप्रमुख)



**उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकांच्यापार्श्वभूमीवरभूमिपूजन समारंभ आणि अर्धवट प्रकल्पांच्या उद्घाटनात भाजप व्यस्त आहे. पण यामुळे भाजपचा पाया काही विस्तारणार नाही.**

**– मायावती** (बसपा नेत्या)



**भाजप देशातील संविधानिक पदांवर आणि संस्थांच्या अधिकारावर गदा आणण्याचे काम करीत आहे.**

**– नवाब मलिक**
(महाराष्ट्राचे अल्पसंख्यांक मंत्री)



**आम्हाला अमेरिका आणि अन्य पाश्चिमात्य देशांसोबत मैत्रीपूर्ण नाते ठेवण्याचे वावडे नाही. अफगाण लोक अडचणीत आहेत. त्यामुळे जागतिक बांधवांनी मदतीसाठी पुढे यावे.**

**– आमिर खान मुत्ताकी**
(अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री)



**चीनच्या विस्तारवादी आणि आक्रमक धोरणांना आळा घालण्यासाठी आम्ही आशियातील मित्रदेशांसोबत लष्करी आणि आर्थिक संबंध वाढवू.**

**– अँटनी ब्लिंकन**
(अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री)

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460



With Best
Compliments from

AJIT CONSTRUCTION